CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

लातूर | शनिवार, ७ फेब्रुवारी २०२६ | वर्ष ३ रे अंक ३३८ | पाने १२ | किंमत रु. ६/- | RNI No. MAHMAR/2023/86477 | Postal Regd No. SLP/32/2024-2026. | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com




# सोलापूरच्या महापौरपदी विनायक कोंड्याल

## उपमहापौरपदी ज्ञानेश्वरी देवकर; ३५ वर्षांनंतर झाली बिनविरोध निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ फेब्रुवारी-**

सोलापूर महापालिकेच्या महापौरपदी विनायक रामकृष्ण कोंड्याल तर उपम हापौरपदी ज्ञानेश्वरी महेश देवकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. सोलापूर महापालिकेच्या इतिहासात ३५ वर्षांनंतर म हापौरपदाची निवड ही बिनविरोध करण्यात आली. यापुर्वी दलितमित्र स्व.भीमराव जाधव, स्व.युन्नुस शेख, स्व.मुरलीधर पात्रे असे तिघेजण यापुर्वी बिनविरोधपणे महापौर पदाच्या खुर्चीवर विराजमान झाले होते. यंदा विनायक कोंड्याल यांच्या रुपाने 'सोलापूर'ला चौथे बिनविरोध महापौर मिळाले.



मुंबई प्रांतिक महानगरपालिका (महापौर व उपमहापौर पदांसाठी निवडणूक घेणे) नियम २००५ तसेच विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचेकडील आदेश क्र.नपाप्र/४/कावि/५१/२०२६, दि.२३ जानेवारी २०२६ अन्वये सार्वत्रिक निवडणुकीनंतर सोलापूर महानगरपालिकेची पहिली विशेष सभा शुक्रवार, दि. ६ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता महापालिकेच्या कौन्सिल हॉल अर्थात कै.यशवंतराव बळवंतराव चव्हाण सभागृहात बोलाविण्यात आली होती. अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी हे सभेच्या अध्यक्षस्थानी होते. यंदाच्या सार्वत्रिक निवडणुकीत भारतीय जनता पार्टीचे तब्बल ८७ नगरसेवक निवडून आले आहेत. 'एम आयएम'ने ८ नगरसेवक निवडून आणत दुसरे स्थान पटकावले. याशिवाय शिवसेना शिंदे गटाचे ४, काँग्रेसचे २, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट १ नगरसेवक निवडून आलेले आहेत. महाराष्ट्र शासन राजपत्रानुसार यंदाचे महापौर पद हे अनारक्षित म्हणजे खुल्या प्रवर्गासाठी आहे. परंतु 'भाजपा'च्या शीर्षस्थ नेत्यांनी आखलेल्या 'राजकीय गणित'मुळे ओबीसी प्रवर्गातून निवडून आलेले विनायक कोंड्याल यांना महापौरपदावर संधी देण्यात आली. महापौर पदासाठी 'भाजपा'कडून विनायक कोंड्याल, शिवसेना शिंदे गटाकडून प्रियदर्शन साठे, 'एमआयएम'कडून तौफिक हत्तुरे तर उपमहापौर पदासाठी 'भाजपा'कडून ज्ञानेश्वरी देवकर, शिवसेना शिंदे गटाकडून प्रियदर्शन साठे, 'एमआयएम'कडून आसिफ शेख यांनी नगरसचिव प्रवीण दंतकाळे यांच्याकडे अर्ज सादर केले होते.

दरम्यान, चर्चेअंती शिवसेना शिंदे गट व 'एमआयएम'च्या महापौर व उपमहापौर पदाचे उमेदवार आपापले अर्ज माघार घेतले. त्यामुळे दोन्ही पदाची निवड बिनविरोध करण्यात आली. विनायक कोंड्याल हे ३८ वे महापौर तर ज्ञानेश्वरी देवकर ह्या ३७ व्या उपमहापौर म्हणून पदावर विराजमान झाले आहेत. महापौर व उपमहापौर पदाची ही निवड पहिल्या अडीच वर्षासाठी राहणार असल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते सभागृहात नूतन महापौर कोंड्याल, नूतन उपमहापौर देवकर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी भारतीय जनता पार्टीचा विजय असो... जय श्रीराम... अशा घोषणा देत सभागृह दणाणून सोडण्यात आले होते.

**(सविस्तर वृत्त पान ९ वर)**






# भारताचा युवा संघ सहाव्यांदा विश्वविजेता

**इंग्लंडवर १०० धावांनी विजय**

**• वैभव सूर्यवंशी सामनावीर व मालिकावीर • पंतप्रधानांनी केले संघाचे अभिनंदन**

**हरारे, ६ फेब्रुवारी**

शुक्रवारी हरारे स्पोर्ट्स क्लबवर वैभव सूर्यवंशी व कर्णधार आयुष म्हात्रेसह भारतीय फलंदाजांनी इंग्लंडविरुद्धच्या अंतिम सामन्यात तडाखेबंद फलंदाजी केली आणि १०० धावांनी दणदणीत विजय नोंदविला. या विजयाबरोबरच भारताच्या युवा संघाने सहाव्यांदा आयसीसी १९ वर्षांखालील एकदिवसीय विश्वचषक क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. वैभव सूर्यवंशी सामनावीर आणि मालिकावीर पुरस्काराचा मानकरी ठरला. त्याने ८० चेंडूंत १५ चौकार व १५ षट्कारांसह १७५ धावांची खेळी केली.

भारताने ५० षटकांत ९ बाद ४११ धावांचा डोंगर रचला. यामध्ये वैभव सूर्यवंशीने १७५ धावांची शतकी, तर आयुष म्हात्रेने ५३ धावांची अर्धशतकी खेळी केली. इंग्लंडला ४१२ धावांचे आव्हान पेलवले नाही. कॅलेब फाल्कनरच्या ११५ धावांच्या शतकी खेळीनंतरही इंग्लंडला ४०.२ षटकांत सर्वबाद ३११ धावांपर्यंतच मजल मारता आली.

*(सविस्तर वृत्त क्रीडा पानावर)*



CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### रेल्वे विभागातील कर्मचाऱ्यांनी दाखविली सतर्कता; सोलापुरातील दोघांचा सन्मान

**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**

प्रतीक गोस्वामी, महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे यांनी ०३.०२.२०२६ रोजी मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे आयोजित कार्यक्रमात मध्य रेल्वेच्या १२ कर्मचाऱ्यांना संरक्षा पुरस्कार प्रदान करून त्यांचा सत्कार केला. यामध्ये सोलापूर विभागातील दोघांचा सन्मान करण्यात आला. कर्तव्यावर असताना कर्मचाऱ्यांनी दाखविलेली सतर्कता, प्रसंगावधान आणि कर्तव्यनिष्ठा यामुळे संभाव्य अपघात टळले व मागील काही महिन्यांत सुरक्षित रेल्वे संचालन सुनिश्चित झाले. या उल्लेखनीय कार्याच्या मान्यतेस्वरूप हे संरक्षा पुरस्कार प्रदान करण्यात आले. प्रत्येक पुरस्कारामध्ये पदक, प्रशस्तीपत्र, उत्कृष्ट सुरक्षा कार्याचा उल्लेख असलेले प्रशस्तिपत्र आणि रु ३,५००/- रोख पारितोषिक यांचा समावेश आहे. सोलापूर विभागामध्ये उमेश रमेश बदर, कनिष्ठ अभियंता, कुर्डुवाडी, सोलापूर विभाग यांना ०३.११.२०२५ रोजी पायी गस्तीदरम्यान कि.मी. ३७३/०८ येथे जी जंपर तुटलेला आढळला. त्यांनी त्वरित संबंधित सर्वांना माहिती देऊन ट्रॅकची संरक्षा सुनिश्चित केले व संभाव्य अपघात टाळला तर भानुदास एन. शेळके, ट्रॅक मेंटेनर, अरग, सोलापूर विभाग यांना ३०.१२.२०२५ रोजी कर्तव्यावर असताना धावत्या मालगाडीच्या एका डब्याचे चाक सपाट झाल्याचे आढळले. त्यांनी तात्काळ संबंधितांना माहिती दिली व वेळेत करण्यात आलेल्या कार्यवाहीमुळे संभाव्य अपघात टळला. महाव्यवस्थापक यांनी सर्व पुरस्कार प्राप्त कर्मचाऱ्यांचे कर्तव्यनिष्ठा आणि सतर्कतेबद्दल अभिनंदन केले तसेच त्यांच्या कृतीमुळे इतर रेल्वे कर्मचाऱ्यांनाही सतर्क राहून प्रवाशांची सुरक्षितता व रेल्वे मालमत्तेचे संरक्षा सुनिश्चित करण्यासाठी प्रेरणा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. या प्रसंगी चंद्रकिशोर प्रसाद, प्रधान मुख्य संरक्षा अधिकारी तसेच इतर प्रधान विभाग प्रमुख आणि मध्य रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.




### 'डिवाइन राजस्थान विथ उज्जैन' यात्रा; सोलापुरातून भारत गौरव रेल्वेची घोषणा


**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**

इंडियन रेल्वे केटरिंग अँड टुरिझम कॉर्पोरेशन लिमिटेड यांनी भारत गौरव पर्यटक रेल्वे योजनेअंतर्गत ११ रात्री / १२ दिवसांची ''डिवाइन राजस्थान विथ उज्जैन यात्रा'' या विशेष पर्यटन पॅकेजची घोषणा केली आहे. ही आध्यात्मिक आणि सांस्कृतिक पर्यटन यात्रा सोलापूर येथून सुरू होणार असून प्रवाशांना देशातील प्रमुख धार्मिक आणि ऐतिहासिक स्थळांना भेट देण्याची संधी मिळणार आहे. या प्रवासाचे पॅकेज दर प्रति व्यक्ती १९ हजार ९०० रुपयांपासून सुरू आहेत. आयआरसीटीसी पश्चिम विभाग, मुंबईचे ग्रुप जनरल मॅनेजर गौरव झा यांनी सांगितले की, ही विशेष एसी व नॉन-एसी संयुक्त भारत गौरव पर्यटक रेल्वे भाविक आणि पर्यटकांना आरामदायी व नियोजित प्रवासाचा अनुभव देईल. प्रवाशांच्या सोयीसाठी बोर्डिंग आणि डिबोर्डिंग सुविधा सोलापूर, कुर्डुवाडी, दौंड, पुणे, लोणावळा, कल्याण, वसई रोड, सुरत, वडोदरा आणि रतलाम या स्थानकांवर उपलब्ध राहणार आहे. आयआरसीटीसी पश्चिम विभाग, मुंबईचे जनसंपर्क अधिकारी यांनी सांगितले की प्रवाशांच्या आरोग्य, स्वच्छता आणि सुरक्षिततेसाठी सर्व आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. या यात्रेचे बुकिंग पहिले येणाऱ्यास प्राधान्य या तत्वावर आयआरसीटीसीच्या अधिकृत पर्यटन संकेतस्थळावर सुरू आहे. अधिक माहितीसाठी प्रवासी मोबाईल क्रमांक ८२८७९३१८८६ वर संपर्क साधू शकतात किंवा . या ईमेलवर संपर्क करू शकतात. **पर्यटन पॅकेजमध्ये या सुविधा मिळणार :** एसी आणि नॉन-एसी डब्यांमधून रेल्वे प्रवास, बजेट हॉटेलमध्ये डबल, ट्रिपल व क्वाड शेअरिंगवर निवास व्यवस्था, संपूर्ण प्रवासादरम्यान शुद्ध शाकाहारी भोजन, एसी व नॉन-एसी वाहनांद्वारे स्थानिक पर्यटन व ट्रान्सफर व्यवस्था, सर्वसमावेशक प्रवास विमा सुविधा आणि प्रवासादरम्यान समन्वयासाठी आयआरसीटीसी टूर मॅनेजर सेवा. **असे आहेत यात्रेचे दर :** इकॉनॉमी क्लास १९,९०० प्रति व्यक्ती, स्टँडर्ड ३ एसी ३१,९२० प्रति व्यक्ती, कम्फर्ट २ एसी ४१,८४० प्रति व्यक्ती

### पिकपच्या धडकेत एकाचा मृत्यू

**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**

दुचाकीवरून जात असताना अज्ञात पिकप गाडीने धडक दिल्याने एकाचा मृत्यू झाला असल्याची घटना सिव्हिल पोलीस चौकीत नोंद झाली आहे. शिवाजी पांडुरंग टेकाळे वय ४५ रा. हसापुरे, ता. परांडा जि. धाराशिव हे दि. ५ फेब्रुवारी रोजी परांडा येथून राहत्या घरी दुचाकीवरून जात असताना परंडा, हसापूर येथील कॅनल जवळ समोरून येणारी अज्ञात



पिकप गाडीने धडक दिल्याने त्यांना डोक्यास मार व सर्वांगास मुकामार लागल्याने त्यांना परंडा येथे उपचार साठी दाखल करण्यात आले. नंतर बार्शी येथील भगवंत हॉस्पिटल येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले त्यानंतर भाऊ अण्णा टेकाळे यांनी शासकीय रुग्णालय सोलापूर येथे दाखल केले असता उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले अशी नोंद सिविल पोलीस चौकीत झाली आहे.

### लाडक्या बहिणींच्या ई-केवायसीसाठी ३१ मार्चपर्यत मुदतवाढ

**मुंबई, दि. ६ फेब्रुवारी -**

राज्य सरकारच्या लाडकी बहिण योजनेच्या लाभार्थी महिलांना ई-केवायसी नोंदणी करण्यासाठी आता ३१ मार्चपर्यत मुदत वाढविण्यात आली आहे. अनेकांची अद्याप ही नोंदणी न झाल्याने दुसऱ्यादा त्यासाठी मुदतवाढ दिली आहे. महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी ट्विट करून त्याबाबतची घोषणा केली आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या लाभार्थी महिलांना ई केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी यापूर्वी ३१ डिसेंबर २०२५ ची मुदत देण्यात आली होती. त्या दरम्यान महिलांकडून काही चुकीचे पर्याय निवडले गेल्यानं त्यांचा लाभ बंद झाला होता. आता राज्य सरकारनं पुन्हा एकदा ई-केवायसी दुरुस्तीसाठी संधी उपलब्ध करुन दिली आहे. . दरम्यान, या योजनेच्या लाभार्थी महिलांना जानेवारी महिन्याच्या हप्त्याची रक्कम कधी मिळणार?, याकडे सर्वांचं लक्ष लागले आहे

# जि.प. उमेदवाराच्या घरासमोर अघोरी पूजा

### मोहोळ तालुक्यातील पेनूर येथील घटना

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. ६ फेब्रुवारी-**

मोहोळ तालुक्यातील पेनुर येथे जिल्हा परिषदेच्या उमेदवाराच्या घरासमोर मतदानाच्या आदल्या दिवशीच अघोरी पूजेचे साहित्य निदर्शनास आल्यामुळे गावात एकच खळबळ उडाली



जिल्हा परिषदेच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे प्रचाराच्या अंतिम टप्पा पूर्ण झाला असून प्रचाराची मुदत संपल्यानंतर मतदानाच्या आदल्या दिवशी म्हणजेच शुक्रवारी सकाळीजिल्हा परिषद पेनुर गटाची उमेदवार चरण चौरे यांच्या गावातील भर वस्तीत असणाऱ्या घराबाहेर पुरणपोळी हळदी कुंकू लिंबू त्याला टाचण्या टोचलेल्या जिल्हा परिषद निवडणुकीसाठी त्यांनी छापलेले प्रचार पत्र त्यास टाचण्या टोचलेल्या हे सर्व साहित्य एका नवीन कपड्यात बांधून पहाटेच्या वेळी कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांच्या घराच्या बाहेर ठेवलं होतं सकाळी उठल्यानंतर आजूबाजूच्या लोकांनी ते सर्व साहित्य पाहिलं आणि त्यांच्यामध्ये घबराट निर्माण झाली यानंतर जिल्हा परिषदेचे उमेदवार यांनी बाहेर घेऊन हा प्रकार पाहिला आणि तेही आश्चर्यचकित झाले हा अघोरी पुजेचा प्रकार कोणी केला का केला याबाबत पेनूर परिसरात उलट सुलट चर्चा सुरु झाली पेनूर गटतून चरण चवरे निवडून येवू नये म्हणून कुणी केला काय? अशीही चर्चा सुरु झाली आहे.

चरण चवरे म्हणाले की असे प्रकार करून मत मिळत नसतात निवडून येण्यासाठी कामच करावे लागते उपमुख्यमंत्री शिंदे साहेब येथे येऊन सभा घेतली आमदार राजाभाऊ खरे प्रचाराला आले हे माझ्या साठी भरपूर झाले मी कामेही केलेले आहे असे सांगत विरोधी उमेदवारावर त्यांनी निशाणा साधला ते म्हणाले की विरोधात उभ्या असलेल्या उमेदवारला प्रचारासाठी त्यांच्या नेत्यालाही गावात आणले नाही त्यांनीच येवू दिले नाही अनगरकर गावात प्रचाराला आले तर माझी मत घटतील अस तेच म्हणतात असे चवरे म्हणाले पुढे बोलताना ते म्हणतात मी घाबरणारा नाही उलट त्या लिंबाचे सरबत करून पिवू शकतो अशा त्यांच्या वक्तव्या वरून ते या कृत्याने जराही विचलित झालेले दिसले नाही.

# सतराव्या मजल्यावरून सदारंगानी यांनी मारली उडी

### आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट नाही

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी**



सोलापूर-विजापूर रोडवरील पनाश अपार्टमेंटच्या १७व्या मजल्यावरून उडी मारून मुलतानी बेकरी व फ्लोअर मिलचे मालक सुनील मोतीलाल सदारंगानी (वय ५९ यांनी गुरुवार ५ फेब्रुवारी रोजी दुपारी चारच्या सुमारास आत्महत्या केली, याची नोंद विजापूर नाका पोलिसात झाली आहे. त्यांच्या आत्महत्येचे नेमके कारण अद्याप अस्पष्टच आहे.

सदारंगानी हे चार-पाच दिवसांपूर्वी पत्नीसोबत सोलापुरात आले होते. ते सोलापुरातच स्थायिक होणार होते. राजकुमार राठी यांचे ते जावई होते. त्यांना दोन मुले असून एक मुलगा अमेरिकेत व दुसरा पुण्यात व्यवसाय करतो. सदरंगाणी यांच्यावर शुक्रवारी सायंकाळी ५ वाजता मोदी स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार झाले. खराडी पुणे येथे राहणाऱ्या त्यांच्या मुलास घटनेची माहिती कळविण्यात आली. रात्री उशिरा सोलापुरात ते दाखल झाले. त्यांची आकस्मित मृत्यू म्हणून विजापूर नका पोलिसात नोंद झाली आहे. नातेवाईकांच्या फिर्यादीनंतर सदारंगांनी यांच्या आत्महत्ये मागील नेमके कारण समोर येईल, असे पोलिसांनी सांगितले.

विजापूर रोडवरील पनाश अपार्टमेंटचे काही मजले अर्धवट स्थितीत आहेत. गुरुवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास सदारंगांनी यांनी गाडी पनाश अपार्टमेंटच्या गेटमधून आत नेली. गाडी थांबवून ते अपार्टमेंटच्या शेवटच्या मजल्यावर चढले. शेवटच्या मजल्यावर उभे राहून त्यांनी हात जोडून प्रार्थना केली. याप्रसंगाचा व्हिडिओदेखील व्हायरल झालेला आहे. त्यांनी शांत डोक्याने आत्महत्या केल्याचे व्हिडिओतून जाणवते. घरातून निघताना थोडा वेळ जाऊन येतो असे पत्नीला सांगून ते घराबाहेर पडले होते. मात्र त्यांनी आत्महत्या केल्याचे समजताच नातेवाईक व मित्रांनी घटनास्थळी गर्दी केली होती.

## सोलापूरच्या विकासासाठी सर्व प्रश्न मार्गी लावणार : उपाध्यक्ष बनसोडे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र राज्य विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णासाहेब बनसोडे यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान सोलापूर शहरातील विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. शहराच्या पायाभूत सुविधा, पाणीपुरवठा, रस्ते विकास तसेच नागरिकांशी संबंधित प्रश्नांवर



सकारात्मक संवाद झाला. यावेळी उपाध्यक्ष अण्णासाहेब बनसोडे यांनी सोलापूरच्या विकासाच्या दृष्टीकोनातून सर्व प्रश्न गांभीर्याने घेतले जातील व संबंधित पातळीवर पाठपुरावा करून ते मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन दिले. सोलापूरच्या सर्वांगीण विकासासाठी शासन स्तरावर सहकार्य करण्याची ग्वाहीही त्यांनी दिली. या चर्चेत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी विविध विषय मांडत सोलापूरच्या विकास आराखड्याबाबत आपले मत व्यक्त केले.




# सिल्व्हर ज्युबिली हायस्कूलच्या गुणवंतांना दीड लाखांची पारितोषिके

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ६ फेब्रुवारी-**

के. एल. ई. सोसायटी बेळगावी संचलित सिल्व्हर ज्युबिली हायस्कूलमधील विद्यार्थ्यांना शैक्षणिकसह गुणवत्ता प्राप्त करण्यासाठी सतत प्रेरणा मिळावी या उदात्त हेतूने दरवर्षी वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यात येतो. यावर्षीच्या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून माजी विद्यार्थी संजय धारुरकर मंत्रालयातील महसूल विभागाचे मंत्रालय उपसचिव, महाराष्ट्र शासन, मुंबई यांची उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी स्थानिक नियामक मंडळ, बार्शीच्या वर्षा ठोंबरे या होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आली. इयत्ता सातवी वर्गातील विद्यार्थिनींनी स्वागत गीत गायन केले. शाळेचे मुख्याध्यापक अनिरुद्ध चाटी यांनी प्रास्ताविक सादर केले. पारितोषिक दात्यांच्या देणगीतून याप्रसंगी रोख रकमेचे वाटप करण्यात येत आहे, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे अहवाल वाचन पारितोषिक वितरण कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. महेश गणाचार्य यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा व अध्यक्षांचा परिचय सचिन झाडबुके व सतिश होनराव यांनी केला. शैक्षणिक, कला, क्रीडा, शिष्यवृत्ती परीक्षा, एनसीसी, एसएससी बोर्ड परीक्षा २०२५, शासकीय चित्रकला परीक्षा, सामान्य ज्ञान परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिके, प्रमाणपत्र व रोख रक्कम १,६२,७००/- देऊन गौरविण्यात आले. एसएससी बोर्ड परीक्षा २०२५ मधील १००% गुण मिळवून प्रथम आलेल्या तनिष्का उमेश फल्ले या विद्यार्थिनीस मान्यवरांच्या हस्ते रोख २२ हजार रुपये बक्षीस देण्यात आले. बक्षिसांचे वाचन हेमंत गाढवे, गणेश ऐनापुरे, नागेश जमदाडे, शिवराज भडुळे, साताप्पा पोमाजी, जयदेवी खराडे, प्रविणा झाडबुके, केदार गुडे, आनंद जमदाडे यांनी केले.

याप्रसंगी प्रशालेचे उपमुख्याध्यापक महेश गोदेपुरे, पर्यवेक्षिका अनुराधा विश्वेकर, विद्यार्थी प्रतिनिधी अपूर्व उकिरडे, विद्यार्थिनी प्रतिनिधी समृद्धी उकिरडे उपस्थित होते. आभार सांस्कृतिक विभाग प्रमुख शुभांगी म्हमाने यांनी मानले. प्रशालेचे शिक्षक श्रीधर डिकुळे यांच्या पसायदान गायनाने कार्यक्रमाची सांगता झाली. सूत्रसंचालन ज्योत्स्ना जमदाडे व सोनाली हुलमनी यांनी केले. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी रवींद्र मठपती, रवींद्र मेनकुदळे, विश्वास चौधरी, संतोष बिराजदार, प्रकाश पावले, शिल्पा फल्ले, जयश्री वालवडकर, सूर्यकांत आदलिंगे, राहुल मुनाळे, अजय मुरकुटे यांनी परिश्रम घेतले.

### अज्ञात दुचाकी वाहनाने दिली धडक; युवक जखमी

**सोलापूर** - घरी दुचाकी वरून जात असलेल्या युवकास अज्ञात दुचाकी वाहनाने धडक दिल्याने युवक जखमी झाला त्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. आप्पाशा राम माने (वय ३५ रा. हुलजंती ता. मंगळवेढा) हा दि. ५ फेब्रुवारी रोजी होमनाळ येथून घरी दुचाकीवरून जात असताना मंगळवेढा येथील बिलेवरी जवळ समोरून येणाऱ्या अज्ञात दुचाकी वाहनाने धडक दिल्याने ते जखमी झाल्याने उपचारासाठी संजीवनी हॉस्पिटल मंगळवेढा येथे दाखल करण्यात आल्याची नोंद झाली आहे.

### अज्ञात वाहनाने धडक दिल्याने पती-पत्नी जखमी

**सोलापूर** - दुचाकीवरून जात असताना दुचाकी व चारचाकी अज्ञात वाहनाने धडक दिल्याने दोघे जखमी झाले. सतीश कांबळे (वय ६०, रा. देगाव) अल्का सतीश कांबळे या त्यांच्या स्वतच्या दुचाकी एमएच १३ सीएम ८९७५ होंडा शाइन यावरून सोलापूर ते मोहोळ या मार्गे जात असताना दुचाकी-चारचाकी अज्ञात वाहनाने धडक दिल्याने सतीश यांना डोक्यास व मुकामार मार लागला व अल्का यांना चेहरा, हात, पायास मुकामार लागल्याने रुग्णवाहिकेतून पुढील उपचारासाठी सुरेश कष्ट यांनी शासकीय रुग्णालय येथे दाखल केले, अशी नोंद सिविल पोलीस चौकीत झाली आहे.



# रेल्वे प्रवासात हरवलेली सोन्याची साखळी केली परत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**

मध्य रेल्वेच्या, सोलापूर विभागाने जलद आणि समन्वित कारवाईद्वारे प्रवासी सेवेप्रती आपली वचनबद्धता पुन्हा एकदा सिद्ध केली आहे, ज्यामुळे महिला प्रवाशाने रेल्वे प्रवासादरम्यान गमावलेली सोन्याची साखळी यशस्वीरित्या परत मिळवण्यात आली.

प्रवासी ट्रेन क्रमांक ११३१२ हासन-सोलापूर एक्सप्रेस मधून प्रवास करत असताना, प्रवासादरम्यान चुकून सोन्याची साखळी शौचालयाच्या कमोडमध्ये पडली. गाडीतील कर्मचाऱ्यांनी तात्काळ प्रयत्न करूनही, ती वस्तू सापडली नाही. संबंधित प्रकरणात ६ फेब्रुवारी २०२६ रोजी पहाटे 'रेल मदत' पोर्टलद्वारे रेल्वेकडे मदतीसाठी तात्काळ तक्रार नोंदवण्यात आली. सदरची रेल्वे सोलापूर स्थानकावर पोहोचल्यावर, सोलापूर विभागाच्या अधिकाऱ्यांनी तात्काळ कारवाई केली. प्रवाशाला समजावून सांगून धीर देण्यात आला, त्यानंतर यांत्रिक विभागाच्या कॅरेज आणि वॅगन शाखेच्या बायो-टॉयलेट देखभाल पथकाने, कर्तव्यावर असलेल्या रेल्वे सुरक्षा दलाच्या कर्मचाऱ्यांच्या समन्वयाने, बायो-टॉयलेटच्या टाकीतून सोन्याची साखळी काळजीपूर्वक बाहेर काढली. त्यानंतर, ती सापडलेली वस्तू आरपीएफ कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत सुरक्षितपणे प्रवाशाच्या ताब्यात देण्यात आली.

रेल्वे कर्मचाऱ्यांनी दिलेल्या तत्पर प्रतिसादाबद्दल आणि समर्थनाबद्दल प्रवाशाने समाधान आणि कृतज्ञता व्यक्त केली. सोलापूर विभाग हा प्रवाशांची सुरक्षा, तक्रारींचे त्वरित निवारण आणि सर्वकाळ सहानुभूतीपूर्ण सेवा सुनिश्चित करण्यासाठी कटिबद्ध आहे.

# पिस्टल व काडतुस विक्री करणारी टोळी जेरबंद

### ३ पिस्टल ५ जिवंत काडतुससह पावणे दोन लाखांचा मुद्देमाल हस्तगत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**

देशी बनावटीचे पिस्टल व काडतुस विक्री करणारी टोळी जेरबंद करण्यात आली. यामध्ये देशी बनावटीचे ३ पिस्टल ५ जिवंत काडतुस जप्त करण्यात आले असून एकुण १ लाख ७१ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.



सहाय्यक पोलिस निरीक्षक विशाल वायकर व त्यांच्या तपास पथकाने खात्रीशीर माहिती काढली की, विकास कैलास वजाळे (रा. अण्णाभाऊ साठे नगर परिते ता. माढा) हा त्याचेकडील पिस्टल व राउंड घेवून एच पी पेट्रोल पंप परिते येथे विक्रीसाठी येणार आहे. त्याप्रमाणे परिते ते टेंभुर्णी जाणारे रोड लगत सषंयीत इसम दिसून आल्याने त्यास पथकाने ताब्यात घेतले. चौकशी केली असता विकास कैलास वजाळे (वय ३१ वर्षे, रा. अण्णाभाऊ साठे नगर परिते) असे नाव असल्याचे सांगितले. सदर इसमाची झडती घेतली असता त्याचे कमरेला खोवलेले १ देशी बनावटी पिस्टल मॅगझीनसह व १ जिवंत काडतुस त्याचे ताब्यात मिळुन आली. आरोपीकडे अधीक तपास करता केल्यानंतर रञ्जीत उर्फ गोलू (रा. धुळे) याचे कडुन विक्री करण्याकरिता ४ देशी बनावटीचे पिस्टल व राउंड काही दिवसापुर्वी आणले असल्याची माहिती समजून आली. आरोपी विकास वजाळे याचे घराची झडती घेतली असता घरझडतीत १ पिस्टल व ४ राउंड मिळून आले. आरोपी विकास वजाळे याचेकडे अधिक तपास करत असताना त्याने यापूर्वी अक्षय अशोक धोत्रे (वय ३१, रा. सुमित हॉटेलच्या पाठीमागे टेंभुर्णी) आणखी १ देशी बनावट पिस्टल विक्री केल्याची माहिती दिली. त्यावरून तिसरे पिस्टल देखील जप्त करण्यात आले.

या कारवाईत एकुण ३ देशी बनावट पिस्टल व ५ राउंड असा एकूण १ लाख ७१ हजार किंमतीचा मुद्देमाल मिळाला. तसेच त्याचेकडील चौथे पिस्टल हे राम आनंता कांबळे (रा. टेंभूर्णी) यास विक्री केल्याचे निष्पन्न आहे. या आरोपीविरुद्ध टेंभुर्णी पोलीस ठाणे गुरनं ६९/२०२६ भारतीय शस्त्र अधीनियम १९५९ चे कलम ३,७,२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास सपोनि/विशाल वायकर नेम. स्थानिक गुन्हे शाखा, सोलापूर हे करीत आहे.

सदर गुन्ह्यात आरोपी विकास कैलास वजाळे रा. अण्णाभाऊ साठे नगर परिते ता. माढा व अक्षय अशोक धोत्रे वय ३१ रा. सुमित हॉटेलच्या पाठीमागे टेंभुर्णी तालुका माढा यांना अटक केली असून त्यांना आज रोजी न्यायालयात हजर केले असता त्यांची २ दिवस पोलीस कोठडी रिमांड मंजूर केली आहे. ही उल्लेखनीय कामगिरी अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक, प्रितम यावलकर, अपर पोलीस अधीक्षक, अंजना कृष्णा व्ही. एस, सहा. पोलीस अधीक्षक, करमाळा विभाग यांचे मार्गदर्शनाखाली संजय जगताप, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, सोलापूर ग्रामीण यांचे नेतृत्वाखाली सहा. पोलीस निरीक्षक विशाल वायकर, व पथकातील श्रेणीपोसई श्रीकांत गायकवाड, पोहेकॉ सलीम बागवान, विरेश कलशेट्टी, पोकॉ राहुल दोरकर, हरीष थोरात, बाळासाहेब घाडगे, अन्वर अत्तार, सुनिल पवार यांनी बाजवली आहे.



### मार्डीत दोघांकडून घरावर दगडफेक

**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**

दोघा जणांनी मिळून एकाच्या घरावर दगडफेक करण्यात आल्याची घटना मार्डी (ता.उत्तर सोलापूर) येथे घडली. दगडफेकीचे कारण समजू शकले नाही. शहनाज अहमद शेख (वय-६६, रा.मार्डी ता.उत्तर सोलापूर) ह्या राहत्या घरात असताना फिरोज भोंगे, साजिया भोंगे या दोघांनी घरावर दगडफेक केले. यात पेशंटच्या पायाला दगड लागला. उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. घटनेची सिव्हील पोलिस चौकीत करण्यात आली.



अजितदादा गेल्यावर शरद पवारांना शह देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी गलिच्छ राजकारण सुरू केले. दादांची स्मशानातील राख विजली नव्हती तोच सुनेत्रा पवार यांना शपथ घ्यायला लावली.

**रामदास कदम**, शिवसेना नेते


# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

शनिवार, ७ फेब्रुवारी २०२६






बॉलिवूडमधील ९० टक्के लग्न केवळ दिखावाच आहेत. आजच्या काळात फसवणूक करणे, अनेक पार्टनर असणे ही एक प्रकारची फॅशनच झाली आहे. पत्नी असूनही मैत्रीण असणे ही चांगली गोष्ट नाही, पण सध्या याकडे फॅशन म्हणून पाहिले जात आहे.

**प्रतीक बब्बर**, अभिनेता

## विचारपुष्प



निसमाजाला संस्कृतीकडे नेणारे सद्गुण समाजात कसे निर्माण करावे, हा एक मौलिक प्रश्न आहे. केवळ जाहिरात करून, प्रवचन, अध्यापन किंवा प्रसारण करून ते निर्माण होतील का? व्यक्तिगत अपवाद सोडल्यास समूहश: हे संभव होणार नाही. जीवनाच्या गोष्टी जीवनाद्वारे संक्रमित होऊ शकतात. आचरणातून आचरण दिले वा घेतले जाते. यालाच परंपरा म्हणतात.

**- रंगा हरी**

रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. बौद्धिक प्रमुख

# १२ झेडपी, १२५ पंचायत समित्यांसाठी आज मतदान

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ६ फेब्रुवारी :**

राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि त्यांतर्गतच्या १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी शनिवारी (दि..७) मतदान होत आहे. अनुक्रमे ७३१; तर आणि १ हजार ४६२ जागांसाठी ही निवडणूक होत असून त्यासाठी एकूण ७ हजार ४३८ इतके उमेदवार निवडणूक रिंगणात असून सर्व मिळून एकूण २ कोटी ८ लाख २० हजार ७०२ इतकी मतदार संख्या आहे. संपूर्ण मतदान प्रक्रियेसाठी पुरेशा पोलिस बंदोबस्ताचीदेखील व्यवस्था करण्यात आली आहे.

राज्य निवडणूक आयोगाने रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव आणि लातूर या १२ जिल्हा परिषदा आणि त्यांतर्गतच्या १२५ पंचायत समित्यांच्या निवडणूक कार्यक्रमाची घोषणा १३ जानेवारीला केली होती. त्यानुसार ५ फेब्रुवारीला मतदान होणार होते; परंतु उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे राज्यात तीन दिवसांचा दुखवटा जाहीर झाल्यानंतर मतदानाच्या तारखेत बदल करण्यात आल्याने त्यानुसार उद्या सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान



होणार आहे. मतमोजणी ९ फेब्रुवारीला सकाळी १० वाजता सुरू होईल. त्यानंतर आचारसंहिता संपुष्टात येईल.

**एकूण जागा आणि उमेदवार** : सर्व बारा जिल्हा परिषदांच्या एकूण ७३१ जागा असून, त्यातील ३६९ जागा महिलांसाठी राखीव आहेत. अनुसूचित जातींसाठी ८३, अनुसूचित जमातींसाठी २५ आणि नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी १९१ जागा आरक्षित आहेत. जिल्हा परिषदांच्या या सर्व जागांसाठी एकूण २ हजार ६२४ उमेदवार निवडणूक लढवित आहेत. सर्व १२५ पंचायत समित्या मिळून एकूण १ हजार ४६२ जागा असून, त्यातील ७३१ जागा महिलांसाठी राखीव आहेत. अनुसूचित जातींसाठी १६६, अनुसूचित जमातींसाठी ३८ आणि नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी ३४२ जागा आरक्षित आहेत. पंचायत समित्यांच्या या सर्व जागांसाठी एकूण ४ हजार ८१४ उमेदवार निवडणूक लढवत आहेत.

**मतदार आणि मनुष्यबळ** : निवडणूक होत असलेल्या जिल्हा परिषदांच्या व त्यांतर्गतच्या पंचायत समित्यांच्या एकूण मतदारांमध्ये १ कोटी ६ लाख ३३ हजार २६९ पुरुष, १ कोटी १ लाख ८६ हजार ९६५ महिला; तर ४६८ इतर मतदारांचा समावेश आहे. त्यांच्यासाठी एकूण २५ हजार ४७१ मतदान केंद्राची व्यवस्था करण्यात आली आहे. संपूर्ण मतदान प्रक्रियेसाठी सुमारे १ लाख २८ हजार इतक्या मनुष्यबळाची व्यवस्था केली आहे. त्यात सुमारे १२५ निवडणूक निर्णय अधिकारी आणि १२५ सहायक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

**मतदारांचे नाव शोधण्याची सुविधा** : जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठीच्या मतदार यादीतील मतदाराचे नाव आणि मतदान केंद्र शोधण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने 'मताधिकार' (Matadhikar) हे मोबाईल प उपलब्ध करून दिले आहे. ते 'गुगल प्ले स्टोअर'वरून डाऊनलोड करता येईल. त्यात मतदाराचे 'संपूर्ण नाव' किंवा 'मतदार ओळखपत्रा'चा (EPIC) क्रमांक नमूद करून मतदार यादीतील नाव शोधता येईल.

# मशिदीतील स्फोटात ६९ ठार

**इस्लामाबाद हादरले, १२५ जखमी | शियांच्या मशिदीत नमाजावेळी घटना | जेयूए संघटनेने घेतली हल्ल्याची जबाबदारी**

◆ **इस्लामाबाद, ६ फेब्रुवारी**

पाकिस्तानची राजधानी इस्लामाबाद शहरातील शहजाद टाउन परिसरातील तारलाई इमामबाडा भागातील कासर-ए-खदिजातुल कुबरा या शिया मशिदीत शुक्रवारच्या नमाज पठणाच्यावेळी आत्मघाती स्फोट झाला. यात ६९ नागरिकांचा मृत्यू झाला, तर १२५ पेक्षा अधिक जखमी आहे. हल्ल्याची जबाबदारी टीटीपी अर्थात् तहरिक ए तालिबान पाकिस्तान दहशतवादी संघटनेशी संबंधित जमात उल अहरार या संघटनेने घेतली आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता, इस्लामाबादमध्ये आणीबाणीची जाहीर करण्यात आली.

इस्लामाबाद येथील शिया मशिदीत शुक्रवारी सकाळी १० वाजताच्या सुमारास नमाज पठणासाठी मोठ्या संख्येने लोक जमले होते. नमाज सुरू असताना मशिदीच्या परिसरात अचानक आत्मघाती स्फोट झाला. स्फोटाची माहिती मिळताच, पोलिस आणि बचाव पथके घटनास्थळी पोहोचली आणि बचाव कार्य सुरू केले. जखमींना तातडीने इस्लामाबाद



पॉलीक्लिनिक, पाकिस्तान इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस आणि सीडीए रुग्णालयात हलवण्यात आले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी ६९ नागरिकांना मृत घोषित केले असून, १२५ पेक्षा अधिक जखमींवर उपचार सुरू असल्याची माहिती पंतप्रधान शहबाज शरीफ यांनी एक्सवरील पोस्टमधून दिली. हल्ल्याच्या काही तासातच जेयूए या संघटनेने चित्रफीत जारी करून हल्ल्याची जबाबदारी घेतली. बलुचिस्तानातील नागरिकांच्या हत्येचा बदला घेण्यासाठी आणि पाकिस्तानी सरकारला हादरवण्यासाठी आत्मघाती हल्ला केल्याचे त्यांनी म्हटले आहे. हल्ल्याचा कट रचणाऱ्या दहशतवाद्यांना मोठी किंमत मोजावी लागेल. तपास संस्थेने घटनेचा तपास सुरू केला असून, हल्ल्यात सहभागी असणाऱ्या कोणालाही सोडणार नाही, असा इशारा शरीफ यांनी दिला आहे.

**संवेदनशील भागात लष्कर तैनात**

इस्लामाबाद कॅपिटल टेरिटरी पोलिसांचे प्रवक्ते तकी जवाद म्हणाले की, स्फोटाचे स्वरूप निश्चित करणे सुरू असून, हा आत्मघातकी हल्ला होता की पेरलेला बॉम्ब होता याचा तपास सुरू आहे. सुरक्षा यंत्रणा हायअलर्टवर आहे. ◂(वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### आरबीआयचा दिलासा
### ना कर्ज महागणार ना ईएमआय वाढणार

**नवी दिल्ली** : रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने शुक्रवारी चलनविषयक धोरणाचा आढावा जाहीर केला असून नोकरदारांना दिलासा देताना राखीव रोखता प्रमाण (रेपो रेट) 'जैसे थे' ठेवले आहेत. त्यामुळे बँकेचे ईएमआय वाढणार नाही.





गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सहा सदस्यीय चलनविषयक धोरण समितीच्या बैठकीनंतर रेपो दर ५.२५ टक्क्यांवर कायम ठेवला. धोरण जाहीर करताना गव्हर्नर मल्होत्रा यांनी सांगितले की मागील बैठकीनंतर जागतिक पातळीवरील अनिश्चितता आणि बाह्य दबावात वाढ झाली आहे. मात्र, अलीकडील काही आंतरराष्ट्रीय व्यापार करारांमुळे भारताच्या आर्थिक भवितव्याबाबत सकारात्मक संकेत मिळत आहेत. देशांतर्गत पातळीवर महागाई आणि आर्थिक वाढ नियंत्रणात असून पुढील काळातही ती स्थिर राहण्याचा अंदाज आहे.

## आप नेत्याची हत्या

जालंधर : ६ फेब्रुवारी पंजाबमधील जालंधर येथे आम आदमी पक्षाचे नेते लक्की ओबेरॉय यांची शुक्रवारी सकाळी गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. ते ५२ वर्षांचे होते. स्कूटरवरून आलेल्या हल्लेखोरांनी त्यांच्यावर सहा गोळ्या झाडल्या. त्यापैकी पाच छातीत आणि एक डोक्यात लागली. लक्की ओबेरॉय मॉडेल टाऊन परिसरात गुरुद्वारात दर्शनासाठी आले होते. पोलिसांनी संपूर्ण परिसर सील केला आहे.

# न.पं. उपाध्यक्षासह कुटुंबाचे बंदुकीच्या धाकावर अपहरण

## मध्यरात्री घडलेल्या थराराने महागावात खळबळ

◆ **महागाव, ६ फेब्रुवारी**

उबाठा उपजिल्हा प्रमुख, महागाव नगर पंचायत उपाध्यक्ष प्रमोद भरवाडे यांच्यासह त्यांच्या पत्नी आणि दोन मुलींचे घरातून अपहरण झाल्याची धक्कादायक घटना गुरुवारी मध्यरात्री घडली. अज्ञात आरोपींनी देशी कट्ट्याचा धाक दाखवून भरवाडे कुटुंबीयांना त्यांच्याच कारमधून पळवून नेल्याने जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

प्रमोद भरवाडे यांचे भाऊ सचिन यांनी या प्रकरणी महागाव पोलिस ठाण्यात तक्रार दिली. गुरुवारी रात्री कुटुंब जेवण करून झोपले होते. मध्यरात्री २.३० च्या सुमारास दोन अनोळखी इसमांनी घराचा दरवाजा ठोठावला. सचिन भरवाडे यांनी दरवाजा उघडला असता, आरोपींनी पोलिस ठाण्याचे काम आहे, असे सांगून घरात प्रवेश केला.

सचिन यांनी त्यांचा मोठा भाऊ प्रमोद यांना उठवताच आरोपींनी आपले हिंसक रूप धारण केले. एका आरोपीने प्रमोद यांना धक्काबुक्की केली, तर

**चारचाकी आढळली मानवाडी फाट्यावर**

**ज्या गाडीतून प्रमोद भरवाडे व त्यांच्या परिवाराचे अपहरण करण्यात आले, ती गाडी नांदेड जिल्ह्यातील हदगाव पोलिस ठाणे हद्दीतील मानवाडी फाट्यावर आढळली. महागाव पोलिसांनी ती गाडी त्या ठिकाणावरून जप्त करून महागाव पोलिस ठाण्यात जमा केली आहे.**

दुसऱ्याने त्यांची मोठी मुलगी वैष्णवी हिच्यावर देशी कट्टा रोखून हालचाल केल्यास ठार मारण्याची धमकी दिली.

दहशत निर्माण करून आरोपींनी प्रमोद, त्यांची पत्नी प्रियंका आणि दोन मुलींना घरासमोर उभ्या असलेल्या स्विफ्ट डिझायर कारमध्ये जबरदस्तीने बसवले. विशेष म्हणजे, आरोपींनी प्रमोद भरवाडे यांनाच त्यांनी गाडी चालवण्यास भाग पाडले. पोलिसांना कळवले तर ठार मारू, आमचे काम झाले की चार दिवसांनी सोडून देऊ, अशी धमकी देऊन आरोपींनी पळ काढला.

घटनेची माहिती मिळताच ठाणेदार धनराज निळे, उपनिरीक्षक अमोल राठोड, गुन्हे शाखेचे सपोनि धीरज बांडे, उपनिरीक्षक शरद लोहकरे यांनी घटनास्थळी भेट देऊन परिसरातील सर्व सीसीटीव्हींची पाहणी करून तपास पथक रवाना केली आहेत. घटनेचा पुढील तपास महागावचे पोलिस ठाणेदार धनराज निळे यांच्या मार्गदर्शनात पोलिस उपनिरीक्षक अमोल राठोड करीत आहेत.

**अपहरण झालेले कुटुंब सुखरूप?**

या प्रकरणात शुक्रवारी दिवसभर पोलिसांच्या काहीही हाती लागले नाही. पण, संध्याकाळी सर्व जण सुखरूप असून ते परत येत आहेत, अशी अनधिकृत माहिती पोलिसांकडून मिळाली. ◂(तभा वृत्तसेवा)

# राज्यातील दहा शहरांना मिळाले महापौर

## नऊ महानगरपालिका भारतीय जनता पार्टीच्या ताब्यात

◆ **मुंबई, ६ फेब्रुवारी**

राज्यातील दहा महापालिकांमध्ये शुक्रवारी महापौर व उपमहापौरपदाची निवडणूक पार पडली. यात कोल्हापूर, पिंपरी चिंचवड, सोलापूर, जळगाव, धुळे, नांदेड, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, अमरावतीत या नऊ महापालिकेत सत्ताधारी भाजपाचे महापौर विराजमान झाले आहेत तर अहिल्यानगर मनपात राष्ट्रवादी काँग्रेसचा महापौर निवडून आला आहे.

सोलापूर, जळगाव व अहिल्यानगर येथील चुरशीच्या वाटणाऱ्या निवडणुका ऐनवेळी बिनविरोध झाल्या, तर धुळ्यात भाजपने मोठ्या मताधिक्क्याने विजय मिळवला. सोलापूर महापालिकेच्या महापौरपदी भाजपच्या विनायक कोंड्याल यांची बिनविरोध निवड झाली. येथे शिवसेना व एमआयएमच्या उमेदवारांनी ऐनवेळी माघार घेतल्यामुळे कोंड्याल यांचा मार्ग मोकळा झाला. जळगाव महापालिकेत भाजपाच्या दीपमाला काळे यांची महापौरपदी वर्णी लागली, तर शिवसेनेचे मनोज चौधरी यांची उपमहापौरपदी बिनविरोध निवड झाली. धुळे महापालिकेत सत्ताधारी महायुतीच्या घटकपक्षांत दुरंगी लढत दिसून आली. येथे भाजपच्या मायादेवी परदेशी यांनी ५० मते मिळवत महापौरपदी विजय मिळवला. नांदेड महापालिकेत पहिल्यांदाच भाजपच्या उमेदवार कविता मुळे विराजमान झाल्या तर उपमहापौरपदी दीपकसिंह रावत यांची निवड झाली.

**श्रीचंद तेजवानी अमरावतीचे महापौर**
**युवा स्वाभिमानचे सचिन भेंडे उपमहापौर**

**अमरावती** : अमरावती महानगरपालिकेत भाजपा, युवा स्वाभिमान, राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना महायुती सत्तेत आली आहे. भाजपाचे श्रीचंद तेजवानी महापौर तर युवा स्वाभिमानचे सचिन भेंडे उपमहापौर म्हणून विजयी झाले. दोघांनाही प्रत्येकी ५५ मते मिळाली. महायुतीला एमआयएमने मतदान केले.



**संभाजीनगरात राजूरकर महापौर**

छत्रपती संभाजीनगर महापालिकेत भाजपाचे समीर राजूरकर व उपमहापौरपदी शिवसेनेचे राजेंद्र जंजाळ यांचा विजय झाले. पिंपरी चिंचवड महापालिकेतही भाजपच्या शर्मिला बाबर यांची महापौरपदी वर्णी लागली. कोल्हापूर महानगरपालिकेच्या महापौरपदी भाजपाच्या रूपाराणी संग्रामसिंह निकम यांची, तर उपमहापौरपदी महायुतीतील घटक पक्ष असलेल्या जनसुराज्य शक्ती पक्षाचे अक्षय विक्रम जरग यांची निवड झाली. ◂(वृत्तसंस्था)

## भारत खरेदी करणार ११४ राफेल

**नवी दिल्ली** : भारतीय हवाई दलाला बळकटी देण्यासाठी ११४ राफेलची खरेदी करण्याबाबत केंद्र सरकार विचार करीत आहे. फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन याच महिन्यात भारत भेटीवर येत असून यावेळी चर्चेची शक्यता आहे.

# अजित पवारांच्या मृत्यूचे राजकारण बंद झाले पाहिजे

## देवेंद्र फडणवीसांनी सर्वांनाच खडसावले; राजकारण करणे दुर्दैवी

**नागपूर, दि.६ फेब्रुवारी-**

अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाले आहे. या संदर्भात होत असणारा वाद हा अतिशय निरर्थक आणि चुकीचा आहे. प्रत्येक व्यक्ती स्वतःच राजकारण यात कसं पाहता येईल, हा प्रयत्न करत असल्याचा आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. हे अतिशय चुकीचे आहे. शेवटी राज्याचे उपमुख्यमंत्री, राज्याचे अतिशय प्रसिद्ध व्यक्तिमत्व असणारे एक मोठे नेते, अजित दादा पवार हे दुर्दैवाने आपल्यातून निघून गेले आहेत. त्यानंतर प्रत्येक व्यक्ती त्याच्या माध्यमातून राजकारण करण्याचा प्रयत्न करत आहे. हे अतिशय चुकीचे आहे. अशा प्रकारचे खालचे राजकारण बंद झालं पाहिजे, असे ठाम मत मुख्यमंत्री फडणवीसांनी व्यक्त केले आहे.



अजित पवार यांच्या विमान अपघातातील निधनानंतर सुरू झालेल्या राजकीय वादांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या दुर्दैवी घटनेतून काहीजण राजकारण करण्याचा प्रयत्न करत असल्याचे ते म्हणाले. राज्याचे उपमुख्यमंत्री आणि जनतेत लोकप्रिय असलेले नेते अचानक आपल्यातून निघून गेल्यानंतर अशा प्रकारचे आरोप-प्रत्यारोप करणे अत्यंत चुकीचे असल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले. या घटनेतून राजकारण करण्याचा प्रयत्न दुर्दैवी आहे. हे खालच्या पातळीचे राजकारण तात्काळ थांबले पाहिजे, असा कडक इशाराही त्यांनी दिला. मुंबईहून बारामतीकडे प्रचारसभेसाठी रवाना झाले असताना अजित पवार यांच्या विमानाचा धावपट्टीजवळ भीषण अपघात झाला होता. या अपघातात अजित पवारांसह पाच जणांचा मृत्यू झाला. अपघातानंतर काही व्हिडिओ समोर आले, ज्यामध्ये विमान कोसळल्यानंतर मोठे स्फोट झाल्याचे दिसत होते. दरम्यान, या घटनेनंतर काही तासांतच सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. या शपथविधीवरूनही चर्चा रंगल्या. मात्र, फडणवीसांनी स्पष्ट केले की, या सर्व घडामोडींमध्ये अनावश्यक राजकीय अर्थ लावणे योग्य नाही. दु:खद प्रसंगात संयम राखणे आणि कुटुंबीयांच्या भावनांचा आदर करणे आवश्यक आहे, असेही त्यांनी नमूद केले.

# जगभरातील ४० टक्के स्मार्टफोन धोक्यात

**गुगलचा इशारा**

◆ **नवी दिल्ली, ६ फेब्रुवारी**

गूगलने जगभरातील अँड्रॉइड युजर्ससाठी धोक्याचा इशारा जारी केला आहे. जगभरातील सुमारे ४० टक्के स्मार्टफोनवर सध्या मालवेअर आणि स्पायवेअरचे मोठे संकट घोंघावत असून, जुन्या ऑपरेटिंग सिस्टीममुळे ही परिस्थिती उद्भवल्याचे गूगलने म्हटले आहे.

फोर्ब्सने प्रसिद्ध केलेल्या एका अहवालात ही धक्कादायक माहिती समोर आली आहे. अहवालानुसार, जे स्मार्टफोन १३ किंवा त्यापेक्षा जुन्या ऑपरेटिंग सिस्टीमवर चालतात, त्यांना सर्वाधिक धोका आहे. जुन्या अँड्रॉइड ऑपरेटिंग सिस्टीमला आता सुरक्षा अपडेट्स मिळत नाहीत, ज्यामुळे ते असुरक्षित झाले आहेत. जगभरात अशा स्मार्टफोन युजर्सची संख्या १ अब्जापेक्षा जास्त आहे.



ज्यांचे मोबाईल जुन्या ऑपरेटिंग सिस्टीमवर चालतात, त्यांनी आपला फोन लेटेस्ट अँड्रॉइड ऑपरेटिंग सिस्टीमसह अपडेट करावा, असा सल्ला देण्यात आला आहे. तसेच, उपलब्ध असल्यास सिक्युरिटी पॅच नियमितपणे अपडेट करत राहावे. जुन्या आयफोनला वेळेवर अपडेट्स मिळतात. मात्र, अनेक जुन्या अँड्रॉइड स्मार्टफोनला हे अपडेट्स मिळत नाहीत. जर तुमच्या कंपनीने सॉफ्टवेअर सपोर्ट बंद केला असेल, तर सुरक्षिततेच्या दृष्टीने नवीन स्मार्टफोन खरेदी करणे कधीही चांगले.

**कंपन्या किती काळ अपडेट्स देतात?**

स्मार्टफोन उत्पादक कंपन्या साधारणपणे ४ ते ५ वर्षांसाठी सिक्युरिटी अपडेट्स देतात. मात्र, आता सॅमसंग आणि गूगल पिक्सल सारख्या कंपन्यांनी ७ वर्षांपर्यंत अपडेट्स देण्याची घोषणा केली आहे. अहवालानुसार, केवळ ५८ टक्के स्मार्टफोन सध्या सिक्युरिटी सपोर्टच्या कक्षेत आहेत, तर उर्वरित ४० टक्के स्मार्टफोनसाठी कोणतेही सिक्युरिटी अपडेट्स उपलब्ध नाहीत. ◂(वृत्तसंस्था)

**सिक्युरिटी अपडेट म्हणजे काय?**

स्मार्टफोनची सुरक्षा मजबूत करण्यासाठी कंपन्या वेळोवेळी सिक्युरिटी अपडेट्स जारी करतात. हे अपडेट्स जुन्या ओएसमधील त्रुटी आणि उणिवा दूर करण्याचे काम करतात. जर हे अपडेट्स नसतील, तर हॅकर्स या त्रुटींचा फायदा घेऊन तुमचा डेटा चोरी करू शकतात किंवा तुमचा फोन हॅक करू शकतात. जगात अँड्रॉइड स्मार्टफोन वापरणाऱ्यांची संख्या खूप मोठी आहे. सॅमसंग, रियलमी, रेडमी, ओप्पो, वनप्लस यांसारख्या अनेक कंपन्या अँड्रॉइड ओएसचा वापर करतात, तर आयफोनची सिस्टीम फक्त ॲपलच्या उपकरणांपुरती मर्यादित आहे.

# ७५४ विमानांपैकी निम्मी सदोष

◆ **नवी दिल्ली, ६ फेब्रुवारी**

जानेवारी २०२५ पासून देशातील सहा प्रमुख विमान कंपन्यांच्या एकूण ७५४ विमानांची तांत्रिक तपासणी करण्यात आली. यापैकी ३७७ विमानांमध्ये वारंवार उद्‌भवणाऱ्या बिघाडांची ओळख पटली. म्हणजेच, एकच बिघाड वारंवार समोर आला, जरी तो आधी दुरुस्त करण्यात आला होता.

एअर इंडिया ग्रुपच्या २६७ विमानांपैकी १९१ (७२ टक्के) विमानांमध्ये वारंवार तांत्रिक बिघाड आढळला. त्यानंतर इंडिगोचा क्रमांक होता. त्यांच्या ४०५ विमानांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी १४८ विमानांमध्ये या वर्षी ३ फेब्रुवारीपर्यंत (रिपीटेटिव्ह डिफेक्ट)एकच बिघाड वारंवार आढळला.

लोकसभेत नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी सांगितले की, डीजीसीएने गेल्या वर्षी सुरक्षेबाबत मोठ्या प्रमाणावर तपासणी केली. या दरम्यान ३८९० सर्व्हिलन्स इन्स्पेक्शन, ५६ ऑडिट, ४९२ रॅम्प चेक आणि ८४ परदेशी विमानांची तपासणी करण्यात आली. ८७४ स्पॉट चेक आणि ५५० नाईट सर्व्हिलन्स देखील करण्यात आले.

कार्यकारी अधिकाऱ्यांच्या मते, एअर इंडियाच्या बाबतीत, बहुतेक समस्या श्रेणी डी मध्ये आहेत, ज्यात सीट, ट्रे टेबल, स्क्रीन (सीटच्या मागे) इत्यादी गोष्टींचा समावेश आहे.

या विमानांच्या सुरक्षिततेशी संबंधित नाहीत. कार्यकारी अधिकाऱ्यांनी पुढे सांगितले की, पुढील दोन वर्षांत जेव्हा नॅरो-बॉडी विमानांसाठी रेट्रोफिट कार्यक्रम सुरू होईल, तेव्हा या समस्या देखील सुटतील. ◂(वृत्तसंस्था)

**बहुतेक समस्या 'डी' श्रेणीत**

एअर इंडियाच्या प्रवक्त्याने सरकारी आकडेवारी जाहीर झाल्यानंतर सांगितले की, आम्ही अत्यंत सावधगिरी बाळगून आमच्या संपूर्ण ताफ्याची तपासणी केली आहे, त्यामुळे संख्या जास्त आहे. एअरलाइनच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, विमानात वेगवेगळ्या प्रकारच्या उपकरणांची तपासणी केली जाते. उपकरणांच्या प्राधान्यानुसार किंवा तातडीनुसार त्यांना ए,बी, सी आणि डी सेगमेंटमध्ये विभागले आहे.

# केवळ गुणांवर नव्हे तर शैक्षणिक कौशल्यांवर लक्ष द्या

## पंतप्रधान मोदींचा विद्यार्थ्यांना सल्ला

◆ **नवी दिल्ली, ६ फेब्रुवारी**

विद्यार्थ्यांनी शिक्षणाला दडपण न मानता गुणांऐवजी शैक्षणिक कौशल्ये प्राप्त करण्यावर लक्ष केंद्रीत करावे, असा सल्ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला आहे. ते 'परीक्षा पे चर्चा-२६' या कार्यक्रमात ते बोलत होते.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना पंतप्रधान म्हणाले की, "परीक्षेला उत्सवाप्रमाणे साजरे करा तसेच 'परीक्षा योद्धा' व्हा, परीक्षेला न घाबरता धैर्याने तोंड द्या. आता विद्यार्थी गेल्या १० वर्षातील पेपरमधील प्रश्न वाचून परीक्षेला येतात. यामुळे अभ्यासक्रमापेक्षा वेगळा प्रश्न आला की त्यांना परीक्षा कठीण वाटते. परीक्षा म्हणजे आयुष्य नाही तर आयुष्य सुधारण्याचे एक साधन आहे. डाटा स्वस्त मिळतो म्हणून सतत इंटरनेटचा वापर करणे चुकीचे आहे. तसेच मनोरंजनासाठी त्याचा वापर केल्याने अभ्यासावर परिणाम होतो."

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मुलांनी यावेळी विविध वस्तू भेट म्हणून दिल्या. यात त्यांचे एक चित्र, हस्तनिर्मित पुष्पगुच्छ, पूर्नप्रक्रिया वस्तूंपासून तयार केलेली वीणा, पारंपारिक मिठाई, आसामी गमोसा (गमछा) यांचा समावेश आहे तसेच सेंद्रिय चहाही भेट दिला. यावर पंतप्रधान मोदींनी एका चहा विक्रेत्याला चहा देत आहे, अशी कोटी देखील केली. विद्यार्थ्यांनी मोदींना त्यांच्या जीवनाबद्दल अनेक महत्त्वाचे प्रश्न विचारले. 'परीक्षा पे चर्चा' च्या नवव्या पर्वाचे संसद परिसरातील बाल योगी सभागृहातही थेट प्रक्षेपण करण्यात आले. २०१८ मध्ये सुरू झालेला हा कार्यक्रम सुरुवातीला टाऊनहॉल स्वरूपातील विद्यार्थी संवाद म्हणून सुरू झाला आणि नंतर तो भारतातील सर्वात मोठ्या शिक्षण संवाद कार्यक्रमांपैकी एक झाला. ◂(वृत्तसंस्था)


**पंतप्रधान मोदींचे 'परीक्षा मंत्र'**

**प्रतिस्पर्धा स्वत:शी करा, दुसऱ्याशी नाही.**

**'डिजिटल फास्टिंग' : तंत्रज्ञानाचा योग्य वापर करा.**

**कठीण कामे पहिले करा.**

**परीक्षा वॉरियर व्हा, पोपटपंची करू नका.**



CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# ...इतिहासातील काळी पानेच वाढतील

राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावरील चर्चेच्या वेळी लोकसभेत या आठवड्यात झालेला गोंधळ देशातील तमाम जनतेला वेदना देणारा आहे. लोकसभेत काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांच्या सदस्यांचे असंसदीय वर्तन 'गाढवांचा गोंधळ आणि लाथांचा सुकाळ' या म्हणीची आठवण करून देणारा म्हणावा लागेल. लोकसभेत यावेळी झालेला गोंधळ हा संसदीय इतिहासातील काही पहिला गोंधळ नव्हता आणि तो शेवटचाही नसणार. संसदेच्या प्रत्येक अधिवेशनात गोंधळ ठरलेला असतो. गोंधळाला जबाबदार असलेल्या विरोधी पक्षांच्या सदस्यांना निलंबितही केले जाते. यावेळी काँग्रेसच्या आठ सदस्यांना निलंबित करण्यात आले. आजकाल निलंबित केलेल्या सदस्यालाही त्याचे फारसे वाईट वाटत नाही. आपले निलंबन तो मोठ्या अभिमानाने मिरवत असतो. गोंधळ आणि गदारोळाशिवाय संसदेचे अधिवेशन पार पडूच शकत नाही, असे गृहीत धरण्यासाठी परिस्थिती आहे. परंतु, जे काही घडले, ते कोणत्याही लोकशाहीवादी नागरिकास चिंतेत पाडेल असेच होते.

लोकशाहीत आजचे विरोधक उद्याचे सत्ताधारी असतात, तर आजचे सत्ताधारी उद्याचे विरोधक असतात, असे मानले जाते. त्यामुळे सभागृहात गोंधळ घालण्याची संधी आलटून-पालटून सर्वांनाच मिळत असते. यावेळी काँग्रेसच्या सदस्यांनी घातलेला गोंधळ मात्र लोकसभेसारख्या राष्ट्रीय सभागृहाच्या मर्यादा तसेच प्रतिष्ठेचे चिरहरण करणारा तसेच संसदीय लोकशाहीची प्रतिष्ठा धुळीस मिळवणारा होता. ज्या जनतेने काँग्रेसच्या अशा सदस्यांना निवडून दिले, त्यांना आपण कशा दिवट्या आणि नतद्रष्ट माणसांना निवडून दिले, असे या सदस्यांचे सभागृहातील वर्तन पाहून वाटत असेल. अध्यक्ष वा सभापतींच्या आसनासमोरील मोकळ्या जागेत येऊन पोस्टर्स फडकवणे, घोषणा देत कामकाजात अडथळा आणणे हे संसदीय प्रथा आणि परंपरेच्या विरोधात असले तरी त्याची सवय झालेली होती. पण अलिकडे लोकसभेत जे काही घडले, ते इतकेच नव्हते. त्याच्याही पलीकडचे होते. विरोधकांना सरकारच्या चुकीच्या धोरणांना-निर्णयांना विरोध करण्याचा, सरकारचा निषेध करण्याचा आणि त्यासाठी रस्त्यावर उतरून आवश्यकतेप्रमाणे निदर्शने आणि आंदोलन करण्याचा निश्चितपणे अधिकार आहे. पण लोकसभा वा राज्यसभेला रणांगण बनवण्याचा अधिकार त्यांना नाही. तसा तो कुणालाही नाही. लोकसभेत चर्चा करून आपल्या मतदारसंघातील तसेच देशातील प्रश्न मांडण्यासाठी जनतेने या लोकप्रतिनिधींना निवडून दिले आहे. संसदेचे सभागृह चर्चेसाठी असते. ते कायदा बनवणारे देशातील सर्वोच्च व्यासपीठ आहे. कायदा बनवणाऱ्या या सभागृहात काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांच्या सदस्यांनी कायदाच पायदळी तुडवला. या सदस्यांचे वर्तन महाविद्यालयीन निवडणुकीच्या वेळी हुल्लडबाजी करणाऱ्या विद्यार्थ्यांपेक्षा वेगळे नव्हते.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचा अट्टहास या सगळ्या गोंधळाला कारणीभूत आहे, असे म्हटले पाहिजे. माजी लष्करप्रमुख जनरल मनोज नरवणे यांच्या अप्रकाशित पुस्तकातील मजकुराचा सभागृहात उल्लेख करण्यापासून सभापतींनी त्यांना रोखले होते. संसदीय सभागृहात पीठासीन अधिकाऱ्याचा निर्णय अंतिम असतो. पण त्यांच्या निर्देशांचे वारंवार उल्लंघन करीत त्याबाबत उल्लेख करण्यावर राहुल गांधी अडून बसले. त्यामुळे राहुल गांधी यांना स्वत:चेही भाषण पूर्ण करता आले नाही. त्यांनी अन्य सदस्यांनाही भाषण करू दिले नाही. सभागृहाचे कामकाज वारंवार स्थगित करावे लागल्यामुळे प्रश्नोत्तराच्या तसेच शून्य तासाचे कामकाज होऊ शकले नाही. यामुळे सभागृहात तयारी करून येणाऱ्या सदस्यांची निराशा झाली. त्यांना आपल्या मतदारसंघातील जनतेचे मुद्दे सभागृहात मांडता आले नाहीत. राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावर झालेल्या चर्चेला पंतप्रधान उत्तर देत असतात, त्यानंतर हा प्रस्ताव पारित केला जातो. पण यावेळी लोकसभेत पंतप्रधानांच्या चर्चेच्या उत्तराच्या भाषणाशिवायच हा प्रस्ताव पारित करावा लागला. हा एक प्रकारे राष्ट्रपतींचा अपमान आहे. आपल्या राष्ट्रपती महिला आहेत. काँग्रेसने एका महिलेचा अपमान केला, असा अर्थ राहुल गांधी यांच्या वर्तनावरून काढणे शक्य आहे. काँग्रेसने हेही लक्षात ठेवले पाहिजे की, त्या पक्षाचे नेतृत्वही आतापर्यंत एका महिलेकडे होते. त्यामुळे काँग्रेसचे हे वर्तन जास्त आक्षेपार्ह ठरते. राहुल गांधी यांना जो मुद्दा मांडायचा होता, तो ते अन्य संसदीय आयुधांच्या माध्यमातूनही मांडू शकले असते. परंतु, राहुल गांधी यांचा उद्देश सभागृहाचे कामकाज सुरळीत चालविण्याऐवजी कामकाजात अडथळा आणण्याचाच जास्त दिसत होता. त्यांचे वर्तन डिवचणे आणि चिडविण्याच्या थाटातले होते. अशा स्थितीत, पंतप्रधान नरेंद्र मोदी चर्चेचे उत्तर देणार असताना काँग्रेसच्या सदस्यांनी सत्ताधारी बाकांच्या बाजूला पंतप्रधानांच्या आसनाच्या दिशेने धाव घेत आणि बॅनर फडकवत त्यांना घेराव घालण्याचा जो प्रकार केला, त्याचे कोणत्याही स्थितीत समर्थन करता येत नाही. यामुळे पंतप्रधानांच्या सुरक्षेला गंभीर धोका उत्पन्न होण्याची शक्यता होती. लोकसभा सभापती ओम बिर्ला यांनी आपल्या वक्तव्यात हीच भीती व्यक्त केली. मुळात काँग्रेसच्या आणि त्यातही त्यांच्या महिला सदस्यांचा आवेश पाहून काही तरी अप्रिय घटना घडणे अशक्य नव्हते. ओम बिर्ला ज्या अप्रिय प्रसंगाचा उल्लेख करतात, तो पंतप्रधानांच्या जिवाला काँग्रेस सदस्यांकडून होणारा संभाव्य धोका होता. विरोधी पक्ष नेते म्हणून राहुल गांधी यांनी आपल्या सदस्यांना आवरायला हवे होते, पंतप्रधानांच्या आसनाजवळ जाण्यापासून रोखायला हवे होते. पण राहुल गांधी यांची या साऱ्या प्रकाराला चिथावणी होती, असे घटनाक्रमावरून दिसून येते. राज्यसभेचे नेते जे. पी. नड्डा यांनी राहुल गांधी यांचा उल्लेख उपरोधाने 'अबोध बालक' असा केला असला तरी हे बालक अबोध नाही तर मोठे घातक दिसत आहे. राहुल गांधी यांनी काँग्रेस पक्षाला तर ओलिस धरले आहे. आता त्यांना संसदेलाही ओलिस धरायचे होते, असे म्हटले तर ते चूक ठरू नये. त्यामुळे अशा घातकी बालकाला काँग्रेसचे ज्येष्ठ आणि श्रेष्ठ अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांनी आवरावे, असे आवाहन संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांना करावे लागले.

काँग्रेसमध्ये आतापर्यंत अनेकांनी विरोधी पक्षनेतेपद सांभाळले, पण या पदाचे जेवढे अवमूल्यन राहुल गांधींनी केले, तेवढे याच्या आधी दुसऱ्या कोणी केले नाही. राहुल गांधी ही गांधी घराण्यासाठीच नाही तर काँग्रेस पक्षासाठीही मोठी डोकेदुखी झाली आहे. काँग्रेसमधील नेत्यांची स्थिती सहन करता येत नाही आणि सांगताही येत नाही, अशी झाली आहे. राहुल गांधी म्हणजे काँग्रेस पक्षासाठी अडचणीच्या जागेचे दुखणे झाले आहे. सांगता येत नाही आणि दुर्लक्षितही करता येत नाही असे हे दुखणे. राहुल गांधी यांच्या अशा मनमानी आणि अनिर्बंध वागणुकीला कंटाळूनच आतापर्यंत अनेक नेत्यांनी काँग्रेस पक्षाला रामराम ठोकला. तरीही काँग्रेसला आणि त्याच्या नेतृत्वाला शहाणपण येत नाही, याचे आश्चर्य वाटते. संसदेत सदस्यांना विशेषाधिकार असल्यामुळे काँग्रेस सदस्य यावेळी बचावले आहेत. संसदेच्या सभागृहाबाहेर त्यांनी अशी कृती केली असती तर कदाचित कठोर कायदेशीर कारवाई त्यांच्यावर झाली असती. लोकसभेच्या गोंधळी पृष्ठभूमीवर ज्येष्ठांचे सभागृह असलेल्या राज्यसभेचे वर्तन प्रतिष्ठेला साजेसे राहिले. राज्यसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावर जवळपास चार दिवस प्रदीर्घ चर्चा झाली आणि या चर्चेला पंतप्रधान मोदी यांनी खणखणीत आणि सणसणीत उत्तर दिले. ''काँग्रेस माझी कबर खोदण्याच्या मागे लागली आहे'', असा जो आरोप मोदी यांनी केला, त्यावर काँग्रेस सदस्यांचे लोकसभेतील अनियंत्रित वर्तन पाहून विश्वास बसतो. टीकेचा-आरोपाचा अधिकार असूनही विरोधकांच्या वर्तनात विधायकता अपेक्षित आहे. संसदीय मूल्यांचा सन्मान अपेक्षित आहे. या अधिवेशनातील काँग्रेस सदस्यांचे वर्तन कोणत्याही अर्थाने संसदीय परंपरांचा सन्मान करण्याचे नव्हते. उलट ते सभ्यतेच्या संकेतांच्या विरोधात जाणारे होते. विरोधी पक्ष म्हणून काँग्रेस असे घातकी नवीन पायंडे घालून देण्याचा प्रयत्न करीत असेल तर काँग्रेसच्या नावे आधीच असलेली इतिहासातील काळी पानेच वाढतील. बाकी पक्ष वाढण्याचा प्रश्नच उद्भवत नाही!

## यंगिस्तान

# यांना माणूस तरी का म्हणावे?

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

'बिलिंक ट्वाइस' हा २०२४ सालचा एक सायकॉलॉजिकल थ्रिलर चित्रपट आहे. या चित्रपटात स्लेटर किंग नावाचा एक टेक बिलियनिअर आहे, ज्याच्यावर कंपनीतील गैरकृत्याचे आरोप लागले आहेत. पण या आरोपांमुळेच त्याने कंपनी सोडली आणि त्यानंतर तो सुधारण्याचा प्रयत्न करतोय. तो काही सायकॉलॉजिकल सेशन्स अटेंड करतोय, जेणेकरून तो या सर्व गोष्टींतून बाहेर पडू शकेल आणि एक सज्जन माणूस म्हणून जगू शकेल. चित्रपटाची कथा फ्रिडा आणि तिची मैत्रीण जेसभोवती फिरते. त्या दोघी एका ग्लॅमरस इव्हेंटमध्ये वेट्रेस म्हणून काम करतात. तिथे तो बिलियनियर त्यांना भेटतो, त्यांची चांगली ओळख होते आणि तो त्यांना त्याच्या खाजगी आयलंडवर वीकेंडला येण्यासाठी आमंत्रित करतो. या आयलंडचं वर्णन दुसरा स्वर्ग असंच केलं जातं. लग्जरी, पार्टी, ड्रग्स, अल्कोहोल, सुंदर कपडे, अनलिमिटेड खाणं-पिणं सगळं काही इथे आहे. अतिशय सामान्य आयुष्य जगणाऱ्या फ्रिडा आणि जेसला हा स्वर्ग आवडतो. पण हा स्वर्ग पुढे नरकात बदलतो. त्यांचे फोन घेतले जातात आणि बाहेरच्या जगाशी संपर्क तुटतो. दिवसभर पार्टी चालते, पण रात्री भयानक गोष्टी घडतात; मुलींवर रात्री अमानुष असे लैंगिक अत्याचार होतात, शोषण केलं जातं. सकाळी उठल्यावर त्यांच्या आठवणी मिटवल्या जातात. कारण त्यांना ड्रग्ज दिलेलं असतं. रात्री काय घडलं हे त्यांना सकाळी आठवत नाही आणि त्या अगदी नॉर्मल वागू लागतात. हे या आयलंडवर अनेक वर्षांपासून सुरू असतं. लैंगिक अत्याचार झालेल्या मुलींना नंतर पुन्हा त्यांच्या जगात सोडलं जातं. पण त्यांना जाणीवच नसते की त्यांच्यासोबत नेमकं काय झालंय.

मानवता ही एक अशी संकल्पना आहे जी आपल्याला इतर प्राण्यांपासून वेगळी ठरवते. दया, करुणा, न्याय आणि नैतिकतेच्या आधारावर मानवता उभी आहे. आपल्याकडे 'दया, क्षमा, शांती तेथेचि देवाची वस्ती' असं म्हटलं जातं. पण जेव्हा आपण जगातील काही घटना पाहतो, तेव्हा हा प्रश्न मनात येतो की, काही लोकांना खरंच 'माणूस' म्हणायचे का? जेफ्री एपिस्टिन प्रकरण हे असेच एक काळे पान आहे. हे प्रकरण आणि या माणसाबद्दलची माहिती आणि त्याच्या काळ्या कारस्थानांची माहिती जसजशी समोर येत आहे, तसतसे थक्क करणारी, थरकाप उडवणारी तथ्ये समोर येत आहेत आणि आपल्याला प्रश्न पडतोय की खरोखर हे शक्य आहे काय? पण हे गुन्हे त्याने एकट्याने केलेले नाहीत. तर यात अशा व्यक्तींची नावे आली आहेत, ज्यांना आपण आदर्श मानतो. ज्यात श्रीमंत, प्रभावशाली लोक, नेते, कलाकार, प्रेरणा देणारे लोक या प्रकरणात गुंतलेले आहेत. बिल गेट्स यांचेही नाव आले होते. मात्र त्यांनी याबाबत खंत व्यक्त केलीय आणि आपण कधीही त्याच्या आयलंडवर गेलो नाही असे स्पष्टीकरण दिले. तसेच स्टीफन हॉकिंग, बिल क्लिंटन, चॉमस्की, ट्रम्प अशी अनेक नावे आहेत. अर्थात या सर्वांनीच गैरकृत्य केले असेल असे नव्हे. पण या गैरकृत्यामध्ये अनेक बड्या लोकांचा सहभाग आहे. हे गैरकृत्य करण्यासाठी एपिस्टिनने एक भव्य आयलंड घेतलं होतं. या आयलंडला लिटल सेंट जेम्स किंवा एपिस्टिन आयलंड म्हणतात.

एपिस्टिन हा एक श्रीमंत फायनान्शियर, ज्याचे जगातील अनेक मोठ्या व्यक्तींशी संबंध होते. त्याच्या आयुष्यात पैसा, सत्ता आणि विलास होता. पण या सगळ्या मागे लपलेली एक काळी बाजू होती, बाल लैंगिक शोषणाची. अमेरिकन न्याय विभागाने जारी केलेल्या दस्तावेजांमध्ये अनेक पीडितांच्या साक्षी आहेत. या पीडित, ज्या बहुतेक अल्पवयीन मुली होत्या, त्यांना जबरदस्तीने एपिस्टिनच्या जाळ्यात ओढले गेले. त्याच्या खाजगी बेटावर हे अत्याचार घडत होते. एका पीडितेने सांगितले की, तिला १४ वर्षांची असताना एपिस्टिनने भेटवस्तू देऊन फसवले आणि नंतर तिचे शोषण केले. असंही वाचण्यात आलं की, एपिस्टिनच्या पार्ट्यांमध्ये अल्पवयीन मुलींना जबरदस्तीने आणले जायचे. त्या मुलींना ड्रग्स देऊन, धमकावून शांत ठेवले जायचे. त्यांच्या शरीराशी खेळ खेळले जायचे, जणू की ते माणूस नसून, लहान मूल नसून एक खेळणं आहे. ते एक खेळणं आहे म्हणून ते त्या खेळण्याशी कसेही खेळायचे. मग खेळताना एखादं खेळणं तुटलं तर काय फरक पडतोय ना? या लहान मुलांना कळतही नसेल की त्यांच्यासोबत नेमकं काय घडतंय. त्यांच्या डोळ्यातील भीती, वेदना, सुटण्यासाठीची त्यांची धडपड - कल्पना करूनच मनाचा थरकाप उडतो. काही महिन्यांपूर्वी मुंबईत एका पीडित मुलीच्या वडिलांच्या वकिलांनी एका बड्या नेत्याच्या मुलावरही अशा प्रकारचे आरोप केले होते. त्या आरोपात किती तथ्य आहे, त्या आरोपाचे पुढे काय झाले, कुणास ठावूक. मात्र श्रीमंती म्हणजे शोषण, विकृतपणा असतो का? एक श्रीमंत माणूस चांगला सज्जन असू शकत नाही का? असा प्रश्न पडू लागला आहे. एपिस्टिनने एक संपूर्ण नेटवर्क तयार केले होते, ज्यात मुलींना रिक्रूट करणे, त्यांना लैंगिक बाहुली म्हणून प्रशिक्षण देणे आणि मग प्रभावशाली लोकांना 'भेट' म्हणून देणे. हे सेक्स ट्रॅफिकिंगचे एक मोठे प्रकरण आहे. आपल्या भारतातही अनेक मुली, मुलं अचानक बेपत्ता झाल्याची प्रकरणे समोर येतात. त्यांना सुद्धा अशाच कोणत्या तरी एपिस्टिनच्या बेटावर नेले जात असेल का? त्यांचेही असेच शोषण होत असेल का? कल्पना करूनच भीती वाटते. हे सर्व वाचताना मनात राग येतो, दुःख होते. त्या मुलींच्या आई-वडिलांना काय वाटले असेल? त्यांच्या बालपणाचे काय झाले असेल? अशी अनेक उदाहरणे आहेत. या प्रकरणातील दस्तावेज लाखो पानांमध्ये पसरलेले आहेत, ते वाचताना मन सुन्न होऊन जाते. अशा लोकांना माणूस म्हणणे हा मानवतेचा अपमान नाही का? कल्पना करा, एक लहान मुलगी, जिने अजून जग पाहिलेले नाही, तिला सत्ता आणि पैशाच्या जोरावर गुलाम बनवले जाते. तिच्या स्वप्नांचा चुराडा केला जातो, तिच्या बालपणाला चिरडले जाते. ती रडते, ओरडते, पण कोणी ऐकत नाही. कारण हे लोक 'मोठे' आहेत. राजकारणी, सेलिब्रिटी, उद्योगपती आहेत. एपिस्टिनच्या फाईल्समध्ये ज्या नावांचा उल्लेख आहे, ते जगभरातील अत्यंत प्रभावशाली, व्हाईट कॉलर लोक आहेत. श्रीमंती आली की विलास आलाच. पण हा विलास जेव्हा शोषण बनतो, तेव्हा त्या माणसाची खरी वृत्ती समोर येते. सोशल मीडियावर आणखी एक भयानक दावा करण्यात आला आहे, नरमांसभक्षणाचा... हा आरोप सिद्ध करणारा ठोस पुरावा सापडला नाही. पण वेश्याव्यवसाय, बलात्कार, बाल लैंगिक गुन्हेगारी, मानवी तस्करी या सर्व गोष्टी सिद्ध झाल्या आहेत. बरं, या गोष्टी एपिस्टिनसारख्या गुन्हेगाराने केल्या असत्या तरी समजू शकतो. पण त्याच्या गुन्हेगारीत अनेक तथाकथित सज्जन व पांढरपेशी लोक सामील आहेत. ''जे का रंजले गांजले, त्यांसि म्हणे जो आपुले. तोचि साधू ओळखावा, देव तेथेचि जाणावा'' ही शिकवण आपल्याला आपल्या संतांनी दिली आहे. आपल्याकडचे अनेक लोक पाश्चात्त्य जगताकडे बोट दाखवून पाश्चात्त्य जग भारतापेक्षा किती पुढारलेलं आहे असं दाखवतात. एपिस्टिन फाईल्सने त्या सर्व अतिउत्साही, भारतद्वेषी लोकांच्या कानाखाली सणकन जाळ काढलाय. आता जे तथ्य समोर येतेय त्यावरून या लोकांना माणूस तर म्हणता येतंच नाही, पण जनावरही का म्हणावं? शेवटी आपण अशा जगात राहतोय जिथे माणसाच्या वेशात वावरणारे राक्षस आहेत. हे राक्षस कधी कोणाच्या नरडीचा घोट घेतील सांगता येत नाही. पण कथेच्या शेवटी, राम रावणाचा वध करतो, या आशेवर जग तारलंय...

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**विजय कुळकर्णी**

# मराठी चित्रपटांनाही ओटीटीचा पडदा!

हिंदी पाठोपाठ आता मराठी चित्रपट निर्मात्यांनी देखील ओटीटी या समाजमाध्यमावर चित्रपट प्रदर्शित करण्याचा विचार केलेला दिसत आहे. ६ फेब्रुवारी रोजी 'आता वेळ झाली', हा मराठी चित्रपट अल्ट्रा झकास या ओटीटीवर प्रदर्शित झाला आहे. २०-२५ वर्षांपूर्वी अमरावती, नागपूर, अकोला या विदर्भातील शहरांमध्ये मोठ्या संख्येत चित्रपटगृहे होती. अकोल्यात एकेकाळी १० चित्रपटगृहे होती. आज पाच ते ६ चित्रपटगृहे सुरू आहेत. दूरदर्शनवर आठवड्यातून दोन दिवसच चित्रपट दाखविले जात होते. तेही जुने असायचे. त्यामुळे चित्रपटगृहांत सिनेमा लागला की, पहिल्या दिवशी पहिला शो पाहण्याची क्रेझ होती. तिकीट मिळविणे हा देखील मोठा अभिमानाचा विषय समजला जात होता. एखादा चित्रपट हिट झाला तर, तो कमीत कमी महिनाभर त्या चित्रपटगृहांतून उतरत नव्हता. शेगाव, काटेल कोलद, डव्हा, बहिरम, लोणी इत्यादी तीर्थक्षेत्रांच्या यात्रेत टुरिंग टॉकीज मोठ्या संख्येत येत होत्या. या चित्रपटगृहात निर्माते त्यांचे चित्रपट प्रदर्शित करण्याला प्राधान्य देत होते. मात्र, दादा कोंडकेंच्या मराठी चित्रपटांशिवाय इतर मराठी सिनेमांना रसिकांकडून तेवढा प्रतिसाद मिळत नव्हता. मात्र, मोबाईल आले. सुरुवातीला मोबाईलने दूरध्वनी संचाची जागा घेतली. टेक्स मॅसेज पाठविण्यासाठी त्याचा उपयोग होऊ लागला. त्यात क्रांती झाल्यावर आज प्रत्येकाच्या हाती अॅन्ड्रॉईड मोबाईल आहे. त्यावरून विविध प्रकारचे चॅनल्स सुरू झाले.



चित्रपट देखील त्यावर डाऊनलोड करून बघता येतात. दूरचित्रवाणीवरूनही नव्याने प्रदर्शित झालेले चित्रपट काही दिवसांतच दाखविले जात आहेत. त्यामुळे चित्रपटगृहांत जाऊन चित्रपट पाहणे कमी झाले. प्रेक्षकांची संख्या कमी झाल्याने अनेक चित्रपटगृहे बंद पडली. चित्रपटगृहांच्या जागेवर मॉल किंवा व्यापारी संकुल उभारले जात आहेत. मल्टिफ्लेक्स उभारण्यात आले. पूर्वी चित्रपटांच्या रिळ तयार केल्या जात होत्या. आता सॅटेलाईटद्वारे थेट चित्रपटगृहांत चित्रपट दाखविले जात आहेत. या तंत्रज्ञानाच्या उपयोगामुळे चित्रपट प्रदर्शनाचा खर्च कमी झाला असला तरी, तिकिटांचे दर वाढले आहेत. पत्नीला चित्रपट पाहण्यासाठी घेऊन जायचे तर, किमान एक हजार रुपये लागतात. युवक-युवती तर मोबाईलवर नवीन चित्रपट डाऊनलोड करून बघतात. त्यामुळे चित्रपटगृहांत जाऊन सिनेमा पाहणे टाळले जाते. इत्यादी कारणे निर्माते त्यांचे चित्रपट ओटीटीवर प्रदर्शित करण्याची असू शकतात. त्याचबरोबर मराठी चित्रपट निर्मात्यांना चित्रपटगृहात सिनेमा प्रदर्शित करणे त्यांच्या बजेटमध्ये बसत नसावे. तसेही, मराठी चित्रपटांना चित्रपटगृहे मिळत नाहीत, अशी निर्माते, कलावंतांची ओरड असते. त्याचप्रमाणे ओटीटीवर चित्रपट प्रदर्शित केल्यास तो करोडो प्रेक्षकांपर्यंत जातो. हा देखील फायदा या माध्यमांचा होत असलेला पाहूनही मराठी चित्रपट निर्माते या माध्यमावर आपला चित्रपट प्रदर्शित करण्याकडे वळले असावेत. मराठी चित्रपट निर्मितीला महाराष्ट्र सरकार अनुदान देखील देते. मराठी चित्रपटांना प्रोत्साहन मिळावे, हा त्यामागे उद्देश आहे. पण, काही निर्माते टुकार चित्रपट काढून केवळ शासकीय अनुदान लाटण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे शासनाचा अनुदान देण्यामागचा उद्देश सफल होताना दिसत नाही. चित्रपटापासून शासनाला करमणूक कराच्या माध्यमातून उत्पन्न मिळते. मात्र, सिनेमा निर्मितीचा उद्देश केवळ अनुदान मिळविणे एवढाच असेल तर, चित्रपट देखील दर्जाहीन केला जातो. त्यामुळे शासनाचा उद्देश सफल होत नाही. तेव्हा, प्रेक्षक पुन्हा चित्रपटगृहात आले पाहिजे यासाठी दर्जेदार मराठी चित्रपट तयार होणे अत्यंत आवश्यक आहे. निर्माता, दिग्दर्शक, अभिनेता, अभिनेत्री सोबतच चित्रपटाशी संबंधित सर्व कलाकार व पडद्यामागील तंत्रज्ञांनी ही जबाबदारी स्वीकारली पाहिजे. राज कपूर, राजकुमार, अमिताभ बच्चन, दिलीपकुमार, लक्ष्मीकांत बेर्डे, सचिन पिळगावकर, अशोक सराफ यांचा अभिनय असलेले चित्रपट आजही रसिकांचे आकर्षण आहेत. आजही दर्जेदार सिनेमा असेल तर, रसिक कितीही पैसे खर्च करून, कितीही दूर असलेल्या चित्रपटगृहात पाहण्यासाठी जातात. नुकताच धुरंधर हा चित्रपट प्रदर्शित झाला. या चित्रपटाने प्रचंड व्यवसाय केला. या चित्रपटाचे गारुड रसिकांच्या मनावर कायम आहे. अनेक जण त्यामध्ये अक्षय खन्नाच्या गाण्यावर रिल करीत आहेत. ओटीटीवर चित्रपट प्रदर्शित झाल्याने तो एकाचवेळी देश आणि विदेशात कमी खर्चात पाहिला जातो. हा फायदा जरी असला तरी, रसिकांनी चित्रपटगृहात जाऊन तो पाहावा, अशी निर्मिती होणे आवश्यक आहे.

८८०६००६१४९

## मुंबई वार्तापत्र

# पवारांचा नवा जावईशोध!

**नागेश दाचेवार**

राजकारणात बोलण्याचा अधिकार नेमका कुणाला असतो, हा प्रश्न सध्या महाराष्ट्राच्या राजकारणात नव्याने अवतरला आहे. विलीनीकरणाच्या चर्चेत देवेंद्र फडणवीस उपस्थित नव्हते, त्यामुळे त्यांना या विषयावर बोलण्याचा काय अधिकार?, असा सवाल ज्येष्ठ नेते शरद पवारांनी उपस्थित केला. ऐकायला हा सवाल अत्यंत तर्कशुद्ध, नैतिकतेचा झेंडा फडकावणारा वाटतो, पण जरा खोलात डोकावून पाहिलं, तर लक्षात येतं की हा तर्क सार्वत्रिक नसून तो केवळ निवडक लोकांसाठी आणि तेही निव्वळ राजकीय सोयीनुसार वापरला जातो, असे स्पष्टपणे लक्षात येते. कारण महाराष्ट्राच्या राजकारणात जे नेते सर्वाधिक बोलघेवडे म्हणून ओळखले जातात, जे सकाळपासून संध्याकाळपर्यंत प्रत्येक विषयावर, प्रत्येक निर्णयावर, प्रत्येक बैठकीवर आपली ठाम भूमिका मांडत असतात, ते बहुतांशी याच पवारसाहेबांच्या सहवासातले, पक्षातले किंवा राजकीय नातेसंबंधातलेच आहेत. अमेरिकेतील व्हाईट हाऊसपासून ते राज्यातील ग्रामपंचायतीपर्यंत काय चाललंय, हे सांगणारे हेच लोक असतात. तेव्हा कधीच असा प्रश्न उपस्थित होत नाही की तुम्ही त्या बैठकीत होतात का? किंवा तुम्हाला यावर बोलण्याचा अधिकार कुणी दिला? मग असे असताना पवारांनी हा नवा जावईशोध लावलाय् कुठून हा प्रश्न मात्र येथे उपस्थित होतो.

जर तिथे नव्हते म्हणून, त्यावर बोलण्याचा अधिकार नाही किंवा त्या विषयावर बोलू नका हा नियम स्वीकारायचा असेल, तर तो सर्वांनाच लागू व्हायला हवा. पण तसे होताना दिसत नाही. देशात घडणाऱ्या न्यायालयीन निर्णयांपासून ते परराष्ट्र धोरणापर्यंत, राज्यातील प्रशासकीय निर्णयांपासून ते केंद्रातील राजकीय हालचालींपर्यंत अनेक विषयांशी शरद पवार किंवा त्यांच्या गटाचा थेट काय, अप्रत्यक्षही संबंध नसतो. तरीही त्या प्रत्येक विषयावर सुप्रिया सुळे असोत, जयंत पाटील असोत किंवा इतर नेते असोत, एवढंच कशाला दस्तुरखुद्द शरद पवार असोत, रोज माध्यमांसमोर भूमिका मांडतच असतात. तेव्हा तर ही मंडळी जणू काही तेथे उपस्थित असल्याच्या आविर्भावातच बोलतात. त्यावेळी पवारांच्या मनात अरे, आपण तेथे उपस्थित नव्हतो, मग आपल्याला बोलण्याचा अधिकार नाही, असे वाटल्याचे दिसले नाही.

देवेंद्र फडणवीसांनी नेमकं काय म्हटलं होतं, ते पाहणं महत्त्वाचं आहे. त्यांनी कुठेही विलीनीकरणाची बैठक झाली असं ठाम विधान केलं नाही. त्यांनी कुठेही विलीनीकरण होऊ नये असेही म्हटले नाही. उलट राष्ट्रवादी काँग्रेस हा एक स्वतंत्र राजकीय पक्ष असून, त्यांना त्यांचे निर्णय घेण्याचा अधिकार आहे. त्यांनी घेतलेल्या निर्णयाला आमचा पाठिंबाच असेल. फडणवीसांनी एक सरळ, थेट आणि राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा प्रश्न उपस्थित केला. अजित पवार दोन-तीन वर्षांपासून आमच्यासोबत सत्तेत आहेत, महायुतीत निवडून आले आहेत, राष्ट्रवादीच्या त्यांच्या गटाचा प्रचार शिवसेना-



भाजपाने केला आहे. मग अजित पवार आम्हाला न सांगता विलीनीकरण करून सत्तेतून बाहेर पडणार होते का? हा प्रश्न तथ्यांवर आधारित आहे, कल्पनांवर नाही. अजित पवारांचा राष्ट्रवादी पक्ष हा आज सत्तेचा भाग आहे, हे कोणीही नाकारू शकत नाही. त्यांच्या गटाने महायुतीसोबत निवडणूक लढवली, हेही वास्तव आहे. त्यामुळे राष्ट्रवादी पक्ष जर अन्य दुसऱ्या पक्षात विलीन होण्याच्या विचारात असेल तर, अजित पवारांनी सत्तेतील पक्षांना अंधारात ठेवले नसते. याची कल्पना दिली असती. एवढा सोपा सरळ तर्क फडणवीसांनी सांगितला. आणि राजकीय चष्म्यातून बघितले तर, फडणवीसांनी बोललेलं अत्यंत तर्कशुद्ध आहे.

या प्रश्नाचा मथितार्थ फारच साधा आहे. एकतर दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार मग अजित पवार सत्तेतून बाहेर पडणार होते किंवा शरद पवार महाविकास आघाडीतून बाहेर पडणार होते. याशिवाय तिसरा पर्याय होता तरी कोणता? मात्र या प्रश्नांचं उत्तर देण्याऐवजी, तिथे नव्हते म्हणून फडणवीसांना बोलण्याचा अधिकार नाही असा मुद्दा पुढे केला जातो. हा मुद्दा प्रत्यक्ष प्रश्नाला बगल देणारा नाही का? अजित पवारांचं सोडा, आता शरद पवार आहेत ना... मग जे हयात आहेत त्यांच्यासाठी प्रश्न आहेत, विलीनीकरण करून, महाविकास आघाडीतून बाहेर पडून, तुम्ही सत्तेत जाणार होता का? तुम्ही आपल्या मुलीला केंद्रात मंत्री बनविणार होता का? तुम्ही स्वतः पुन्हा राज्यसभेवर जाण्याचे गणित जुळवत होता का? शरद पवारांनी आधी या प्रश्नांची उत्तरे महाराष्ट्राला द्यावी. या प्रश्नांच्या उत्तरांपुढे मग फडणवीसांनी या विषयावर बोलावे की नाही हा दुय्यम विषय ठरतो.


इथेच राजकीय दुहेरी निकष ठळकपणे दिसतात. कारण हाच निकष जर लावायचा असेल, तर संजय राऊत या चर्चेत कुठे होते, हेही विचारावं लागेल. बैठकीचा व्हिडीओ पाहिल्यावर राऊत कुठेही दिसत नाहीत. तरीही ते रोज या विषयावर आपला भोंगा वाजवताना दिसत आहेत. इतकंच नाही, तर व्हाईट हाऊसमध्ये काय चाललंय, यापासून ते देशाच्या अंतर्गत सुरक्षेपर्यंत, राऊत दररोज माहिती देत असतात. तेव्हा शरद पवारांनी कधी असं म्हटलं का की राऊत तुम्ही तिथे नव्हता, त्यामुळे तुम्हाला बोलण्याचा अधिकार नाही. पवारांनी राऊतांना का बजावलं नाही? कारण राऊत हे तुमचे मानसपुत्र म्हणून ओळखले जातात, म्हणून त्यांच्यासाठी वेगळा नियम? की त्यांच्या वक्तव्यांचा उपयोग विशिष्ट राजकीय अजेंडा पुढे नेण्यासाठी होतो, म्हणून त्यांना मोकळीक? जर बैठकीत उपस्थित नसणं हा बोलण्याचा निकष असेल, तर हा नियम अचानक देवेंद्र फडणवीसांपुरताच का? सर्वांवर लागू व्हायला हवा ना. अन्यथा हा निकष नाही, तर निव्वळ राजकीय सोयीने घेतलेली वेळमारू भूमिका होय, असे म्हणायला हरकत नाही. कारण शरद पवार स्वतः केंद्र सरकार किंवा राज्य सरकार यांच्या निर्णयांवर प्रत्यक्ष त्या बैठकीत उपस्थित नसताना देखील खुल्लम खुल्ला वक्तव्यं, टीका आणि भूमिका मांडत बोलत आल्याची अनेक उदाहरणं आहेत. खरं तर देवेंद्र फडणवीसांचा सवाल हा राजकीय शिष्टाचाराचा नाही, तर सत्तेतील स्थैर्याचा आहे. अजित पवारांसारखा महत्त्वाचा घटक जर कोणतीही चर्चा न करता वेगळा निर्णय घेणार असेल, तर सत्तेत असलेल्या सहकाऱ्यांना प्रश्न विचारण्याचा पूर्ण अधिकार आहे. हे लोकशाहीत गैर नाही, तर आवश्यक आहे. पण फडणवीसांनी केलेल्या दाव्याला उत्तर देण्याऐवजी, वैयक्तिक पातळीवर ते तिथे नव्हते त्यामुळे त्यांना बोलण्याचा अधिकार नाही, असे म्हणून, मूळ मुद्याला टाळण्याचा, बगल देण्याचा प्रयत्न नाही तर दुसरं काय म्हणायचं याला? शेवटी एकच प्रश्न उरतो, जर बोलण्याचा अधिकार फक्त बैठकीत उपस्थित असलेल्यांनाच असेल, तर महाराष्ट्राच्या राजकारणात दररोज जे बोलणारे आहेत, त्यातले निम्मे लोक गप्प बसायला हवेत. सकाळचा ९ चा भोंगा बंद व्हायला हवा. किंबहुना शरद पवारांना अलिकडेच उपस्थित असलेल्यांनीच बोलावे अशी उपरती आली असल्याने, त्यांनी आता इथून पुढे हा भोंगा थांबवायला हरकत नाही. पण तसं होणार नाही. कारण हा नियम तत्त्वाचा नाही, तर सोयीचा आहे. आणि सोयीचं राजकारण किती काळ टिकतं, हे महाराष्ट्राने अनेकदा पाहिलं आहे. तरीदेखील साहेबांचा शब्द हा महत्त्वाचा असतो, त्यामुळे प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी आता यापुढे कोणत्याही पत्रकार परिषदेची सुरुवात आपण तेथे उपस्थित होता का? या प्रश्नाने केली पाहिजे. आणि नसल्यास आपल्याला बोलण्याचा अधिकार नाही, असे ठामपणे बजावून सांगितले पाहिजे.

९२७०३३३८८६

### नळगंगा-वैनगंगा प्रकल्पात गोसीखुर्दचे पाणी

वैनगंगा नदीवरील गोसीखुर्द (इंदिरासागर) राष्ट्रीय प्रकल्पातून तापी उपखोऱ्यामधील नळगंगा नदीवरील प्रकल्पात सुमारे १८०४ दलघमी पाणी वळविण्यात येणार आहे. त्यामुळे विदर्भातील भंडारा, नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, वाशीम व बुलढाणा या ८ जिल्ह्यांमध्ये सुमारे ४ लाख ४ हजार २८१ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणता येणार आहे. याशिवाय, औद्योगिक तसेच घरगुती पाणी वापराच्या सुविधाही मोठ्या प्रमाणात निर्माण होणार आहेत. या प्रकल्पाचे काम वर्षभरात सुरू होणार आहे.

या प्रकल्पास २०२४ मध्ये राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी मिळाली आहे. सुमारे ९४ हजार ९१२ कोटी रुपये किमतीचा प्रकल्प अहवाल मे. सिएन्सिस टेक लिमिटेड या कंपनीने तयार केला असून तो शासनाकडे प्रशासकीय मान्यतेसाठी पाठविला आहे. उपरोक्त प्रकल्प फार महत्त्वाकांक्षी आहे, असे जाणवते. गोसीखुर्द प्रकल्पासाठी १९८४ मध्ये ४८४ कोटींची प्रशासकीय मान्यता मिळाली होती. गोसीखुर्द प्रकल्पामुळे २.५ लक्ष हेक्टर



जमीन सिंचनाखाली येणार आहे. या प्रकल्पाची आजची सुधारित किंमत जवळपास २० हजार कोटी रुपये झाली आहे. गोसीखुर्द प्रकल्पाच्या कामाला जवळपास ४० वर्षे पूर्ण होऊनही अद्याप पूर्ण २.५ लाख हेक्टर जमिनीचे सिंचन होऊ शकलेले नाही. नळगंगा वैनगंगा प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता मिळणे अगोदर गोसीखुर्द प्रकल्पाची मूळ किंमत, काम पूर्ण होण्यास लागलेला कालावधी व त्याची सुधारित किंमत याची तुलना नळगंगा वैनगंगा प्रकल्पाची आजची किंमत, प्रकल्प पूर्ण होण्यास लागणारा कालावधी व प्रकल्पाची सुधारित किंमत याची तुलना करणे आवश्यक वाटते. नळगंगा वैनगंगा प्रकल्प पुढच्या वर्षी सुरू होणार असे म्हटले आहे. या प्रकल्पाला शासनाची प्रशासकीय मान्यता मिळण्या अगोदर ४ लाख ४ हजार २८१

## वाचक पत्रे

जमीन सिंचनाखाली आणण्याकरता काही मध्यम व लघु प्रकल्प हाती घेतल्यास, कमी किमतीत, कमी कालावधीत विदर्भाचे सिंचन क्षेत्र वाढू शकते का याचा अभ्यास होणे जरुरी आहे. उपरोक्त आकडेवारीवरून मध्यम व लघु पाटबंधारे प्रकल्प हे आर्थिकदृष्ट्या जास्त फायदेशीर ठरतील असे वाटते.

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

••••

### पाकिस्तानातील लोकशाही दुर्बलच

भारताचे शेजारी राष्ट्र असलेल्या पाकिस्तानमध्ये सध्या सुरू असलेल्या घडामोडी तेथील उरलीसुरली लोकशाही संपवून टाकण्याच्या हालचाली असल्याचे दर्शवीत आहेत. अलिकडेच झालेल्या घटना दुरुस्तीमुळे तेथील लष्करशाही आणखी मजबूत आणि मुजोर होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी त्यांना ज्यांच्या मेहरबानीमुळे हे पद प्राप्त झाले त्यांची चांगलीच परतफेड चालवली आहे. आधीच मर्यादित असलेली तेथील लोकशाही आणखीनच संकुचित होताना दिसत आहे. यामध्ये पाकिस्तानी संसदही लोकशाहीला संपवण्याच्या मोहिमेत सहभागी असल्याचे चित्र आहे. अलिकडेच झालेल्या सत्ताविसाव्या घटना दुरुस्तीमध्ये जनरल असीम मुनीर यांना बरेच अधिकार प्राप्त होणार आहेत. मागे अशाच घटना दुरुस्तीच्या निर्णयाचा विरोध करण्यासाठी पाकिस्तानातील लोकशाहीवादी जनता रस्त्यावर उतरली होती. आताही तशीच शक्यता व्यक्त केली जात आहे. पाकिस्तानी राजकीय नेते कायम लष्कराच्या हातचे बाहुले होत आले आहेत. अजूनही त्यात फारसा फरक पडावयास तयार नाही. अमेरिकेसारख्या युद्धखोर राष्ट्राकडून कायम आर्थिक मदत घेण्याकडे पाकिस्तानचा कल राहिला आहे. आता चीनकडूनही पाकिस्तानचे नेते आपली झोळी भरून घेताना दिसत आहे.

चीन आणि अमेरिकेसारखे देश दिलेल्या मदतीची पुरेपूर वसुली करीत असतात. अशा स्थितीत पाकिस्तानमधील लोकशाही अधिकाधिक दुर्बल करण्याच्या प्रयत्नांत तेथील लष्कराची हुजरेगिरी करणारे सत्ताधारी नेते आहेत. पाकिस्तानी सरकारकडून कधीही लोकाभिमुख योजना राबवली गेल्याचे ऐकिवात नाही. सर्वसामान्य नागरिकांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर तेथील राजकारणी कधीही गंभीर असल्याचे जाणवले नाही. प्रगत राष्ट्रांकडून मिळालेल्या अब्जावधी रुपयांच्या मदत निधीचा वापर दहशतवाद पोसण्यासाठीच होत आला आहे. पाकिस्तानने त्याऐवजी जनहिताकडे लक्ष दिल्यास त्यांना वारंवार मदतीची याचना करण्याची वेळ येणार नाही. परंतु, ऐशोआराम आणि चंगळवादी आयुष्याची सवय जडलेल्या शाहबाज सरकारला लोकशाहीची मान लष्कररूपी कसायाच्या हाती सोपवण्याची घाई झाल्याचे स्पष्ट होते.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अॅड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स अॅप क्रमांकावर पाठवावा.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



## विधी व्यवसाय केवळ उपजिविकेचे साधन नाही : ॲड. आळंगे

**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**

विधी व्यवसाय हा केवळ उपजीविकेचे साधन नसून दुर्बल घटकांना न्याय देण्याचे प्रभावी माध्यम आहे. तरुण वकिलांनी सातत्यपूर्ण अभ्यास, संयम, नैतिकता व न्यायालयाविषयी आदर ठेवावा, ज्येष्ठांकडून शिकण्याची वृत्ती कायम ठेवावी, असे प्रतिपादन ॲड. व्ही.एस.आळंगे यांनी केले. बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र व गोवाच्या वतीने देशाचे माजी मुख्य न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या हस्ते ॲड.व्ही.एस. आळंगे यांना 'सिनियर ॲडव्होकेट' या सर्वोच्च पदाने गौरविण्यात आल्याबद्दल सोलापूर बार असोसिएशनतर्फे आयोजित केलेल्या सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते. व्यासपीठावर जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंग रजपूत, सोलापूर बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड.बाबासाहेब जाधव, उपाध्यक्ष ॲड.रियाज शेख, सचिव ॲड.बसवराज हिंगमिरे, सहसचिवा ॲड.मीरा प्रसाद, खजिनदार ॲड.अरविंद देडे उपस्थित होते. ॲड.प्रदीपसिंग रजपूत, ॲड.बाबासाहेब जाधव, ॲड.रियाज शेख, ॲड.सरोजिनी तमशेट्टी, ॲड.शिवानंद गंजी, ॲड.मैत्रेयी सोलनकर, ॲड.राजेंद्र फताटे, ॲड. हिराचंद अंकलगी, ॲड.विक्रमसिंग काटुळे, ॲड.महादेव जवळगी, ॲड.अशोक जालादी, ॲड.लक्ष्मण मारडकर आदींनी मनोगत व्यक्त केले. ॲड. बसवराज हिंगमिरे यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी ॲड. व्ही.पी. शिंदे, ॲड.रविंद्र पाटील, ॲड.मनोज पामुल, ॲड.विद्यावंत पांढरे, ॲड.अभय बिराजदार, ॲड.मल्लिनाथ पाटील, ॲड.शुभम माने, ॲड.सागर स्वामी, ॲड.भारत उजळंबे, ॲड.शर्मिला देशमुख, ॲड. नंदिनी किणीकर, ॲड.गणेश माशाळे, ॲड.संतोष म्हमाणे, ॲड.संजय पवार, ॲड.विनयकुमार कटारे, ॲड.निदा सैफन, ॲड.अंजली बाबरे, ॲड.चंद्रसेन गायकवाड आदी उपस्थित होते.

## जुन्या दत्त मठात होमहवन, पालखी व मिरवणूक

**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**

श्रीमन् नृसिंह सरस्वती महाराज यांच्या अवतारसमाप्ती दिनानिमित्त सोलापूरच्या घोंगडे वस्ती येथील जुन्या श्री दत्त मठात धार्मिक कार्यक्रम मोठ्या भक्तिभावात पार पडले. पूर्व भागातील ३० श्री दत्त भक्तांच्या समूहाने या पावन दिनाचे औचित्य साधत सहा फुटी श्रीमन् नृसिंह सरस्वती महाराजांची भव्य प्रतिमा मठास भेट दिली. या निमित्ताने पालखी, प्रतिमा मिरवणूक, होमहवन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.दरम्यान, याच पार्श्वभूमीवर पूर्व भागातील श्री दत्त मंदिर येथून पारंपरिक वाद्यांच्या गजरात श्री दत्त महाराजांची पालखी व प्रतिमा मिरवणूक काढण्यात आली. संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणात दुमदुमून गेला होता. ही मिरवणूक सकाळी साडेअकराच्या सुमारास घोंगडे वस्ती येथील जुना श्री दत्त मठात पोहोचली. त्यानंतर मठात विधीवत होमहवनास सुरुवात झाली. पंतुलु बालराज दोंतुल यांच्या मंत्रोच्चारात पाच दांपत्यांनी होमहवन करून विर्धावत पूजन केले. यावेळी सहा फुटी श्रीमन् नृसिंह सरस्वती महाराजांच्या प्रतिमेचेही विधीवत पूजन करण्यात आले. दुपारी १ ते सायंकाळी ५ या वेळेत सुमारे ८०० भक्तांनी महाप्रसाद घेतला. माघ वद्य प्रतिपदा ही गुरूप्रतिपदा म्हणून ओळखली जाते. याच तिथीला भगवान श्री दत्तात्रेयांचे अवतार असलेले श्रीमन् नृसिंह सरस्वती महाराजांनी गाणगापूर येथे भक्तांच्या कल्याणासाठी पादुका स्थापन करून कर्दळीवनात गुप्तवास स्वीकारला होता. तेव्हापासून हा दिवस गाणगापूरसह सर्व दत्त पीठांमध्ये अवतारसमाप्ती दिन म्हणून साजरा केला जातो. अशी माहिती पंतुलु बालराज दोंतुल यांनी दिली.

# सोलापूर विमानतळ 'दिवसा-पुरता'च का?

**नाईट लँडिंग अभावामुळे प्रवासी व व्हीआयपींच्या जीवितास धोका**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ फेब्रुवारी-**

सोलापूरसारख्या महत्त्वाच्या जिल्ह्याच्या विमानतळावर अद्याप (आय. एल. एस.) तसेच नाईट लँडिंग व टेकऑफ सुविधा उपलब्ध नसल्याने प्रवासी, वैमानिक, तसेच व्हीआयपी व व्हीव्हीआयपींच्या जीवितास मोठा धोका निर्माण झाल्याचा गंभीर मुद्दा पुढे आला आहे. या संदर्भात सोलापूर विकास मंचचे सदस्य विजय कुंदन जाधव यांनी दाखल केलेल्या सार्वजनिक तक्रारीला उत्तर देताना नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने धक्कादायक माहिती उजेडात आणली आहे.

वाहतूक महासंचालनालयाच्या उत्तरानुसार, सोलापूर विमानतळाला सध्या केवळ (व्हि.एफ.आर.) अंतर्गत म्हणजेच फक्त दिवसा विमानसेवा चालविण्याचा परवाना देण्यात आला आहे. त्यामुळे नियमानुसार नाईट लँडिंग सुविधा बंधनकारक नसल्याचे डी.जी. सी.ए.ने स्पष्ट केले. मात्र, या उत्तरातून आणखी गंभीर बाब समोर आली असून, सोलापूर विमानतळावर बसवण्याचा नाईट लँडिंगचा कोणताही प्रस्ताव विमानतळ प्राधिकरणाकडून आजपर्यंत सादरच करण्यात आलेला नाही.

या पार्श्वभूमीवर विजय कुंदन जाधव यांनी एक प्रत्यक्ष अनुभव सांगत या विषयाची गांभीर्याने दखल घेण्याची गरज अधोरेखित केली. १५ जून २०२५ रोजी सोलापूर-गोवा 'फ्लाय ९१' विमानसेवेच्या उद्घाटनप्रसंगी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे मुंबईहून सोलापूरकडे येणार होते. मात्र, सोलापूर विमानतळावर कमी दृष्यमानता असल्याने ते सोलापूरला उतरू शकले नाहीत आणि कार्यक्रमास गैरहजर राहावे लागले. नंतर मात्र स्टार एअरच्या सोलापूरमुंबई विमानसेवेच्या उद्घाटनासाठी मुख्यमंत्री उपस्थित राहिले.

आधुनिक लँडिंग सुविधांचा अभाव किती गंभीर परिणाम घडवू शकतो, याचे हे जिवंत उदाहरण आहे. जाधव म्हणाले, ''जिथे वारंवार व्हीआयपी, शासकीय व आपत्कालीन विमानांची ये-जा असते, त्या सोलापूर विमानतळावर केवळ दिवसा ऑपरेशन्स ठेवणे ही गंभीर निष्काळजीपणाची बाब आहे. अलीकडील विमान अपघातांच्या पार्श्वभूमीवर प्रतिबंधात्मक सुरक्षा उपाय करणे ही प्रशासनाची थेट जबाबदारी आहे. डी.जी.सी.ए.ने तांत्रिक कारणे सांगून जबाबदारी विमानतळ प्राधिकरणाकडे ढकलली असली, तरी विमानतळ प्राधिकरणाकडून प्रस्तावच न पाठवणे हे स्पष्ट प्रशासकीय अपयश आहे.

# विडी कामगारांना किमान वेतनाची अंमलबजावणी करा; अन्यथा तीव्र आंदोलन

**कामगार आयुक्तांना दिले निवेदन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**

सोलापुरातील महिला विडी कामगारांना गेल्या अनेक वर्षापासून किमान वेतनाप्रमाणे मजुरी दिली जात नाही म्हणून सहा. कामगार आयुक्त या नात्याने महिला विडी कामगारांना किमान वेतनाची अंमलबजावणी करण्याचे आदेश उत्पादक कारखान्यांना द्या; अन्यथा विडी कामगार किमान वेतन हक्क कृती समितीच्यावतीने रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करील, असा इशारा किमान वेतन हक्क कृती समितीने दिला आहे.

विडी कामगार हक्क कृती समितीच्या वतीने सहा. कामगार आयुक्त निवेदन दिले. यावेळी विष्णु कारमपुरी, सायबण्णा तेग्गेळी, गोवर्धन संचू, राहुल गुजर यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देणा-या शिष्टमंडळात रेखा आडकी, शोभा



पोला, लक्ष्मीबाई कोतलापुरे, विठ्ठल कुराडकर, पप्पू शेख, गुरुनाथ कोळी, श्रीनिवास बोगा आदी उपस्थित होते. निवेदनात असे नमूद आहे, सोलापुरातील महिला विडी कामगारांना किमान वेतन गेल्या अनेक वर्षापासून मिळत नाही. याबाबत महाराष्ट्र कामगार सेना, राष्ट्रवादी काम गार सेल, नवमहाराष्ट्र कामगार संघटना, राष्ट्रीय विडी मजदुर संघ (इंटक) अशा चारही संघटना एकत्रित येऊन गेल्या ४ ते ५ वर्षापासून विडी कामगारांना किमान वेतनाची अंमलबजावणी करावी, यासाठी कामगारमंत्री, कामगार आयुक्त, अप्पर कामगार आयुक्त, जिल्हाधिकारी सोलापूर यांना प्रत्यक्ष भेटून व विविध आंदोलनाद्वारे निवेदने देण्यात आले. याबाबत कामगार मंत्री महोदयांनी विडी उद्योजक, कामगार संघटना आणि सरकारी अधिकारी अशी संयुक्त बैठकही बोलविली. परंतु याबाबत अद्यापी कोणताही निर्णय झाला नाही.

## अणासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ पोर्टलवर व्यवसाय वृध्दी सुविधा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**

अणासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या सर्व लाभार्थ्यांसाठी ही एक महत्वाची माहिती असून, महामंडळाच्या अधिकृत www.udyog.mahaswayam.gov.in या पार्टलवर व्यवसाय वृध्दी हा स्वतंत्र टॅब उपलब्ध करून देण्यात आला आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून महामंडळाचे लाभार्थी आपली सेवा उत्पादने त्यांची किंमत तसेच वैशिष्ट्य या सह व्यवसायाशी संबंधित सविस्तर माहिती पोर्टलवर अपलोड करू शकणार आहेत. या अंतर्गत लाभार्थ्यांना व्यवसायाचे नांव, व्यवसायाचा प्रकार, उत्पादने अथवा सेवा किंमती, वैशिष्ट्ये, संपर्क तपशील व इतर आवश्यक माहिती पार्टलवर नोंदविता येणार आहे. या सुविधेमुळे लाभार्थ्यांच्या व्यवसायाला व्यापक प्रचार व प्रसिध्दी मिळणार असून त्यांची उत्पादने व सेवा थेट ग्राहकांपर्यंत पोहोचविण्यास मदत होणार आहे. या उपक्रमामुळे लाभार्थ्यांच्या व्यसायाचा विस्तार होण्यास चालना मिळेल. स्थानिक उत्पादने व सेवा ग्राहकांना सहज उपलब्ध होतील तसेच महामंडळाच्या लाभार्थ्यांना आर्थिकदृष्टया अधिक सक्षम होण्यास मदत होईल. तरी महामंडळाच्या सर्व संबंधित लाभार्थ्यांनी या सुविधेचा लाभ घेऊन आपली आवश्यक माहिती तात्काळ पोर्टलवर आपलोड करावी. याबाबत कोणतीही आडचण अथवा मार्गदर्शनासाठी संबंधित जिल्हा समन्वयकांशी संपर्क साधावा, अशी माहिती सोलापूर जिल्हा समन्वयक योगेश वाघ यांनी दिली आहे.

# उमाबाई श्राविका विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी**



श्राविका संस्थानगरस्थित उमाबाई श्राविका विद्यालयात इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ डी. ए. व्ही. वेलणकर कॉलेज ऑफ कॉमर्सचे प्रा. डॉ. दीपक ननवरे यांच्या उपस्थितीत झाला. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक सुकुमार मोहोळे होते. यावेळी मार्गदर्शिका दीप्ती शहा, उपमुख्याध्यापिका अश्विनी पंडित, पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ, वर्गशिक्षक अनंत बळळे, अभिनंदन उपाध्ये, सरस्वती शेटे आदी उपस्थित होते.

सहशिक्षिका सोनाली उंडे व पल्लवी खांडवे व इयत्ता नववी ब तील विद्यार्थिनींनी गायलेल्या सुमधुर गीताद्वारे स्वागत करण्यात आले. पाहुण्यांचा परिचय सहशिक्षिका सारिका महाडिक यांनी आपल्या अमोघ वाणीद्वारे उपस्थितांना करून दिला. यावेळी प्रणिती शिंदे व प्रचिती जवळकर यांनी शिक्षकांबद्दलच्या कृतज्ञेतून त्यांच्या उल्लेखनीय कार्य व स्वभाव वैशिष्ट्यांवर आधारित शेलापागोटे हा शुभेच्छा संदेशाचा कार्यक्रम सादर केला. इयत्ता दहावी अ,ब, कच्या विद्यार्थ्यांनी भेट म्हणून प्रशालेस एक संगणक व दोन लोखंडी कपाट भेट स्वरूपात दिले. सहशिक्षिका सरस्वती शेटे व सहशिक्षक अनंत बळळे यांनी शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन इयत्ता नववी ब मधील विद्यार्थिनी नंदिता तळभंडारे व विना चव्हाण यांनी तर आभार आनंदी कामूर्ती या विद्यार्थिनीने मानले. इयत्ता नववी ब च्या वर्गशिक्षिका केतकी सोनटक्के यांच्या मार्गदर्शनानुसार नववी ब तील विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले होते.

# साहित्य परिषदेच्या कारभारात आधुनिकता आणणार

**सिने अभिनेते योगेश सोमण**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**



महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कारभारात सुसुत्रता आणि आधुनिकता आणणार असल्याचे प्रतिपादन साहित्य संवर्धन आघाडीचे उमेदवार तथा प्रसिध्द सिने व नाट्य अभिनेते लेखक योगेश सोमण यांनी केले. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या पंचवार्षिक निवडणुकीच्या प्रचारासाठी ते सोलापूर दौऱ्यावर आले असताना त्यांनी सोलापूर शहरातील मसापच्या विविध शाखेच्या पदाधिकारी आणि सभासदांच्या भेटी घेवून बैठक घेतली त्यावेळी ते बोलत होते.

पंचवार्षिक निवडणुकीसाठी साहित्य संवर्धन आघाडीच्या वतीने अध्यक्षपदासाठी प्रसिध्द सिने आणि नाट्य अभिनेते लेखक योगेश सोमण, प्रमुख कार्यवाहपदासाठी डॉ. स्वाती महाळंक तर कोषाध्यक्षपदासाठी ज्येष्ठ पत्रकार प्रदीप निफाडकर असे उमेदवार असून त्यांना मोठ्या मताधिक्याने निवडून द्यावे असे आवाहनही यावेळी करण्यात आले. अमोल धाबळे यांनी प्रास्ताविक केले त्यानंतर शरकुमार एकबोटे, शोभा बोल्ली, गिरीष दुनाखे, गोविंद काळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या बैठकीला रेणुका महागांवकर, प्रशांत बडवे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शहर कार्यवाह सुनिल इंगळे, नरेंद्र काटीकर, जितेश कुलकर्णी, विनायक होटकर, प्रकाश मोकाशे, विशाल शिंदे, दिपक जाधव, अविनाश महागांवकर, अश्विनी चव्हाण, आण्णासाहेब कोतली यांच्यासह साहित्य परिषदेचे सभासद उपस्थित होते.

या निवडणुकीसाठी महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या आजीव सभासदांना ६ फेब्रुवारीपासून मतपत्रिका घरपोच मिळणार आहेत त्यावर साहित्य संवर्धन आघाडीच्या उमेदवारांच्या नावापुढे मतदान करून त्या मतपत्रिका सोबत आपल्या आधार कार्डची झेरॉक्स त्यावर सही आणि पाकीटावर सही करून योग्य ते पोस्ट तिकिट लावून १२ मार्च पुर्वी महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या पुणे येथील कार्यालयात पोहोच होतील याची काळजी सभासदांनी घ्यावी असेही यावेळी सांगण्यात आले.

# तंत्रज्ञानामुळे मानवी जीवनमानात मूलभूत बदल

**शिवदारे महाविद्यालयात राष्ट्रीय परिषदप्रसंगी डॉ. दामा यांचे प्रतिपादन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**

कृषी उत्पादन वाढ, अचूक रोगनिदान, वैद्यकीय संशोधन तसेच पर्यावरण संरक्षणासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता, जैवतंत्रज्ञान व अब्जांश तंत्रज्ञान यांचा एकत्रित वापर भविष्यात अत्यंत निर्णायक ठरणार असून, या तंत्रज्ञानामुळे मानवी जीवनमानात मूलभूत बदल घडून येतील, असे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू मा. डॉ. लक्ष्मीकांत दामा यांनी केले.

सोलापूर विद्यापीठ व दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळ संचलित व्ही. जी. शिवदारे कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स यांच्या संयुक्त विद्यमाने येथील जैवतंत्रज्ञान विभागाच्या वतीने आयोजित राष्ट्रीय परिषद ''कृत्रिम बुद्धिमत्ता आणि जैवतंत्रज्ञान यांचे कृषी आणि वैद्यक क्षेत्रांत



महत्त्व २०२६'' च्या उद्घानप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळाचे विश्वस्त प्रा. बी. व्ही. शेटे होते. उद्घाटनानंतर शिवाजी विद्यापीठाचे डॉ. के. एम. गरडकर यांनी मार्गदर्शन केले. प्राचार्य प्रा. डॉ. डी. एस. सुत्रावे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. शुभदा उपासे व प्रा. प्रियंका धुत्तरगी यांनी सूत्रसंचालन केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. प्रतीक कस्तुरे, प्रा. सोनिया दुबे यांनी केला. परिषदेदरम्यान भारत सरकारच्या डिपार्टमेंट ऑफ बायोटेक्नॉलॉजीच्या नोडल ऑफिसर डॉ. संध्या शेणॉय, एमआयटी विश्वविद्यालयाच्या प्र कुलगुरू डॉ. विद्या निरंजन एम.आय.एम इ.आर. पुणेच्या डॉ. स्वरूपा हतोळकर, रेप्रो सेल हैद्राबाद ॲथॉल डॉ. रोझी बावराजू, राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ. मंजुनाथ एन., डॉ. संग्राम धुमाळ यांनी मार्गदर्शन केले. विजेत्यांना शास्त्रज्ञ डॉ. मंजुनाथ एन. व परीक्षक वालचंदचे विभागप्रमुख डॉ. अनिलकुमार कट्टी यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-Tender (1st call) Notice**

Digitally signed online bids are invited through E-tender process of MSETCL in two-bid system from bidders who are registered Contractors of MSETCL. **RFx No.7000038976 E-Tender No. SE/EHV/O&M/Circle/SHP/E-Tender:10/2025-2026, Particulars:** Supply and Installation of Micro-processor based 0.2s accuracy class, 3-Phase 4-Wire digital MFM meters for various EHV substations under EHV O&M Circle, Solapur. **Estimated cost:** Rs. 49,94,971/- **E.M.D. (Approx. 1% of est. cost):** Rs 49,950/- **Tender cost in Rs.** 500.00+ GST, **Sale period:** 06.02.2026 to 22.02.2026 **Last Date of Submission:** 22.02.2026 up to 23:59 Hrs, **Date of opening (Tech. bid):** 23.02.2026 at 12:00 Hrs. (If possible). **Contact person:** Superintending Engineer -7447440608 For further details

**Subsequent call intimations (2nd / 3rd calls, if any) will not be re-published in newspapers and will only be available on the e-tender portal: please visit.**

**1) https://srmetender.mahatransco.in. 2) https://mahatransco.in**

**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Superintending Engineer, EHV O&M Circle Solapur**

## जाहीर नोटीस

दि. ०६/०२/२०२६

श्री भगवंत सहकारी पुरवठा मंडळी लि. बार्शी, ता. बार्शी जि. सोलापूर या सहकारी संस्थेच्या सभासदांना सुचित करण्यात येते की, आपल्या सहकारी संस्थेच्या संचालक मंडळामध्ये सर्वसाधारण या मतदार संघातील रिक्त झालेल्या तीन जागा भरण्यासाठी अध्यासी अधिकारी ए.टी. सय्यद सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, बार्शी यांचे अध्यक्षतेखाली दिनांक :-११/०२/२०२६ रोजी सकाळी ठीक १:०० वाजता संस्थेचे कार्यालय २५४९/१/१ड जामगांव रोड, भगवंत सहकारी पेट्रोल पंप येथे संचालक मंडळाची सभा आयोजित करण्यात आलेली आहे.

तरी सर्व संचालकांना संचालक मंडळाच्या सभेस हजर राहण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे.

सही/-
(ए.टी. सय्यद )
अध्यासी अधिकारी तथा
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, बार्शी

सही/-
सचिव
श्री भगवंत सहकारी पुरवठा मंडळी
लि. बार्शी ता. बार्शी, जि. सोलापूर

## सावधानतेची जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे मजरेवाडी, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर येथील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल १) फातिमा बेगम शेख अल्ताफ पत्तेवाले, २) शेख अल्ताफ महंमद हुसेन पत्तेवाले, दोघे रा. रहिमत नगर, ओवर ब्रिजजवळ, शेडम, जि. कलबुर्गी यांनी दिलेल्या माहितीवरुन व दि.१७/१२/२०२४ च्या नोटरी दस्तावरुन कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :-**

१) डि व सब डि सोलापूर पैकी ता. उत्तर सोलापूर पैकी मौजे सोलापूर महानगरपालिका हद्दीतील मजरेवाडी भागातील जुना सर्व्हे नं. २५७ यांसी नवीन सर्व्हे नं.६९/२/६/२ याचे एकूण क्षेत्र १ हे. २० आर यांसी आकार रु.०० पैसे ९९ या क्षेत्रावर डेव्हलप करण्यात आलेला जम-जम पार्क या नगरमधील प्लॉट क्र.५० यांसी एकूण क्षेत्र १४० चौ.मी. म्हणजे १५०५ चौ. फुट यांसी चतु:सिमा :- पुर्वेस - प्लॉट क्र. ५१, दक्षिणेस - प्लॉट क्र. ५५, पश्चिमेस - रस्ता, उत्तरेस - रस्ता

२) डि व सब डि सोलापूर पैकी ता. उत्तर सोलापूर पैकी मौजे सोलापूर महानगरपालिका हद्दीतील मजरेवाडी भागातील जुना सर्व्हे नं. २५७ यांसी नवीन सर्व्हे नं. ५५ याचे एकूण क्षेत्र १ हे. २० आर यांसी आकार रु. ०० पैसे ९९ या क्षेत्रावर डेव्हलप करण्यात आलेला जम-जम पार्क या नगरमधील प्लॉट क्र. ५५ यांसी एकूण क्षेत्र १४० चौ.मी. म्हणजे १५०५ चौ. फुट यांसी चतु:सिमा :- पुर्वेस - प्लॉट क्र. ५१, दक्षिणेस - प्लॉट क्र. ५४, पश्चिमेस - रस्ता, उत्तरेस - प्लॉट क्र. ५०

वरिल मिळकत ही १) नरसिंह रामचंद्र तुम्मा, २) राजेश रामचंद्र तुम्मा, ३) चक्रपाणी रामचंद्र तुम्मा, ४) लक्ष्मीबाई लक्ष्मीनारायण तुम्मा, ५) अंबुबाई सत्यनारायण कुरापाटी, ६) राधा रमेश बुरुड, ७) श्रीहरी रामचंद्र तुम्मा यांच्या मालकी कब्जेवहिवाटीची असून त्यांनी ही जागा रजिस्टर दस्त क्र. ७५४६/२०२३ दि.३१/१०/२०२३ अन्वये सनशाईन बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स भागीदारी फर्मचे भागीदार १) अबुबकर जैन्नुल आबिदीन यालगी, २) सरफराझ अ. रहिम मंगळूर, ३) आवेज अब्बास शेख, ४) जुल्फेकारअली इस्माईलसाब यालगी यांना विकसीत करण्यासाठी दिलेली होती.

सदर मिळकतीमधील वर नमुद मिळकत क्र.१ म्हणजेच प्लॉट क्र.५० व वर नमुद मिळकत क्र.२ म्हणजेच प्लॉट क्र.५५ हा आमचे अशिलांनी या डेव्हलपर्सकडून विकत घेण्यासाठी दि. ०४/१२/२०२४ रोजी नोटरी रजिस्टर दस्त क्र. ५८५८ व ५८५७ अन्वये रितसर विक्रीबाबतचा इसारा पावती प्रत्येकी रक्कम रुपये ३,००,०००/- देऊन इसारा पावती व लेखी स्वरुपात करार हा आमचे अशिलांसोबत केलेला आहे व सदर दोन्ही प्लॉटची करारात ठरल्याप्रमाणे प्रत्येकी रक्कम रु. १५,०६,०००/- (अक्षरी पंधरा लाख सहा हजार रुपये फक्त) ही सनशाईन बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स यांना दिलेली आहे. परंतु सनशाईन बिल्डर्स व डेव्हलपर्स हे या दोन्ही मिळकतींचे रजिस्टर खरेदीखत करण्यास टाळाटाळ करीत आहेत.

अशा परिस्थितीत या जमीनींबाबत नरसिंह रामचंद्र तुम्मा व इतर ७ यांच्याकडील रजिस्टर दस्त क्र. ७५४६/२०२३ या दस्ताचा गैरफायदा घेऊन सनशाईन बिल्डर्स व डेव्हलपर्स वर नमुद दोन्ही प्लॉट तिन्हाईत व्यक्तींना विकण्याच्या तयारीत असल्याचे खात्रीलायक माहिती आमचे अशिलांना मिळालेली आहे. सबब वर दोन्ही प्लॉटचा रजिस्टर करार आमचे अशिलासोबत झाल्याने या मिळकतीबाबत कोणीही कोणताही व्यवहार करु नये अन्य कसल्याही प्रकारचा व्यवहार व हक्क हितसंबंध निर्माण करु नये व तसा केला गेल्यास आमचे अशिल हे दिवाणी स्वरुपाची कारवाई करतील. तसेच तो व्यवहार आमचे अशिलांचे हक्कावर व हितसंबंधावर बंधनकारक असणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून सदरची जाहीर नोटीस दिली असे.

ही खरेदीपूर्व जाहिर नोटीस दिली ता. ०६/०२/२०२६

सही/-
अशिल
फातिमा बेगम शेख अल्ताफ पत्तेवाले

सही/-
ॲड. सुजय श्रीरंग सापटणेकर
ॲड. श्रेया सुजय सापटणेकर
ॲडव्होकेट्स
३/४१, कल्पवृक्ष समर्थ नगर,
उत्तर सदर बझार, सिव्हील
हॉस्पीटलजवळ, सोलापूर.
मो.नं. ९६३७१८१०८०

सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखाना लि, शंकरनगर-अकलूज पो. यशवंतनगर, ता. माळशिरस, जि. सोलापूर पिन - ४१३११८
फोन नं. (०२१८५) २२२०४८, २२२२४८ फॅक्स नं. (०२१८५) २२२२४९ Email: smsmpssk@gmail.com

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना कार्यकारी संचालक यांचेकडून या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखाना लि. शंकरनगर-अकलूज या संस्थेचे खालील उत्पादक सभासद दुर्दैवाने मयत झाल्याचे समजते.

| अ. नं. | सभासदाचे नांव | गांव | मयत झाल्याची अंदाजे तारीख |
|---|---|---|---|
| १ | कै. देशमुख संपती आप्पासाहेब | यशवंतनगर | २८/०३/२०१४ |
| २ | श्री. कुरुडकर शिवदास व बडोपंत शंकर पैकी मयत शिवदारा | अकलूज | ०६/०३/२०२१ |
| ३ | कै. गुळवे गुरुलिंग विरूपाक्ष | अकलूज | २५/०३/२०२२ |
| ४ | कै. भागवत गजानन रंगनाथ | सत्त्गांव | २५/०२/२०२५ |
| ५ | कै. देवकर सिंधुबाई चांगदेव | विजयडी | २६/०२/२०२५ |
| ६ | कै. वाघ गोविंद मारुती | लवंग | २१/१२/२०२४ |
| ७ | कै. चव्हाण नागनाथ गणपती | वाघोली | ०२/०५/२०२० |
| ८ | कै. शेख वजीर याकुब | गणेशगांव | १४/०४/२०२३ |
| ९ | कै. शिंदे बाबू चिटू | वाफेगांव | २४/११/२०२१ |
| १० | कै. मुंडफणे दत्तात्रय भिमराव | महाळुंग | १४/०९/२०२५ |
| ११ | श्री. मुंठफणे दत्तात्रय, रंगुबाई, सुमन भिमराव पैकी मयत दत्तात्रय | महाळुंग | १४/०९/२०२५ |
| १२ | कै. बनकर भानुदास संभाजी | वेळापूर | १५/०१/२०२५ |
| १३ | कै. माने-देशमुख रावसाहेब कृष्णराव | वेळापूर | २०/०५/२०२५ |
| १४ | कै. पाटोळे भानुदास बाबु | उघडेवाडी | ०३/०५/२०१९ |
| १५ | कै. उघडे रामकृष्ण मल्लिकार्जुन | उघडेवाडी | ३०/०१/२०२५ |
| १६ | कै. सावंत निवृत्ती जगन्नाथ | दसूर | ०९/११/२०२१ |
| १७ | कै. चव्हाण हरीदास सुखदेव | तोंडले | ०६/०९/२०२३ |
| १८ | कै. बागल किसन बाबु | तोंडले | २३/०६/२०२० |
| १९ | कै. पवार वासुदेव दामु | दत्तनगर | ०८/०३/२०२५ |
| २० | कै. पवार संभाजी शिवाजी | खंडाळी | ०९/०१/२०२५ |
| २१ | कै. एकतपुरे गेणू रामा | विझोरी | ३०/१०/२०२२ |
| २२ | कै. मिले शिवदास जगन्नाथ | तांदुळवाडी | ०६/०६/२०२५ |
| २३ | कै. काकडे शिवाजी नामदेव (आजोबा नारायण) | तांदुळवाडी | ३०/०६/२०१६ |
| २४ | कै. आवताडे तुकाराम नामदेव (गेणू) | फळवणी | ०८/०३/२०१३ |
| २५ | श्री. फाळके दादासाहेब सुमीत्रा लक्ष्मण पैकी मयत सुमीत्रा | मळोली | १५/०९/२०२४ |
| २६ | कै. बनकर रामचंद्र विठोबा | खुडूस | ०४/०५/२०२१ |
| २७ | कै. बोराटे प्रल्हाद पंडीत | वडापुरी | ११/०७/२०२१ |
| २८ | कै. मिसाळ माधव शिवा | वरकुटे खुर्द | १३/०२/२००८ |

महाराष्ट्र को. ऑपरेटिव्ह सोसायटीज ॲक्ट कलम ३० रुल २५ (३) (१) च्या तरतुदी प्रमाणे या जाहीर नोटीसीने सर्व संबंधीत वारसांना अगर मयताचे कायदेशिर हक्क सांगणाऱ्या इसमांना कळविण्यात येते कि, मयत उत्पादक सभासदांचे शेअर्स, ठेवी, डिबेंचर्स वगैरे रक्कम मयताचे नांवे आहेत. सबब ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ दिवसांचे आत ज्या कोणा हित संबंधीतांना उपर निर्दीष्ट मयतास वारस आहोत असे कारखान्यास पटवून मयतांचे शेअर्स, ठेवी, डिबेंचर्स वर्ग करुन घेण्याचे असतील त्यांनी कायदेशीर वारस हक्क प्रस्थापित्त करण्यासाठी असणारे सर्व कागद पत्रे व पुरावे कारखान्याच्या रजिस्टर्ड ऑफिस मध्ये कामाच्या वेळेत सादर करावेत व पश्चात वारसाची शाबीदी करावी, दिलेल्या मुदती नंतर आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत व ते कारखान्यावर बंधनकारक राहणार नाहीत.

ही जाहीर नोटीस दिली असे.

दिनांक - ०७/०२/२०२६

सही/-
(राजेंद्र केरबा चौगुले)
कार्यकारी संचालक
स.म.शंकरराव मोहिते-पाटील स. सा. का. लि.
शंकरनगर-अकलूज

# टी-२० विश्वचषकाचा थरार





## महत्त्वाचे

### रणजी करंडक : मुंबई १२० धावांत गारद

**मुंबई** : गुरुवारपासून विविध ठिकाणी प्रतिष्ठित रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यांना सुरूवात झाली. मुंबईत सुरु असलेल्या कर्नाटकविरुद्धच्या सामन्यात मुंबईचा संपूर्ण संघ पहिल्या डावांत १२० धावांतच गारद झाला. प्रत्युत्तरात दिवस अखेर कर्नाटकने २६ षटकांत २ बाद ११० धावांची नोंद केली. मुंबईकडून अखिल हेरवडकरने तेवढी ६० धावांची खेळी केली. इतर फलंदाज कर्नाटकच्या विद्वत कावेरप्पा, प्रसिध कृष्णा व श्रेयस गोपालच्या गोलंदाजीसमोर टिकाव धरू शकले नाही. या तिघांनीही प्रत्येकी ३ बळी टिपले.कर्नाटकच्या मयंक अग्रवालने ८१ चेंडूंत नाबाद ५४ धावांची खेळी केली. इंदूर येथे मध्य प्रदेशविरुद्धच्या सामन्यात जम्मू-काश्मीरने पहिल्या डावांत १९४ धावा केल्या. प्रत्युत्तरात दिवस अखेर मध्य प्रदेशने १० षटकांत बिनबाद २६ धावा केल्या. कल्याणी येथे बंगालविरुद्धच्या सामन्यात आंध्र प्रदेशने पहिल्या दिवशी पहिल्या डावांत ८० षटकांत ६ बाद २६४ धावा उभारल्या. जमशेदपूर येथे उत्तराखंडविरुद्धच्या सामन्यात झारखंडने पहिल्या डावांत २३५ धावा काढल्या. प्रत्युत्तरात दिवस अखेर उत्तराखंडने एका षटकांत बिनबाद ४ धावा केल्या.

# भारत विजयी सुरुवात करण्यास उत्सुक

## आयसीसी टी-२० विश्वचषक क्रिकेट आजपासून

**आजचा सामना**

**भारत वि. अमेरिका**
**स्थळ** : वानखेडे स्टेडियम, मुंबई
**वेळ** : सायकाळी ७.०० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर



सूर्यकुमार यादव



मोनाक पटेल

**मुंबई, ६ फेब्रुवारी**

शनिवारपासून आयसीसी टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेला प्रारंभ होणार आहे. वानखेडे स्टेडियमवर गत विजेता भारत आणि अमेरिका यांच्यादरम्यान सलामीचा सामना खेळला जाणार आहे. भारताने हा प्रतिष्ठित किताब राखणारा पहिला संघ होण्याचे लक्ष्य ठेवले आहे.

जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर असलेल्या भारताने २०२४ च्या विजेतेपदाच्या मोहिमेतील दोन आधारस्तंभ रोहित शर्मा व विराट कोहली यांना गमावल्यानंतरही, आपली ताकद वाढवत नेली आहे व तेव्हापासून एकूण नऊ मालिका जिंकल्या आहेत, यात गत वर्षीच्या आशिया चषकातील जबरदस्त कामगिरीचा समावेश आहे.

कर्णधार सूर्यकुमार यादवने २०२५ मधील फलंदाजीत केलेल्या निराशाजनक कामगिरीनंतर जोरदार पुनरागमन केले आहे. ईशान किशननेही यष्टिरक्षक-फलंदाज म्हणून सलामीच्या स्थानावर दावा करण्यासाठी स्फोटक पुनरागमन केले आहे. फॉर्मात असलेला ईशान अभिषेक शर्मासोबत सलामीला येईल.

सूर्यकुमारचा फॉर्ममध्ये परतणे, मधल्या फळीत तिलक वर्माची खात्री आणि हार्दिक पांड्या, उपकर्णधार अक्षर पटेल आणि शिवम दुबे यांच्यासारख्या अष्टपैलू खेळाडूंचा समृद्ध साठा या फलंदाजी फळीला रोखणे अविश्वसनीयपणे कठीण बनवतो.

संघात रिंकू सिंग सुद्धा आहे. तो उच्च दर्जाचा फलंदाज आहे आणि तो फिनिशर म्हणून आपले काम निश्चित असेल. जसप्रीत बुमराहची अत्यंत काळजीपूर्वक हाताळणी करण्यात आली आहे.

भारताला त्याचे खरे मूल्य लक्षात आले आहे. त्याला अचूक गोलंदाजी करणाऱ्या अर्शदीप सिंगची साथ मिळेल. हर्षित राणाच्या उपस्थितीमुळे फलंदाजी फळीलाही बळकटी मिळेल. कुलदीप यादव व वरुण चक्रवर्ती यांच्या रूपाने भारताकडे जगातील दोन सर्वोत्तम फिरकी गोलंदाज आहेत. या स्पर्धेसाठी १५ खेळाडूंचा सर्वोत्तम संघ उपलब्ध होईल याची खात्री करण्यासाठी निवडकर्त्यांनी आणि संघ व्यवस्थापनाने हा गट काळजीपूर्वक निवडला आहे. यात शुभमन गिल किंवा यशस्वी जयस्वाल या दोघांचाही समावेश नाही. अनिश्चित कामगिरी करणारा संजू सॅमसन सुद्धा अंतिम एकादशमधून बाहेर राहू शकतो. (वृत्तसंस्था)

### अमेरिकेच्या जर्सीमध्ये काही ओळखीचे चेहरे

सूर्यकुमार शनिवारी वानखेडे स्टेडियमवर मैदानात उतरेल, तेव्हा त्याला अमेरिकेच्या जर्सीमध्ये काही ओळखीचे चेहरे दिसणार आहेत.

हे तेच मैदान आहे जिथे तो एकेकाळी खेळला होता आणि त्याने शुभम रंजनेसोबत ड्रेसिंग रूम शेअर केली होती, तर हरमीत सिंग आणि सौरभ नेत्रावळकर हे इतर माजी स्थानिक खेळाडू आहेत.

या मैदानाची खेळपट्टी आणि परिस्थितीचे सामूहिक ज्ञान या तीन मुंबईकर खेळाडूंना त्यांच्या संघाला अतिरिक्त आत्मविश्वास देण्यास मदत करेल.अमेरिकेने केवळ आपल्या चिकाटीने माजी विजेता पाकिस्तानलाच हरवले नव्हते, तर दोन वर्षांपूर्वीच्या मोहिमेत भारतालाही कडवी झुंज दिली होती, यात त्यांनी सुपर एट टप्प्यात प्रवेश केला होता. या धाडसी संघासाठी ही गती कायम ठेवणे महत्त्वाचे ठरेल.

अमेरिकेच्या संघाने गेल्या वर्षी नऊपैकी आठ सामने जिंकले होते आणि ते श्रीलंकेतील तीन आठवड्यांच्या शिबिरानंतर या टी-२० विश्वचषकात उतरत आहेत. कर्णधार मोनांक पटेलने फलंदाजीतून संघाचे नेतृत्व केले आहे आणि त्याला साईतेजा मुक्कमल्ला आणि मिलिंद कुमार यांच्यासारख्या खेळाडूंनी चांगली साथ दिली आहे, तर नेत्रावळकर, हरमीत आणि रंजने या भारतीय त्रिकुटाचा अनुभव गोलंदाजी विभागात महत्त्वाचा ठरेल. मात्र अमेरिकेच्या फलंदाजांना भारतीय वेगवान गोलंदाजी आक्रमणासमोर मार्ग शोधावा लागेल.

# भारताचे वर्चस्व राहण्याची शक्यता

**नवी दिल्ली, ६ फेब्रुवारी**

ही आतापर्यंतची सर्वात मोठी स्पर्धा आहे, पण कदाचित सर्वात जास्त राजकीय घडामोडींनी भरलेलीही आहे, या टी-२० विश्वचषक क्रिकेटमध्ये मैदानाबाहेरील नाट्यमय घटनांनी अशांत वातावरणात सर्वाधिक लक्ष वेधले आहे.

टी-२० विश्वचषक स्पर्धेला शनिवारपासून भारत आणि श्रीलंकेतील तीन वेगवेगळ्या ठिकाणी सुरुवात होत आहे. आणि जरी विजेतेपदाचा प्रबळ दावेदार म्हणून सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील गतविजेत्या भारताकडे पाहिले जात असले तरी, संभाव्य विजेते किंवा लक्षवेधी खेळाडू हा आतापर्यंत चर्चेचा विषय राहिलेला नाही.

**२० संघांचा सहभाग**

या स्पर्धेच्या तयारीदरम्यान राजकारण आणि खेळाचे अभूतपूर्व मिश्रण झाले आहे. ही स्पर्धा यावेळी १६ वरून २० संघांपर्यंत विस्तारली आहे.

बांगलादेशने सुरक्षेच्या कारणास्तव भारतात खेळण्यास नकार दिल्याने त्यांना स्पर्धेतून बाहेर काढण्यात आले आहे आणि पाकिस्तानने शेजारी देशांना पाठिंबा म्हणून भारतासोबतच्या सामन्यावर बहिष्कार टाकण्याची घोषणा केली आहे.

पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी या निर्णयात उडी घेऊन त्याचे समर्थन केले आणि तो योग्य असल्याचे म्हटले.

एकही चेंडू टाकण्यापूर्वीच, आयसीसी आणि तिचे प्रसारक संभाव्य नुकसानीच्या चिंतेत आहेत, तर पाकिस्तान काही गंभीर निर्बंधांची तयारी करत आहे, त्याचे दूरगामी परिणाम होऊ शकतात. या नाट्यमय घडामोडींव्यतिरिक्त क्रिकेटच्या मैदानावर भारताचे वर्चस्व राहण्याची शक्यता आहे.

जर पाकिस्तानविरुद्धचा सामना अखेरीस प्रेमदासा स्टेडियमवर झाला, तर तो सामना भारतीय युवा फलंदाजांची एका आव्हानात्मक खेळपट्टीवर कसोटी घेईल. पाकिस्तान शनिवारी कोलंबोमध्ये नेदरलॅण्डविरुद्ध आपल्या मोहिमेची सुरुवात करेल, हा सामना ते जिंकतील अशी अपेक्षा आहे. एकंदरीत, गुणवत्ता आणि कामगिरीच्या बाबतीत सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील भारताच्या तोडीचा कोणताही संघ नाही.

दुसरीकडे, ऑस्ट्रेलियाचा संघ बलाढ्य आहे. पॅट कमिन्स आणि जोश हेझलवूड यांच्या अनुपस्थितीत बेन ड्वार्शुइस, झेवियर बार्टलेट आणि नॅथन एलिस यांचा गोलंदाजीचा ताफा कागदावर थोडा कमकुवत दिसतो. परंतु ट्रॅव्हिस हेड, जोश इंग्लिस, कर्णधार मिचेल मार्श, मार्कस स्टोइनिस, ग्लेन मॅक्सवेल आणि टिम डेव्हिड यांच्या फलंदाजीची फळी मात्र मजबूत दिसते.

इंग्लंडकडेही फलंदाजीवर अधिक भर असलेला संघ आहे, यात कर्णधार हॅरी ब्रुक, जोस बटलर, बेन डकेट आणि फिल सॉल्ट कोणत्याही गोलंदाजी फळीला कडवी झुंज देण्यास सक्षम आहेत.

दक्षिण आफ्रिका हा संघही उपांत्य फेरी गाठण्यासाठीच्या सर्वात प्रबळ दावेदारांपैकी एक आहे आणि त्यांच्याकडे भारतानंतरचा दुसरा सर्वोत्तम गोलंदाजीचा ताफा आहे, यात कॅगिसो रबाडा, एनरिक नॉर्टजे, मार्को जॅनसेन, केशव महाराज कोणत्याही मोठ्या संघाला आव्हान देण्यास सक्षम आहेत.

न्यूझीलंड हा नेहमीच एक चांगला खेळ करणारा संघ आहे आणि देशात एक महिना आधीच आल्यामुळे, ते इतर संघांच्या तुलनेत लवकर येथील वातावरणाशी जुळवून घेतील. घरच्या मैदानावर खेळणारा श्रीलंका संघ नेहमीच एक बलाढ्य संघ असेल. (वृत्तसंस्था)

**टी-२० विश्वचषकात सहभागी २० संघ गटाप्रमाणे-**

| | |
|---|---|
| **गट अ :** | भारत, पाकिस्तान, अमेरिका, नेदरलॅण्ड, नामिबिया |
| **गट ब :** | ऑस्ट्रेलिया, श्रीलंका, आयर्लण्ड, झिम्बाब्वे, ओमान |
| **गट क :** | इंग्लंड, वेस्ट इंडीज, बांगलादेश, नेपाळ, इटली |
| **गट ड :** | न्यूझीलंड, दक्षिण आफ्रिका, अफगाणिस्तान, कॅनडा, संयुक्त अरब अमिरात |

# क्रीडा स्पर्धा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व घडणीची शाळा



## 'स्ट्रोक २०२६'च्या उद्घाटन प्रंसगी डॉ. सचिन गेंगजे यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**

''क्रीडा स्पर्धा ही केवळ स्पर्धा नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व घडणीची शाळा आहे. शिस्त, संयम, संघभावना तसेच विजय-पराजय समतेने स्वीकारण्याची मानसिकता ही मूल्ये खेळाच्या माध्यमातूनच विकसित होतात,'' असे प्रतिपादन वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय इलेक्ट्रॉनिक्स अँड कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभाग प्रमुख डॉ. सचिन गेंगजे यांनी केले. श्री ऐल्लक पन्नालाल दिगंबर जैन पाठशाळेच्या वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या क्रीडांगणावर आयोजित आंतर-विभागीय क्रीडा महोत्सव 'स्ट्रोक २०२६'च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. प्राचार्य डॉ. व्ही. ए. आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन झाले. यावेळी क्रीडा प्राध्यापक डॉ. एस. सी. देशमुख, सर्व विभागांचे विभाग प्रमुख, प्राध्यापकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते. ७ फेब्रुवारीपर्यंत विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले आहे. यामध्ये क्रिकेट, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, टेबल टेनिस, बुद्धिबळ आणि फुटबॉल या खेळांचा समावेश आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक साक्षी जाधव या विद्यार्थिनीने प्रभावीपणे सादर केले.

# वैभव सूर्यवंशीचे विश्वविक्रमी शतक

## १७५ धावा, ८० चेंडू, १५ चौकार, १५ षट्कार



**हरारे, ६ फेब्रुवारी**

१४ वर्षीय वैभव सूर्यवंशीची १९ वर्षांखालील विश्वचषकात बॅट तळपली व त्याने विश्वविक्रमी शतक झळकावले.

वैभवने ३२ चेंडूंत अर्धशतक पूर्ण केले होते. त्याने ८० चेंडूंत १५ चौकार, १५ षट्कारांसह १७५ धावांची झंझावाती खेळी केली.

वैभवने १९ वर्षांखालील विश्वचषकात सर्वाधिक षट्कारांचा विक्रम केला आहे. या सामन्यापूर्वी वैभवने २०२६ च्या विश्वचषकात १६ षट्कार ठोकले होते आणि एका १९ वर्षांखालील विश्वचषकात सर्वाधिक षट्कार ठोकणारा तो इतिहासातिल दुसरा खेळाडू ठरला होता.

वैभवने युवा वन-डे सामन्यात सर्वाधिक षट्कार फटकावले आहे. त्याने डिसेंबरमध्ये आयसीसी ए दुबई येथे युएई १९ वर्षांखालील संघाविरुद्ध स्वतःचा सर्वाधिक १४ षट्कारांचा विक्रम मोडीत काढला आहे. (वृत्तसंस्था)

### वैभवने एकाच खेळीत नोंदविले ५ विक्रम

१. वैभव हा १९ वर्षांखालील विश्वचषक अंतिम सामन्यात शतक करणारा सर्वात तरुण खेळाडू ठरला आहे
२. वैभवच्या नावावर १९ वर्षांखालील विश्वचषक अंतिम सामन्यात सर्वात जलद शतक करण्याचा विश्वविक्रम आहे.
३. वैभव हा १९ वर्षांखालील विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात सर्वाधिक षट्कार ठोकणारा खेळाडू ठरला आहे
४. वैभव हा १९ वर्षांखालील विश्वचषकाच्या एकाच हंगामात सर्वाधिक षट्कार मारणारा खेळाडू ठरला आहे.
५. वैभव १९ वर्षांखालील वन-डे क्रिकेटमध्ये १०० षट्कार ठोकण्याचा विक्रम केला आहे. हा पराक्रम करणारा तो पहिला खेळाडू आहे.

### १९ वर्षांखालील विश्वचषकाच्या एका डावांत सर्वाधिक षट्कार

**१५-वैभव सूर्यवंशी** (भारत वि. इंग्लंड), हरारे २०२६
**१२- मायकेल हिल** ( ऑस्ट्रेलिया) एनएएम, पेनाँग २००८
**११- क्रेग सिमन्स** (ऑस्ट्रेलिया) विरुद्ध केईएम, ड्युनेडिन, २००२



### खो-खो परिवारातर्फे अजितदादा पवार यांच्या आदरांजलीसाठी उद्या पुण्यात शोकसभा

**मुंबई, दि. ६ फेब्रुवारी-**

महाराष्ट्राचे क्रीडा नेतृत्व, महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष, महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे अध्यक्ष तसेच महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे २८ जानेवारी २०२६ रोजी विमान अपघातात दुर्दैवी निधन झाले. त्यांच्या अकाली जाण्याने महाराष्ट्राने क्रीडा प्रेमी, कर्तृत्ववान, विकासाभिमुख व सर्वसामान्यांचा हक्काचा आधार असलेला नेता गमावला आहे. अजितदादा पवार यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण करण्याकरिता खो-खो परिवारातर्फे रविवार, दि. ८ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता नु. म. वि. प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, आप्पा बळवंत चौकाजवळ, बाजीराव रोड, पुणे येथे शोकसभेचे आयोजन केले आहे. या शोकसभेस खो-खो परिवारातील सर्व खेळाडू, प्रशिक्षक, पंच, पुरस्कार्थी, क्रीडा संघटक, खो-खो प्रेमी व सर्व क्रीडा संघटनांचे पदाधिकारी यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव यांनी केले आहे.

# राहुरी कृषी, परभणी, शिवाजी, नागपूर यांचा बाद फेरीत प्रवेश

### आंतविद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**

राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३००व्या जयंतीनिमित्त राजमाता अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ आयोजित महाराष्ट्र राज्यातील विविध विद्यापीठ शिक्षक व कर्मचारी वृंद यांच्यासाठी क्रिकेट स्पर्धा सोलापुरात होत असून चौथ्या दिवशी साखळी फेरीचे ६ सामने पार पडले.

सकाळच्या सत्रात राहुरीच्या महात्मा फुले कृषी, परभणी, कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाने आणि दुपारच्या सत्रात नागपुर, पुणे येथील सावित्रीबाई फुले व मराठवाडा येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठांनी प्रतिस्पर्धी संघावर विजय मिळवले. परभणी या विद्यापीठ संघांने सलग तीन तर राहुरी कृषी, नागपूर व शिवाजी विद्यापीठाने सलग २ विजय प्राप्त करत बाद फेरीत प्रवेश केला आहे.

चौथ्या दिवसाचे वैशिष्ट्य म्हणजे राहुरीच्या महात्मा फुले विद्यापीठाच्या संघाने सलामीवीर खेळाडू जालिंदरनाथ धनवटे यांच्या २० चौकराच्या सहायाने झळकविलेले तडफदार शतकाच्या जोरावर स्पर्धेतील आत्तापर्यंतच्या सर्वाधिक २०८ धावा करत सलग दुसरा सामना जिंकला. तसेच रेल्वे मैदानावर स्पर्धेतील पहिला सामना टाय होऊन सुपर ओव्हर मध्ये शिवाजी विद्यापीठाने जिंकत सलग दुसरा विजय मिळवला.

या स्पर्धेत एकूण १७ संघांनी सहभाग नोंदविला असून त्यांची विभागणी ४ गटात केली असून प्रथम साखळी पद्धतीने टी पद्धतीत लेदर चेंडूवर रंगीत पोशाखात अतिशय सुंदर नेटके नियोजन अंतर्गत सामने पार पडत आहेत. येथील इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवर सामनावीराचा पुरस्कार शतकवीर जालिंदरनाथ धनवटे, मोइझ शेख याला, रेल्वे मैदानावर शिवाजी विद्यापीठाच्या विनायक शिंदे याला पु.अ.हो. सोलापूर विद्यापीठाचे विद्यार्थी विकास मंडळ संचालक डॉ.राजेंद्र वडजे यांचे हस्ते व लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.आर.ढेरे यांच्या हस्ते प्रकाश घुले (नागपुर) यांना तर दयानंद कॉलेज मैदानावर मनीष गायकवाड व मुजीब शेख यांना सामनावीर पुरस्कार देण्यात आले. या सामन्यात महेश सोनवणे, इरशाद बिराजदार, अशोक डोंबाळे, सुहेल शेख, चिराग शहा, चंदू मंजेली यांनी पंच तर गुणलेखक म्हणून मिलिंद गोरे, मोहसीन मुल्ला, मजहर मंगोली यांनी काम पाहिले.





सोलापूर : प्रकाश घुले व विनायक शिंदे यांना सामनावीर पुरस्कार देताना प्राचार्य डॉ.एस.आर.ढेरे व डॉ.राजेंद्र वडजे. यावेळी डॉ. अभिजित जगताप, सोमनाथ सोनकांबळे, सुनील थोरात.

**संक्षिप्त धावफलक :**

**१) इंदिरा गांधी पार्क स्टेडियम**

**महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी :** २०८/९ (२०) जालिंदरनाथ धनवटे १११, अतुल कोराडे २९, अवांतर २२ धावा सतीश भरडे ३१/४, किरण नांदणे, सतीश लोखंडे, प्रणव कोलते, पंकज ठाकूर प्रत्येकी १ बळी. **विजयी विरुद्ध संत गाडगे बाबा अमरावती :** १२५/६ (२०)वारखडे ४१, अनिल मश्राम २०, अवांतर १८ धावा, संदीप त्रिपाठी १६ सचिन भिंगार्डे १७/२, अनिल थोरात, सतपाल, ज्ञानेश्वर लडकत, सचिन सोनावणे प्रत्येकी १ बळी

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ :** १४३/६ (२०) मोइझ शेख नाबाद ५९, बलभीम मार्कड २७, खताळ १८, अवांतर ११ धावा महेंद्र भाऊ ४२/३, निनाद राऊत व रमेश शेवारे प्रत्येकी १ बळी विजयी विरुद्ध **राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर :** सर्वबाद ६७ (१५.५) रितेश पुरकाम १६, निनाद राऊत १५ धावा रणजीत तांगडे १३/३, रवी पारधी ११/३, कार्तिक चव्हाण १०/२, नितीन गायकवाड व रोहित प्रत्येकी १ बळी.

**२) रेल्वे मैदान**

**शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर :** १४९/१ (२०) व १२/० (०.४) विनायक शिंदे नाबाद ५६, रमेश धोनुक्षे ४९, विशाल हिलगे ३६* अभिषेक देशमुख १ बळी. **विजयी विरुद्ध यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ नाशिक :** १४९/६ (२०) व ८/० (१) देविदास जाधव ४२, निखिल शिंदे ३७, योगेश जाधव १९, अभिषेक देशमुख १५, संदीप भागवत १३ योगेश दळवी ३१/२, अनिल पाटील विनायक शिंदे राजे मुपडे प्रत्येकी १ बळी

**महाराष्ट्र पशु व मत्स्त् विज्ञान नागपुर विद्यापीठ :** प्रकाश घुले ६२, अजय गावंडे २७, संदीप रिंधे व अतुल ढोक १९, अवांतर १७ धावा अरुण सपकाळे ३६/२, रश्मिकांत जाधव, किशोर पवार, सुभाष पवार प्रत्येकी १ बळी **विजयी विरुद्ध बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव :** सर्वबाद १२२ (१४.३) जितेंद्र पाटील नाबाद ४१, अरविंद गिरनारे २१, यश पवार १६, स्नेहल कुवर ११ संदीप गोरे २४/३, नितीन डोंगरे १५/२, अजित माळी व विठ्ठल धायगुडे प्रत्येकी १ बळी

**३) दयानंद कॉलेज मैदान**

**मुंबई विद्यापीठ :** १४०/९ (२०) सुशांत घाडी २६, मनोहर माने व सिद्धेश चव्हाण १८, सुनील मिसाळ १६, संजय भालेराव १७, प्रवीण मुळम १५, अवांतर १३ माणिक ढगे मुजीब शेख मारोती शेल्लाळे मनोज कऱ्हाळे प्रत्येकी २ बळी **विजयी विरुद्ध वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी :** १४१/७ (१९.१) प्रवीण पंडित ४०, धीरज पाथरीकर ३४, अमोल गरुड १७, अवांतर १६ धावा सिद्धेश चव्हाण १८/३, संजय पवार २६/२, श्रीकांत मोंढे १ बळी

**सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे :** १६५/३ (२०) मनीष गायकवाड ५७, नितीन प्रसाद ४८, बसवंत गजलवार नाबाद २५, शंतनु काशिद नाबाद १६, अवांतर धावा १५ जयराम हंबर्डे २०/१ बळी. **विजयी विरुद्ध स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड :** सर्वबाद १४३ (१९.५) रशीद शेख ४७, पी.मुपडे १८, नरशी कागदा १७, मनोज टाक १५, अवांतर १६ धावा बसवंत गजलवार ३१/३, मनीष गायकवाड, संतोष सुगावे, शंतनु काशिद प्रत्येकी २ व सचिन सुर्वे १ बळी.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### नियमित तपासण्या करून घेतल्यास कॅन्सर टाळता येतो : डॉ. गोलीवाले

**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**

दिवसेंदिवस कर्करोग ग्रस्तांचे प्रमाण चिंताजनकरीत्या वाढत आहे. कर्करोगाने मरणाऱ्या रुग्णांची संख्या वाढत आहे. म्हणून स्त्री-पुरुषांनी नियमित तपासण्या करून घ्याव्यात. प्राथमिक अवस्थेतील कर्करोग शंभर टक्के बरा करता येतो. शेवटच्या अवस्थेत येणाऱ्या रुग्णांना वाचविणे अवघड असते. यासाठी युवक युवतींनी वेळीच दक्षता घ्यावी, असे आवाहन डॉ. फहिम गोलीवाले यांनी केले. ते फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा, एन. के. ऑर्किड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक कॅन्सर प्रतिबंध व जनजागरण दिनाचे औचित्य साधून इंजिनिअरिंग व टेक्नॉलॉजीच्या विद्यार्थ्यांकरिता कॅन्सर याविषयी मार्गदर्शन करताना बोलत होते. शिबिराचे उद्घाटन डॉ.फहीम गोलीवाले यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बी.के. सोनगे हे होते. यावेळी व्यासपीठावर उपप्राचार्य प्रा. डॉ. श्रीनिवास मेतन, एफ. पी. ए. आय.सोलापूर शाखेचे मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर, चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी. तेली, माजी अध्यक्षा प्रा. डॉ. नभा काकडे, प्रा. डॉ. श्रीकांत जहागीरदार, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, कार्यक्रम अधिकारी वीरेंद्र परदेशी उपस्थित होते. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. बी. के. सोनगे यांनी केले. प्रास्ताविक डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी केले. प्रमुख पाहुण्यांची ओळख प्रा. डॉ. नभा काकडे यांनी करून दिली. सूत्रसंचालन सुगतरत्न गायकवाड यांनी केले तर आभार प्रा. डॉ. श्रीकांत जहागीरदार यांनी मानले.



### मेहता शाळेत भाजी मंडई व दुकान जत्रेचे आयोजन

**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**

कै. वि. मो. मेहता शाळेत ३१ जानेवारी रोजी भाजी मंडई व दुकान जत्रा हा अभिनव उपक्रम साजरा करण्यात आला. इयत्ता ५ वीच्या विद्यार्थ्यांची भाजी मंडई व इयत्ता ६ वीच्या विद्यार्थ्यांची दुकान जत्रा शाळेच्या प्रांगणात भरवण्यात आली. या उपक्रमाचे उद्घाटन पुष्पक देशमाने (पुष्पक इडली गृह) यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांनी पारंपारिक पोशाख परिधान करून कागदी पिशव्या, आकर्षक फलक व भाज्यांद्वारे शरीरास मिळणारी पोषक द्रव्य यांची माहिती देखील दिली. विद्यार्थ्यांचे व्यवहार चातुर्य व प्रसंगावधान यांचे प्रमुख अतिथींनी कौतुक केले. याप्रसंगी अनेक पालक, शिक्षक, शिक्षकेतर वृंद व विद्यार्थी यांनी भाजी खरेदी केली व खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतला. मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी, पर्यवेक्षिका मिनाक्षी भाटवडेकर उपस्थित होत्या.



### साने गुरुजी कथामाला यांच्याकडून महावीर हायस्कूलला पुस्तक संच भेट

**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**

होटगी रोड येथील महावीर हायस्कूल ला साने गुरुजी कथामाला यांच्याकडून श्यामची आई या पुस्तकांचा संच भेट देण्यात आला. शालेय ग्रंथालयासाठी प्रशालेच्या मुख्याध्यापिका पाटील यांनी संच स्विकारला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पाटील होत्या. कार्यक्रमास साने गुरुजी कथामालाचे अध्यक्ष अशोक खानापुरे, दसाडे सर, अशोक म्हमाने यांची उपस्थिती होती. साने गुरुजींचे विचार, संस्कार प्रत्येक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावेत हा उद्देश या कथामालेचा आहे हे रंग सिद्ध दसाडे सरांनी आपल्या मनोगता तुन व्यक्त केला. उपस्थितांचा प्रशालेच्या वतीने सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन बसवराज बिराजदार यांनी केले

## निधन वृत्त...

### दीपक कलशेट्टी



**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**

भवानी पेठ घोंगडे वस्ती येथील जन्मभूमी मित्र मंडळाचे अध्यक्ष दीपक शांतमल कलशेट्टी (वय ५५) यांचे गुरुवार, दि. ५ फेब्रुवारी रोजी निधन झाले आहे. रूपाभवानी येथील रुद्रभूमी येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, मुलगा, सून, मुलगी, जावई नातवंडे असा परिवार आहे.

### सुखदेव दत्तू



**मंगळवेढा, दि.६ फेब्रुवारी-**

दत्तू गल्ली येथील सुखदेव विठोबा दत्तू यांचे शुक्रवार दिनांक ६ फेब्रुवारी २०२६ रोजी पहाटे ४.०० वाजणेच्या सुमारास अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्युसमयी ते ६५ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा,सुन, नातू असा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ता सिद्धेश्वर दत्तू यांचे ते बंधु होत.

# १२ फेब्रुवारीपासून इलेक्ट्रो प्रदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**

सोलापूर इलेक्ट्रॉनिक्स डिलर्स असोसिएशनतर्फे (सेडा) दि. १२ ते १८ फेब्रुवारी या कालावधीत होम मैदानावर फेब्रुवारीपासून इलेक्ट्रो प्रदर्शन आयोजित केले आहे, अशी माहिती 'सेडा'चे अध्यक्ष डॉ. सूरजरतन धूत यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिली.




प्रदर्शनाचे उद्घाटन गुरुवार दि. १२ फेब्रुवारी रोजी सायं. ५ वा. व्हिप्लस कंपनीचे सीइओ संदीप पाटील यांच्या हस्ते होणार असल्याचे माहिती माजी अध्यक्ष ईश्वर मालू यांनी सांगितले.

७ दिवस चालणा ऱ्या इलेक्ट्रो २०२६ या प्रदर्शन दररोज दु. ४ ते रा. ९.३० व रविवारी स.११ ते रा.९. ३० पर्यंत चालणाऱ्या या प्रदर्शनामध्ये राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांचा सहभाग असून एलईडी,फ्रिज , साईड बाय साईड फ्रिज, एअर कंडीशनर, म्युझिक सिस्टीम, वॉशिंग मशीन, डिश टिव्ही, मायक्रोवेव ओव्हन, व्हॅक्यूम क्लिनर, एअर कंडीशनर, कॉम्प्युटर, लॅपटॉप प्रिंटर्स, नेटवर्किंग- वायफाय प्रॉडक्ट्स, बिझनेस सॉफ्टवेअर, सोलार सिस्टीम, गॅस गिझर, मोबाईल, आयपॅड, टेलीफोन, मिक्सर,फूड प्रोसेसर, आटा चक्की, एअर कुलर, वॉटर प्युरीयर, स्टॅबीलायझर, चिमणी हुड, फिटनेस इक्विपमेंटस् इत्यादी या प्रदर्शनामध्ये उपलब्ध असतात. प्रदर्शनाचे यंदाचे खास आकर्षण म्हणजे एआय वर आधारीत टीव्ही ची नवीन १०० ते १२० इंचची श्रेणी, सोलार चार्जर स्टेशन, डिजिटल होम अप्लायन्सेस, बारकोड स्कॅन केल्यावर घरबसल्या संपूर्ण माहिती, सह ५ वेगळे डोम्स (जर्मन हॅंगर) मध्ये प्री फॅब्रीकेटेड व कंपनी फिटेड स्टॉल्स असणार आहेत. या प्रदर्शनामध्ये ठिकठिकाणी ग्राहकांना बसण्याची सोय, मोफत पार्किंग तसेच शुध्द पिण्याचे पाण्याची सोय केलेली आहे. भेट देणाऱ्या ग्राहकांना दररोज लकी व शेवटच्या दिवशी बंपर ड्रॉ काढण्यात येणार आहे. सर्व स्टॉलमध्ये जवळपास ४५० विविध कॉलेजमधील पदवीधर व एमबीए विद्यार्थ्यांना सेडा मार्फत ट्रेनिंग देवून ग्राहक सेल्स माहिती देण्यात येणार आहे. पत्रकार परिषदेस सेडाचे उपाध्यक्ष भूषण भुतडा, सचिव हरीश कुकरेजा , खजिनदार सुयोग कालाणी, सहसचिव गिरीश मुंदडा, संचालक सर्वश्री चंद्रकांत शाहपुरे, बसवराज नवले, विजय टेके व संस्थेचे माजी अध्यक्ष आनंद येमूल, ईश्वर मालू, शिवप्रकाश चव्हाण, खुशाल देढिया उपस्थित होते.

**ग्राहकांना स्टॉलची माहिती क्यूआर कोडवर**

संपूर्ण प्रदर्शन जास्तीत जास्त कसे डिजीटल होईल यावर संपूर्ण कटाक्ष आहे. प्रर्दशनासाठी प्रशस्त मोफत पार्कींगची सोय व माहितीसाठी वेगळे काऊंटर व सहभागी स्टॉल्सची माहिती क्यूआर कोडद्वारे सर्वांना त्यांच्या मोबाईलवरच मिळण्याची सोय यंदा करण्यात आली आहे, असे माजी अध्यक्ष ईश्वर मालू यांनी सांगितले.

## सुयश गुरुकुल येथे सोहम येमूल यांचे बोलक्या बाहुल्याचे कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**



विद्यार्थ्यांमध्ये कलेची आवड निर्माण व्हावी आणि त्यांच्यांतील सुप्तगुणांना प्रोत्साहन मिळावे, यासाठी सोरेगाव येथील सुयश गुरुकुल येथे पपेट शो हा कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी सोहम येमूल यांच्या बोलक्या बाहुल्याचे कार्यक्रम संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस पपेटियर सोहम येमूल याची ओळख करून देण्यात आली. सोहम हा भारतातील सर्वात कमी वयाचा बोलक्या बाहुल्या आणि कटपुतली कलाकार आहे. अलिकडेच थायलंड येथील हार्मनी पपेट फेस्टिव्हल मध्ये भारताचे प्रतिनिधित्व करीत कटपुतलीतून गीत रामायण सादर केले. सोहम श्री म फ दमाणी प्रशाला येथे इयत्ता नववीत शिकत आहे. सुरुवातीस सोहमने छोटू ह्या आपल्या बाल मित्राशी मारलेल्या गप्पा सादर केल्या. छोटू हा अमेरिकेतील प्रसिद्ध सिसेमी स्ट्रीट्स मधील इल्मो बाहुला बदल करून बोलका बाहुला केला आहे. सोहमला ओठ न हलविता बोलता येते हे लक्षात आल्या नंतर त्याच्या वडिलांनी हा पहिला बाहुला बनवून दिला. त्या नंतर सोहम ने नॉडी हाय जोकर बाहुल्याशी केलेले विनोदी संभाषण सादर केले. भारताचे पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांचे २०१९ सालात लातूर येथे केलेल्या भाषणाचे काही अंश मोदी पपेटद्वारे प्रस्तुत केले. महात्मा गांधीजी यांच्या १५० व्या जयंती निमित्त केलेल्या कटपुतलीतून तीन महत्वाच्या घटना सादर केले. केशव शिंदे यांनी सोहमच्या कला गुणांचे कौतुक केले. प्रास्ताविक स्वाती फलटणकर यांनी केली. यावेळी सेंट्रलच्या मुख्याध्यापिका विद्या शिंदे, मुख्याध्यपिका श्रद्धा लकडे, मुख्याध्यापक मार्तंड कुलकर्णी उपस्थित होते. उत्तम राजगुरू आणि केशव शिंदे यांनी आभार मानले.



### श्रीनाथ विद्यालय व ज्युनिअर कॉलेजमध्ये बारावी विद्यार्थ्यांना निरोप

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. ६ फेब्रुवारी-**

श्रीनाथ विद्यालय व ज्युनिअर कॉलेज माळशिरस याठिकाणी बारावीतील विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्येची देवता सरस्वती प्रतिमेचे पूजन संस्थाध्यक्ष डॉ. आप्पासाहेब देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सचिन बोरावके, मुख्याध्यापक मधूकर गुंड, प्राचार्य योगेश गुजरे व संस्थाध्यक्ष आप्पासाहेब देशमुख यांनी मनोगत मांडले.

याप्रसंगी संस्थाध्यक्ष डॉ. आप्पासाहेब देशमुख, संचालक रावसाहेब देशमुख, महादेव माने, महेश बोत्रे, निलेश घाडगे, बाबासाहेब माने, अनिरुद्ध शिंगाडे, सर्जेराव पाटील, मुख्याध्यापक मधुकर गुंड, प्राचार्य योगेश गुजरे उपस्थित होते.

## दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी मोफत तिरुपती बालाजी देवदर्शन

**लक्ष्मण बुधवंत यांचा पुढाकार**

**सलग बाराव्या वर्षी यशस्वी आयोजन**




**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. ६ फेब्रुवारी-**

करमाळा तालुक्यातील रावगाव येथील सुपुत्र लक्ष्मण बुधवंत यांच्या संकल्पनेतून आणि हैदराबाद येथील सामाजिक कार्यकर्ते वेणू कुमारजी चुक्ला यांच्या सहकार्याने दिव्यांग विद्यार्थ्यांना मोफत तिरुपती बालाजी देवदर्शन घडवून आणणारा एक अनोखा, प्रेरणादायी व सामाजिक बांधिलकी जपणारा उपक्रम यंदाही यशस्वीरीत्या पार पडला.

श्री अष्टोदरा शताः १०८ चुक्ला चॅरिटेबल ट्रस्ट, हैदराबाद आणि वेणू व्यंकटेशा चॅरिटेबल ट्रस्ट, रावगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आंध्र प्रदेशातील पिरमलु येथील १०८ दिव्यांग विद्यार्थ्यांची श्री तिरुपती बालाजी देवदर्शन यात्रा भक्तिभावपूर्ण वातावरणात आणि काटेकोर नियोजनात संपन्न झाली.

यात्रेप्रसंगी चुक्ला चॅरिटेबल ट्रस्टचे सर्वेसर्वा वेणू कुमारजी चुक्ला, लक्ष्मण बुधवंत, डॉ. योगेश पाटील यांच्यासह ट्रस्टचे कर्मचारी व स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी तिरुमला तिरुपती देवस्थानम (टीटीडी) चे अध्यक्ष, सर्व ट्रस्टी व कर्मचारी वर्ग यांनी मोलाचे सहकार्य केले. त्यांच्या सहकार्यामुळे दिव्यांग विद्यार्थ्यांना कोणताही अडथळा न येता सुरक्षित आणि सुलभ देवदर्शनाचा लाभ मिळाला.

## जयंती, उत्सव काळात डॉल्बी अन् प्रखर प्लाझ्मा-बीम लाईट वापरावर बंदी

**पोलीस आयुक्तांनी काढले आदेश**


**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**

माता रमाई जयंती (दि. ०७ फेब्रुवारी) व छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव (दि. १५ ते १९ फेब्रुवारी) निमित्त सोलापूर शहरात विविध मिरवणुकींचे आयोजन करण्यात आले आहे. या उत्सव कालावधीत (दि. ७ ते २० फेब्रुवारी २०२६) मिरवणुकांमध्ये डॉल्बी सिस्टीमचा मोठ्या प्रमाणात वापर होण्याची शक्यता लक्षात घेता, नागरिकांच्या आरोग्यास व सुरक्षिततेस धोका निर्माण होऊ नये म्हणून डॉल्बी सिस्टीमचा वापर प्रतिबंधित करण्यात आला आहे.




गतकाळात डॉल्बी सिस्टीममुळे काही नागरिकांना कान, छातीचे त्रास होऊन अपंगत्व अथवा जीवितास धोका निर्माण झाल्याची प्रकरणे निदर्शनास आली होती. याबाबत जेष्ठ नागरिक व सामाजिक संघटनांनी निवेदने सादर करून डॉल्बी सिस्टीममुळे होणाऱ्या दुष्परिणामांबाबत चिंता व्यक्त केली होती. त्यानुसार भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १६३(१) प्रमाणे हा आदेश पोलीस आयुक्त, शहर एम. राजकुमार यांनी दिला आहे. तसेच मिरवणुकीदरम्यान प्लाझमा बीम लाईट, लेझर लाईट यांचा प्रखर प्रकाश वाहन चालकांच्या डोळ्यांना दिपवून अपघात घडू शकतो, तसेच नागरिकांच्या डोळ्यांना कायम स्वरूपी इजा होण्याची शक्यता असल्याने या प्रकाशयंत्रणांवरही बंदी घालण्यात आली आहे. शहरात या उत्सव काळात सुमारे २१९ सार्वजनिक मंडळे स्थापन होत असून, त्यापैकी ३२ मंडळे मिरवणुकीत सहभागी होतात. मंडळांनी साऊंड सिस्टीमसोबत प्लाझमा व लेझर लाईटचा वापर टाळावा, असे आदेश देण्यात आले आहेत. या आदेशाचा भंग करणाऱ्या व्यक्तीवर कारवाई करण्यात येईल, असेही पोलीस आयुक्तांनी स्पष्ट केले आहे.

## जि.प व पं.स मतदानासाठी सांगोला प्रशासन सज्ज



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.६ फेब्रुवारी -**

जि.प व पं.स सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर सांगोला तालुक्यात मतदान प्रक्रियाची तयारी पूर्ण झाली असून शुक्रवार दि.६ फेब्रुवारी रोजी स. ८ वा. पासून पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर सभागृहाचे समोर निवडणूक निरीक्षक अरुण आनंदकर, निवडणूक निर्णय अधिकारी बी.आर. माळी व सहा.निवडणूक निर्णय अधिकारी बाळूताई भागवत यांनी नियोजन करून १४ टेबलद्वारे २७४ केंद्रावर मतदानासाठी लागणारे सर्व साहित्य वाटप करण्यात आले असल्याची माहिती मीडिया नोडल अधिकारी मिलिंद सावंत यांनी दिली.

सर्व मतदान पेट्या कडक सुरक्षा व्यवस्थेत केंद्रावर पोहोचण्यासाठी सांगोला पोलीस निरीक्षक विनोद घुगे व उपनिरीक्षक पवन मोरे यांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता. तसेच मतदान केंद्रावरील स्टाफ यांना किरकोळ औषध उपचार व आरोग्य सुविधा देण्यासाठी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. संदीप देवकते, आरोग्य सहायिका के.डी.बोत्रे, आरोग्य सहाय्यक एस.डी.क्षीरसागर, आरोग्य सेविका चिमू घाडगे, सीएचओ सना सय्यद, वसीम शेख, आरोग्य सेवक राहुल नरोटे उपस्थित होते. १३७० कर्मचारी ४२ एसटी बस व २ जीप द्वारे बुथवर रवाना झाले असल्याची माहिती वाहतूक नोडल अधिकारी महेश जाधव यांनी दिली. सर्व कर्मचारी बुथवर पोलीस पाटील यांच्यामार्फत पोहोच झाले आहेत.

सदर निवडणूकीसाठी ३२ क्षेत्रीय अधिकारी यांची नेमणूक निवडणूक निर्णय अधिकारी बी.आर.माळी यांनी केली असून स.६ वा. पासून ते निवडणूक मतदान संपेपर्यंत आपले झोनमध्ये दक्ष राहून निवडणूक प्रक्रियेवर सतत देखरेख ठेवून कोणतीही अडचण उद्भवल्यास तात्काळ उपायोजना करणार आहेत. नियंत्रण कक्षामध्ये मतदानाची आकडेवारी घेण्यासाठी १० टेबल ठेवण्यात आले असून दर २ तासांनी झालेल्या मतदानाची आकडेवारी घेण्यासाठी नियंत्रण अधिकारी बाळासाहेब मोरे, पथक प्रमुख सचिन कुंभार, आकाश गोडसे, समाधान वाघमोडे, अमोल देशमुख, अण्णासो सरगर यांची नेमणूक करण्यात आली आहे.

**- बाळूताई भागवत, सहा.निवडणूक निर्णय अधिकारी**

जि.प व पं.स सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदान व मतमोजणी अनुषंगाने सांगोला तालुक्यामध्ये डीवायएसपी- २, पीआय- १, एपीआय/पीएसआय- १४, पोलीस अमलदार- २३०, एसआरपीएफ- १ प्लाटून, गृह रक्षक दल- ३०० याप्रमाणे पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

**- विनोद घुगे, पोलीस निरीक्षक, सांगोला**

## शंकरलिंग प्रशालेतील दहावी विद्यार्थ्यांना निरोप



**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. ६ फेब्रुवारी-**


वळसंग (ता.द.सोलापूर) येथील श्री शंकरलिंग प्रशालेतील इयत्ता १०वी मधील कन्नडचे १९, सेमीचे ५९ व मराठीचे ५६ असे १३४ विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री शंकरलिंग स्कूल कमिटीचे चेअरमन शिवशरण थळंगे हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून निवृत्त प्राध्यापक तथा श्री रामलिंगेश्वर प्रशाला, तीर्थचे चेअरमन डॉ. भिमाशंकर बिराजदार, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ उप प्रादेशिकचे निवृत्त अधिकारी शंकर केंदुळे, संस्थेचे उपाध्यक्ष विश्वनाथ थळंगे,सदस्य तथा निवृत्त मुख्याध्यापक शिवशरण प्याटी, प्रकाश दुधगी, रमेश दुधगी,शंकर केशट्टी, मल्लिनाथ थळंगे, संजय दुधगी, निवृत्त सेवक ईरप्पा मामा केशट्टी, रामलिंग चनशेट्टी, खैराटे, ढब्बे परिवारांतील सदस्य उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रास्ताविक प्राचार्य वीरेश थळंगे यांनी केले.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता आदर्श विद्यार्थी व विद्यार्थिनी म्हणून श्रीधर ढब्बे व मानसी खैराटे यांची निवड करण्यात आली. सुरेश चौगुले यास बहुगुणी विद्यार्थी म्हणून प्रशालेच्या वतीने सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी प्रशालेतील १६ विद्यार्थ्यांना प्रत्येकी ५०० प्रमाणे परीक्षा शुल्क मान्यवरांच्या हस्ते देऊ करण्यात आले. निरोप घेणाऱ्या दहावीच्या विद्यार्थ्यांतर्फे प्रशालेस एक डायस तर आदर्श विद्यार्थिनीच्या परिवारातर्फे श्री शंकराची मूर्ती भेट म्हणून देण्यात आले. या दिनाचे औचित्य साधून प्रशालेतील कनिष्ठ लिपिक गौरीशंकर चनशेट्टी यांना सोलापूर जिल्हा माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी पतसंस्थेतर्फे आदर्श लिपिक पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे संस्था व प्रशालेच्या वतीने सपत्नीक सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संजयकुमार धनशेट्टी, सिध्दाराम भैरामडगी, निलकंठ कवटगी,बसवराज दुधगी, विरेश थळंगे, संतोष कस्तुरे, मल्लिनाथ गौडगाव, विजय प्याटी, शिवराज अष्टगी, विजयालक्ष्मी थळंगे, शैला निंबाळ, स्नेहा हळगोदे, लिपिका राजश्री दुधगी, सेवक कट्टेप्पा कोळी,विनोद दुधगी यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन श्रीमंत भोसले तर आभार तानाजी जमादार यांनी मानले.

## नरखेड येथे गजानन महाराज प्रकट दिनानिमित्त हरिनाम सप्ताह

**तभा वृत्तसेवा,**
**नरखेड, दि. ६ फेब्रुवारी-**



मोहोळ तालुक्यातील नरखेड येथील श्री विठ्ठल मंदिरामध्ये श्री सद्गुरु गजानन महाराज प्रकट दिनानिमित्त पुराण कथा सप्ताहाचे आयोजन २ ते ८ फेब्रुवारी या कालावधीमध्ये करण्यात आले आहे.

यामध्ये येथे सोमवार दि. २ फेब्रुवारीपासून शिवपुराण कथा महोत्सवाची सुरुवात करण्यात आली आहे. त्यामध्ये रोज सकाळी काकडा, पारायण गाथा, भजन, प्रवचन व दररोज संध्याकाळी शिवपुराण कथेचं आयोजन करण्यात आले. दररोज संध्याकाळी शिवपुराण कथाकार श्री रामनाथ रामचंद्र अय्यर पुणे यांचे यांचे शिवपुराण कथेचे आयोजन केलेले आहे. त्यांना साथ देण्यासाठी तबलावादक योगेश देशपांडे व हार्मोनियम साथ हभप सुधाकर शिंदे साथ मिळणार आहे. दररोज प्रवचनाची सेवा हभप रघुनाथ बाबर महाराज ढेकळेवाडी यांची आहे. प्रगट श्री संत गजानन महाराज प्रकट दिनानिमित्त रविवार दि. ८ फेब्रुवारी रोजी हभप रामनाथ रामचंद्र अय्यर महाराज यांचे कीर्तन सेवा होणार आहे. तरी या शिवपुराण कथा सप्ताहाचा लाभ घ्यावा, असे अहवाल श्री विठ्ठल मंदिर सांप्रदायिक मंडळाने केले आहे.

# 'भाजपा'चे सर्व नगरसेवक शहर विकासाचे काम करतील : पालकमंत्री

- मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिलेला शब्द पूर्ण करतील
- लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी विरोधी पक्षाचे अस्तित्व महत्वाचे
- दोन्ही आमदार देशमुखांची अनुपस्थिती; नेहमी चांगल्या गोष्टी घडत असतात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ फेब्रुवारी-**

सोलापूर महापालिकेच्या निवडणुकीत जनतेनी ८७ जागा जिंकून देत भारतीय जनता पार्टीला सत्ता दिली. त्यामुळे 'भाजपा'चे सर्व नगरसेवक शहर विकासाचे काम करतील. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विकासासाठी दिलेला शब्द ते पूर्ण करतील, असा विश्वास पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सोलापूर महापालिकेत पत्रकारांशी बोलताना व्यक्त केला.



तत्पूर्वी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते महापौर विनायक कोंड्याल, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांचा सत्कार करण्यात आला. सोलापूर महापालिकेतील दोन्ही निवडी बिनविरोध होणे अपेक्षित होते. यासाठी सहकार्य केलेल्या सर्वांचे धन्यवाद. आता निवडणूक संपली असून आता शहर विकासाला प्राधान्य देऊ. सोलापूरकरांना दिलेला शब्द पूर्ण करण्यात येईल.

समसमान निधीच्या अटीवर विरोधकांनी उमेदवारी अर्ज मागे घेतले आहेत. तो शब्द पाळणार का? असे विचारले असता त्यांनी सांगितले की, महापौर कोंड्याल हे विरोधी पक्षासह सर्वांना घेऊन काम करतील. सकारात्मक भूमिका घेऊन विरोधक राहिल्यास आम्हीही सकारात्मक भूमिका ठेवू. लोकशाही सक्षम ठेवण्यासाठी विरोधी पक्षाचे अस्तित्व महत्त्वाचे आहे. विरोधी पक्षनेता पदाचा निर्णय महापौर घेतील.

**चर्चेअंती निर्णय**

स्वीकृत सदस्य निवडीसंदर्भात बोलताना पालकमंत्री गोरे यांनी सांगितले की, यासंदर्भात सर्वांनी मिळून चर्चेअंती निर्णय घेण्यात येईल.

'भाजपा'चे आमदारद्वय विजयकुमार देशमुख व सुभाष देशमुख हे दोघे अनुपस्थित राहिले; याकडे पालकमंत्र्याचे लक्ष वेधले असता ते म्हणाले, नेहमी चांगल्या गोष्टी घडत असतात. त्या दोन्ही आमदारांनीही आपापल्या फेसबुकवर नव्या पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. यावेळी सभागृह नेते नरेंद्र काळे, शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, नगरसेवक अनंत जाधव, किसन जाधव आदी उपस्थित होते.

# आई-वडिलांच्या कष्टांना मिळाला मानाचा मुकुट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ फेब्रुवारी-**

जुनी मिल वीरचंदपूर चाळ सुमारे १२५ वर्षांची परंपरा, कामगारांच्या घामाचा गंध आणि संघर्षाची साक्ष देणाऱ्या भिंती. याच चाळीत वाढलेले विनायक कोंड्याल आज शहराचे प्रथम नागरिक म्हणजेच सोलापूरचे महापौर झाले आहेत. महापौरपदाची घोषणा होताच चाळीत जल्लोष आणि जणू दिवाळी साजरी करण्यात आली. जुनी मिल चाळीतील अरुंद गल्ल्यांतून सुरू झालेला त्यांचा प्रवास आज महापौरपदाच्या उंचीवर पोहोचला आहे. तरीही राहणीमान मात्र तेच साधे, मातीशी जोडलेले.



महापौरांचे वडील रामकृष्ण कोंड्याल सांगतात, या चाळीत आमचे आजोबा गणपतराव कोठे, वडील सायण्णा कोंड्याल मिलमध्ये कामाला होते. अनेक वर्षांचा सहवास, ऋणानुबंध आम्हाला इथून दूर जाऊ देत नाही. संघर्षाच्या या परंपरेतूनच विनायक कोंड्याल घडले. मातोश्री संगीता कोंड्याल यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळलेले. माझा मुलगा शहरासाठी चांगले काम करेल. दरम्यान, महापौरपदाची घोषणा होताच चाळीत जल्लोष करण्यात आला. महिलांनी औक्षण करून, फुलांच्या वर्षावात 'आपला विनायक' महापौर झाला, असे म्हणत आनंद साजरा केला.

महापौरांच्या पत्नी धनश्री कोंड्याल यांनी सांगितले की, विनायक कोंड्याल यांना संधी दिल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार देवेंद्र कोठे, आमदार विजयकुमार देशमुख, आमदार सुभाष देशमुख, शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर या सर्वांचे मी आभार मानते.

विनायक कोंड्याल हे विकासाभिमुख व सक्षम नेतृत्व आहेत. ते शहराचा सर्वांगीण विकास साधतील. राज्य नेतृत्वाचे आभार मानत, हे पद विनायकसाठी नव्हे, तर सर्वसामान्य कष्टकरी कुटुंबासाठी अभिमानाचा क्षण आहे, असेही त्या म्हणाल्या.



# पाणी, रस्त्यांसह विविध सुविधा देण्यासाठी प्रयत्न

## नूतन महापौर विनायक कोंड्याल यांची ग्वाही

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ फेब्रुवारी-**

सोलापूर शहरवासीयांनी भाजपवर मोठा विश्वास टाकून तब्बल ८७ जागी विजय मिळवून दिला यामुळे सोलापूर शहराच्या विकासासाठी कटिबद्ध आहोत शहरवासीयांसाठी पाणी डीपी रस्ते स्वच्छता ग्रीन झोन यासह विविध सोयी सुविधा देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची ग्वाही नूतन महापौर विनायक कोंड्याल यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.

महापौर विनायक कोंड्याल पुढे म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, पालकमंत्री जयकुमार गोरे , आमदार देवेंद्र कोठे, आमदार सुभाष देशमुख , आमदार सुभाष देशमुख, आमदार सचिन कल्याणशेट्टी, शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर यांनी विश्वास टाकून मोठी संधी दिल्याबद्दल त्यांचे आभार मानले. वरिष्ठांनी दिलेल्या संधीचे सोने करणार आहे. सोलापूर शहरवासीयांनी भाजपावर मोठा विश्वास टाकला. सोलापूर शहराचा सर्वांगीण विकास करतानाच शहरवासीयांना पाणी, रस्ते, स्वच्छता, ग्रीन झोन यासह इतर सुविधा देण्याचा प्रयत्न करणार आहे.

# डी.आर. श्रीराम स्कूलच्या नवीन इमारतीचे वास्तुशाती संपन्न

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ फेब्रुवारी-**

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित डी.आर. श्रीराम इंग्लिश मीडियम शाळेच्या इमारतीचे वास्तुशांती थाटात संपन्न झाला. या इमारतीच्या बांधकामासाठी दि.२३ ऑगस्ट २०२४ रोजी बालाजी अमाईन्सचे व्यवस्थापकीय संचालक डी. राम रेड्डी यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले होते. देणगीदार अमित श्रीराम यांनी या शाळेसाठी पाच लाख रुपये देणगी देणार असल्याचे जाहीर केले.

संस्था शतकोत्तर वाटचाल करत असून काळानुरुप आधुनिक शिक्षण देण्याचा प्रयत्न नेहमी करत असते. या शाळेत सहशालेय उपक्रम राबवण्यात येतील असे नृत्य, चित्रकला, संगीत यांसारखे विषय घेतले जातील. भविष्यात इयत्ता अकरावी कॉमर्स व सायन्स सुरू करण्याचा मानस आहे. बदलत्या काळानुसार संस्था शिक्षण देत असल्याने अनेक विद्यार्थी या संस्थेतून घडत आहेत, असे शिक्षण संस्थेचे सचिव दशरथ गोप यांनी सांगितले.



याप्रसंगी अंबाजी गुर्रम, हरिबाबू येले, प्रवीण पोटाबत्ती, काशीनाथ गड्डम, सुरेश फलमारी, प्रवीण कांबळे, अतुल कोटा, नागनाथ सोमा, लक्ष्मीनारायण कमटम, राजमहिंद्र कमटम, मोहन कमटम, शशिकांत केंची, सुरेखा बोमड्याल, संतोष सोमा, श्रीधर गुंडेली, यादगिरी कोंडा, डॉ.गुल्लापल्ली, अविनाश कोंडा, किरण सोमा, दत्तात्रय श्रीराम, सत्यनारायण वंगा, राजेंद्र शेंडगे, अमृतदत्त चिन्नी, लक्ष्मीनारायण कुचन, रमेश विडप, सुरेश श्रीराम, श्रीहरी कोटा, अनिल कन्ना, रमेश अलवाल, अविनाश संगा, अनिलकुमार जन्याराम, उमापती मिठ्ठापल्ली, नागेश कोंगारी, अरुणा कन्ना, भारती सग्गम, श्रीनिवास गड्डम, प्रा.श्रीनिवास कोंडी, मल्लिकार्जुन सरगम, गोवर्धन कमटम, दिनेश यन्नम, पांडुरंग दिड्डी, नागनाथ गंजी, श्रीधर चिट्याल, व्यंकटेश आकेन, विजयकुमार गुल्लापल्ली, मधुकर कट्टा, संगीता इंदापुरे, नागनाथ श्रीरामदास, रमेश बोध्दूल, प्रभाकर अरकाल, श्रीनिवास जोग, श्रीनिवास गड्डम, गणेश गुज्जा, हरीष कोंडा, रामदास इप्पाकायल, अंबादास गज्जम, श्रीनिवास इप्पाकायल, अमित श्रीराम, अरविंद कुचन, निलेश सरगम, यशवंत इंदापुरे, अजिता पिल्लाई आदी उपस्थित होते.



# जय श्रीराम... एकच वादा देवेंद्र दादा, एकच वादा विनायक दादा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ फेब्रुवारी-**

सोलापूर महानगरपालिकेच्या महापौरपदी विनायक कोंड्याल आणि उपमहापौरपदी ज्ञानेश्वरी देवकर यांची बिनविरोध निवड जाहीर होताच शुक्रवारी मनपा परिसरात जल्लोष करण्यात आला. भारतीय जनता पार्टीचा विजय असो... जय श्रीराम... एकच वादा देवेंद्र दादा... एकच वादा विनायक दादा... अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता.

क्रेनच्या सहाय्याने आणलेले भलेमोठे हार पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार देवेंद्र कोठे आणि महापौर कोंड्याल यांच्या गळ्यात घालण्यात आले. दुपारी १.२५ वाजता कोंड्याल सभागृहातून बाहेर येताच जल्लोषाला उधाण आले. १.३० वाजता पालकमंत्री दाखल होताच फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली.

दुपारी २.१० वाजता सजविलेल्या डिजिटल जीपमधून महापौर कोंड्याल यांनी नागरिकांना अभिवादन केले. या जीपमधून मिरवणूक काढण्यात आली. २.१८ वाजता भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह पुण्यश्लोक आप्पासाहेब वारद, यशवंतराव चव्हाण, इंदिरा गांधी यांच्या पुतळ्यांना पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

# आजपासून प्रिसिजन संगीत महोत्सव

- देवकी पंडित, मंजिरी कर्वे-आलेगावकर यांना ऐकण्याची संधी
- निखिल पटवर्धन यांचे सतार, एस.आकाश बासरी, यज्ञेश रायकर यांच्या व्हायोलिन वादनाचे गुंजणार स्वर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ फेब्रुवारी-**

प्रिसिजन फाऊंडेशनच्या वतीने आजपासून दोन दिवस (शनिवार व रविवार, दि.७ आणि ८ फेब्रुवारी 'प्रिसिजन संगीत महोत्सव' आयोजित करण्यात आला आहे. महोत्सवाचे हे अकरावे वर्ष आहे. सोलापूरमधील हुतात्मा स्मृति मंदिर येथे हा स्वरमहोत्सव रंगणार आहे.




शनिवार, दि.७ फेब्रुवारी रोजी दोन सत्रांत कार्यक्रम होणार आहेत. पहिल्या सत्रात प्रख्यात सतारवादक निखिल पटवर्धन यांचे सतारवादन होईल. त्यांना पांडुरंग पवार तबल्यावर साथ करतील. दुसऱ्या सत्रात प्रसिद्ध गायिका मंजिरी कर्वे-आलेगावकर यांचे शास्त्रीय गायन होईल. त्यांना सौरव दांडेकर (हार्मोनियम) आणि अजित किंबहुने (तबला) साथसंगत करतील, तर प्राची जोगळेकर तानपुऱ्यावर असतील.

रविवार दि. ८ फेब्रुवारी रोजी पहिल्या सत्रात आंतरराष्ट्रीय ख्यातीचे बासरीवादक एस.आकाश यांचे बासरीवादन होईल. त्यांना ईशान घोष तबल्यावर साथ देतील. याच सत्रात यज्ञेश रायकर यांचे व्हायोलिनवादन सादर होणार आहे. महोत्सवाच्या अंतिम सत्रात सुप्रसिद्ध गायिका देवकी पंडित आपली स्वर-साधना रसिकांसमोर मांडतील. त्यांना प्रशांत पांडव (तबला) आणि अभिषेक शिनकर (हार्मोनियम) वर साथसंगत करतील.

प्रिसिजनच्या परंपरेनुसार दोन्ही दिवस कार्यक्रमाची सुरुवात सायंकाळी ठीक ६.२५ वाजता होणार आहे. रसिकांनी वेळेपूर्वी उपस्थित राहून जागतिक दर्जाच्या कलाकारांच्या स्वराविष्काराचा आनंद घ्यावा असे आवाहन प्रिसिजनतर्फे करण्यात आले आहे. सोलापूरकर रसिकांना या महोत्सवाचा आनंद निःशुल्क घेता येणार आहे. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर आसन व्यवस्था असेल, असे सांगण्यात आले.

# दैनिक सोलापूर तरुण भारतचा अंदाज ठरला खरा

## ▸▸सोलापूरचे महापौर, उपमहापौर बिनविरोध

**सोलापूर, दि.६ फेब्रुवारी-**

सोलापूर महापालिकेच्या महापौर आणि उपमहापौर पदाची निवडणूक बिनविरोध होणार असल्याची बातमी दैनिक सोलापूर तरुण भारतने यापुर्वीच प्रसिध्द केली होती. आजच्या निवडीने तो अंदाज तंतोतंत खरा ठरल्याचे सिध्द झाले.

शुक्रवार,दि.६ फेब्रुवारी २०२६ रोजी महापालिकेच्या कौन्सिल हॉल येथे अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या निवड प्रक्रियेअंती विनायक कोंड्याल यांची महापौर तर ज्ञानेश्वरी देवकर यांची उपमहापौरपदी बिनविरोध निवड करण्यात आली. महापौरपदासाठी शिवसेना शिंदे गटाचे प्रियदर्शन साठे, एमआयएमचे तौफिक हत्तुरे यांनी तर उपमहापौरपदासाठी शिवसेना शिंदे गटाचे प्रियदर्शन साठे, एमआयएमचे आसिफ शेख यांनी अर्ज सादर केले होते. दरम्यान, शिवसेना शिंदे गट व एमआयएमच्या उमेदवारांनी आपापले अर्ज माघार घेतल्याने या दोन्ही पदाची निवड बिनविरोध झाली.



सोलापूरच्या नव्या महापौरांची निवड

महापालिकेकडून विभागीय आयुक्तांना प्रस्ताव

महापौर निवड बिनविरोध करण्यासाठी हालचाली?

महापौर, उपमहापौर पदाची निवडणूक बिनविरोध होणार?

● दिवसभर झाली खलबते ● स्थानिक स्तरावर बैठक ● प्रदेश स्तरावर चर्चा

एमआयएम तटस्थ राहणार : शेख

# बार्शी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी प्रशासनाची तयारी पूर्ण

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ६ फेब्रुवारी**

बार्शी तालुक्यात होणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी प्रशासनाची सर्वतोपरी तयारी पूर्ण झाली असून शनिवार दि. ७ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या मतदानासाठी संपूर्ण यंत्रणा सज्ज असल्याची माहिती सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार एफ. आर. शेख यांनी दिली आहे.

बार्शी तालुक्यातील या निवडणुकीत एकूण २ लाख १४ हजार ७५४ मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार असून, त्यांच्यासाठी २५६ मतदान केंद्रांची उभारणी करण्यात आली आहे. प्रत्येक मतदान केंद्रावर १ केंद्राध्यक्ष, ३ मतदान अधिकारी, १ पोलीस कर्मचारी व १ शिपाई अशा सहाजणांची टीम तैनात असणार आहे. याशिवाय पंचायत समितीच्या प्रत्येक गणासाठी दोन अशा प्रकारे एकूण २४ झोनल ऑफिसर नेमण्यात आले असून, मतदान प्रक्रियेदरम्यान उद्भवणाऱ्या अडचणी व समस्यांचे तात्काळ निराकरण करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

मतदान प्रक्रियेकरिता २८२ टीममधून एकूण १,६९२ कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. निवडणूक काळात कोणताही अनुचित प्रकार, हिंसाचार अथवा कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी पोलीस यंत्रणाही सज्ज असल्याचे तहसीलदार एफ. आर. शेख यांनी स्पष्ट केले.

मतदान केंद्रांवर वृद्ध व दिव्यांग मतदारांसाठी व्हीलचेअरची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सर्व केंद्राध्यक्ष व मतदान अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाले आहे. गुरुवार, दि. ६ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता मतदान कर्मचाऱ्यांना आवश्यक साहित्याचे वाटप करण्यात आले असून, सायंकाळी ४ ते ५ वाजेपर्यंत ते आपल्या आपल्या मतदान केंद्रांवर मुक्कामासाठी रवाना झाले आहेत.

तालुक्यातील २,१४,७५४ मतदारांसाठी २५६ मतदान केंद्रांवर पोहोचण्यासाठी ३७ बसेसची वाहतूक व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच ६, ७ फेब्रुवारी रोजी सर्व कर्मचाऱ्यांसाठी जेवणाची व्यवस्था करण्यात आली आहे.

मतदान दिवशी सकाळी ६.३० वाजता मॉक पोल घेण्यात येणार असून, उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींना तो दाखविण्यात येईल. प्रत्यक्ष मतदानाची वेळ सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत असणार आहे. मतदारांना तहसीलदारांचे आवाहन तहसीलदार एफ. आर. शेख यांनी बार्शी तालुक्यातील सर्व मतदारांना आवाहन करताना सांगितले की, जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत ग्रामीण भागातील जास्तीत जास्त मतदारांनी मतदान करुन टक्केवारी शंभर टक्क्यांपर्यंत नेण्याचा प्रयत्न करावा. कोणत्याही आमिषाला बळी न पडता निष्पक्ष, निर्भय व पारदर्शकपणे आपल्या पवित्र मतदानाचा हक्क बजावावा. दरम्यान, मतदान दिवशी आचारसंहितेचा भंग, हिंसाचार अथवा कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी तालुक्यातील संपूर्ण पोलीस प्रशासन सज्ज ठेवण्यात आले आहे.

## मतदान दिवशी तालुक्यात प्रथमच मतदान केंद्रांवर थेट प्रक्षेपणाची व्यवस्था

**मतदानाची निवडणुकीत पहिल्यांदाच थेट प्रक्षेपणाची व्यवस्था**

या निवडणुकीचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे तालुक्यात प्रथमच काही मतदान केंद्रांवर थेट प्रक्षेपणाची (लाईव्ह फीड) व्यवस्था करण्यात आली आहे. निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, मागील निवडणुकांमध्ये घडलेल्या हिंसाचार, मशीन छेडछाड व बोगस मतदानाच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर १२ मतदान केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे मतदान प्रक्रियेचे थेट प्रक्षेपण तहसील कार्यालयातील निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या दालनामध्ये पाहता येणार आहे. थेट प्रक्षेपणाची व्यवस्था असलेली मतदान केंद्र पुढीलप्रमाणे- नारी ३, पिंपळगाव (धस)-२, खडकोणी १, ताडसौंदणे १, खांडवी ३ व देवगाव २ मतदान केंद्रांवर सीसीटीव्हीच्या माध्यमातून प्रशासनाची सतत नजर राहणार आहे.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## विविध वृत्त...

### मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी मतदार जनजागृती

**शिरूर अनंतपाळ:** मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी व्यापक मतदार जनजागृती अभियान लोकशाही अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी वालुक्यात मतदार जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. नागरिकांनी निर्भयपणे आणि मोठया संख्येने मतदान करादे, यासाठी कार्यकर्ते व सामाजिक संघटनांकडून विविध उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ करीता अधिकाधिक मतदारांनी सहभाग घेवून मतदान टक्केवारी वाढविण्यासाठी मतदारांच्या सक्रीय सहभागांचे कार्यक्रम आयोजन करण्यात आले. या जनजागृती मोहिमेत मतदारांशी भेट संवाद साधला जात असून मतदानाचा हक्क व त्यावे महत्व समजावून सांगितले जात आहे. तालुक्यातील साकोळ, आरी, विपराळ, शेंद द. कानेगाव, धुन्मी, सांगवी, येरोळ, सुमठाणा, तिगोल, कांबळगा, बोळेगाव बु., धामणगाव, कारेवाडी, नामेवाडी या गावांमध्ये मतदान जनजागृती करण्यात आली. आगामी निवडणुकीत महदानाची टक्केवारी वाढेल असा विश्र्वास व्यक्त करण्यात येत आहे.

### श्रीराम विद्यालयाच्या बारावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**रेणापूर :** रेणापूर येथील श्रीराम उन्द माध्यमिक विद्यालयात निरोप समारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य सिद्धेश्र्वर मामहमे हे होते. प्राचार्य मामडगे म्हणाले विद्याथ्यांना पालकांच्या कालवी जाग देवून अभ्यास करावा तसेच मोबाईलचा अतिवापर टाळावा प्रा. भरत पायगुडे यांनीही विद्याश्रयांना मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या तर विद्याश्रयांनीही मनोगतातून प्रध्यापकांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली सूत्रसंचलन प्रा. लड्कांत शेवाळे यांनी केले तर आभार प्रा. चंद्रशेखर मोटे यांनी मानले. यावेळी बीडा विभाग प्रमुख विवेक भातिकरे, प्रा. जुबेरखान पठाण, प्रा. विजय गिरी, प्रा. प्रकाश करमुढे, प्रा. बाळासाहेब सूर्यवंशी, प्रा. राजेश खाडए, प्रा. अक्षय अकनगीर, प्रा. गोविंद गव्हाणे यांच्यासह प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

### मतदानामुळे शनिवारी भरणारे आठवडी बाजार बंद राहणार

**लातूर:** लातूर जिल्हा परिषद व त्या अंतर्गत १० पंचायत समितीच्या निवडणुकीचे मतदान शनिवारी होत आहे. या निवडणुकीमध्ये मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा, तसेच मतदान शांततेत पार पडावे, यासाठी जिल्ह्यात ७ फेब्रुवारी रोजी भरणारे आठवडी बाजार बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दिले आहेत.


त्यानुसार लातूर तालुक्यातील कन्हेरी, औसा तालुक्यातील लिंबाळा दाऊ, अशित व किल्लारी, रेणापूर तालुक्यातील पानगाव, निलंगा तालुक्यातील अंबुलगा बु, चाकूर तालुक्यातील वडवळ ना. आणि जळकोट तालुक्यातील घोणसी येथील बाजार बंद राहणार आहेत. मतदानाला व्यत्यय नको म्हणून जिल्हाधिकाऱ्यांनी हा निर्णय घेतला आहे.

### एमाईनमस्कडे जाणाऱ्या रस्त्यावरील खड्डा बनला जीवघेणा

**मुरुड :** बाजारपेठेतील डॉक्टर छलानी बवालान्यासमोर रमाईनगरकडे जाणाऱ्या रस्त्याच्या मधोमध नालीवा मोटा खा खूप दिवसापासून पडला आहे. त्यामुळे या ठिकाणावरून गाहवाना ये-जा करता येत नाही. या रस्त्यातून शाळकरी मुले, जरीव वयोवृद्ध रुग्णालयात येणारे रुग्ण आणि ये-जा करणारी वाहने यांना हा खड़ अडसर ठरत आहे. अनेक वेळेला नजरचुकीने या खड्चामध्ये चार चाकी वाहने अडकून पडल्याचे प्रकार घडले आहेत. प्रशासनारा वारंवार सांगूनही प्रशासन या खड्डय कडे दुर्लक्ष करीत आहे. या सड्डवाच्या जवळपास बोन रुग्णालये असून, मध्यभागी बाजारपेठ आहे. या ठिकाणी गर्दीचे प्रमाण मोले असते, तरीही या खड्ड्चाकडे प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येत आहे, या खड्डवामुळे जवळपासचे राहणारे कुटुंब या सडचात कबरा आणून टाकतात. त्यामुळे दुर्गधी पसरते कन्यामुळे पाण्याचा प्रवाहटी तुबत आहे. याचा सर्वसामान्य जनतेस त्रास सहन करावा लागत आहे. या ठिकाणचे सर्व व्यावसायिक, व्यापारी आणि डॉक्टर यांनीही प्रशासनास सांगितले परंतु काहीही फरक पहल्याचे दिसून येत नाही. हा खा एके दिवशी कोणाचातरी जीव घेतल्याशिवाय बुजदिला जाणार नाही अशी शंका येत आहे, या सहजासाठी संघर्ष विकास समितीच्या वतीने मागील काही दिवसांमारी खड्ड्यांना हार घालण्याचा आंदोलनही करण्यात आल होते तरीही त्याची दखल प्रशासनाने घेतली नाही.

### भगवान गिरी यांचेवर माणखेड येथे अंत्यसंस्कार

**अहमदपूर :** भारतीय जनता पक्षाचे माजी जिल्हा उपाध्यक्ष गोविंद गिरी यांचे वडील भगवान रामराव गिरी यांचे नुकतेच निधन झाले असून अहमदपूर तालुक्यातील त्यांचे मुळ गाव असलेल्या मौजे मानखेड येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. भगवानराव गिरी वय ८७ यांचे अल्पशा आजाराने अहमदपूर येथील निवासस्थानी ५ फेब्रुवारी रोजी सकाळी १० दुखत निधन झाले. त्यांचे मुळगाव असलेल्या मौजे मानखेड येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी अहमदपूर तालुक्यातील भारतीय जनता पक्षाचे सर्व नेते कार्यकर्त्या सह सर्व राजकीय पक्षाचे, सामाजिक क्षेत्रातील पदाधिकाऱ्यांसह मानखेड सोनखेड व पंचक्रोशीतील जनसमुदाय मोठ्या संख्येने उपस्थित होता. भगवानराव गिरी यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले चार मुली सुना व नातवंडे असून गोविंद गिरी व बालाजी गिरी यांचे ते वडील होते.



# विश्वेश्वरय्या पब्लिक स्कूलमध्ये विश्वोत्सव साजरा

**तभा वृत्तसेवा**

**औसा, दि. ०६ फेब्रुवारी :-** औसा तालुक्यातील आलमला येथील विश्वेश्वरय्या शिक्षण मंडळ अंतर्गत असलेल्या विश्वेश्वरय्या पब्लिक स्कुलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलनातून विश्र्वोत्सव उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.




ज्येष्ठ कवी भारत सातपुते यांच्या हस्ते उद् घाटन करण्यात आले. .लातूरचे गटशिक्षणाधिकारी सी. आर. शेख, मेट्रोबेन एज्युकेअर लातूरचे संचालक संतोष लोहार यांची प्रमुख उपस्थिती होती. संस्थाध्यक्ष शिवचरण धाराशिवे अध्यक्षस्थानी होते, तर सचिव, प्राचार्य बसवराज धाराशिवे, वासनगाव केंद्राच्या केंद्रप्रमुख श्रीमती नंदा आचार्य, उपाध्यक्ष प्रभाकर कापसे, विश्वनाथ निलंगेकर, दिलीप आडे, कथक डान्स अकॅडमी, लातूरच्या संचालिका श्र्वेता तंत्रे, सारिका शिरसेकर, प्राचार्य प्रशांत धाराशिवे, योगेश धाराशिवे, प्राचार्य डॉ. विश्वेश्वर धाराशिवे, प्राचार्य गोपाळ दंडिमे, प्राचार्या स्वाती कापसे, प्राचार्य योगेश माशाळकर उपस्थित होते.

या विश्वोत्सहात चिमुकल्या विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक नृत्य, ऐतिहासिक कला, नाटक व गीत-संगीताच्या माध्यमातून आपल्या अंगी असलेल्या सप्तकला गुणांचे आकर्षक सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. तसेच क्रीडा व अबॅकस स्पर्धांमध्ये यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार व बक्षीस वितरण करण्यात आले. ज्येष्ठ कवी भारत सातपुते यांनी संस्थेच्या कार्याची प्रशंसा करत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच गटशिक्षणाधिकारी सी. आर.शेख यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन केले. विश्वेश्वरय्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड टेक्नॉलॉजी, लातूरचे प्राचार्य किशोर जेवे यांनी शाळेच्या प्रगतीविषयी माहिती दिली.

सायली देशमुख यांनी सुत्रसंचालन केले. विश्वेश्वरय्या ज्युनिअर कॉलेज, लातूरचे प्राचार्य अमोल कुंभार यांनी उपस्थितांचे आभार मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेच्या सर्व शिक्षक व कर्मचारीवर्गाने विशेष परिश्रम घेतले.

## सावित्रीबाई फुले आधार आधार आणि पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेसाठी १५ फेब्रुवारीपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ६ फेब्रुवारी :** राज्य शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती (भटक्या जाती क वगळून) आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या, परंतु वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी सन २०२५-२६ साठी सावित्रीबाई फुले आधार योजना आणि पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत प्रत्येक जिल्ह्यात ६०० विद्यार्थ्यांना लाभ मिळणार आहे.

महसुली विभाग शहर आणि क वर्ग महानगरपालिका क्षेत्रात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना भोजन, निवास व निर्वाह भत्त्यासाठी ४३ हजार रुपये, जिल्ह्याच्या ठिकाणी शिक्षण घेणाऱ्यांना ३८ हजार रुपये आणि तालुक्याच्या ठिकाणी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना थेट त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा केले जाणार आहेत. या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवाशी असावा आणि वसतिगृह प्रवेशास पात्र असावा. सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र आवश्यक असून पालकांचे वार्षिक उत्पन्न २.५ लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे. विद्यार्थी त्या शहराचा रहिवाशी नसावा, जिथे शैक्षणिक संस्था आहे. विद्यार्थ्याने बारावीनंतरचे उच्च शिक्षण घेतलेले असावे आणि बारावीत किमान ६० टक्के गुण असावेत. इच्छुक विद्यार्थ्यांनी १५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत https://hmas.mahait.org या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज करावेत. धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांनी पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेसाठी, तर इतर पात्र विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले आधार योजनेसाठी अर्ज करावेत. अधिक माहितीसाठी भगवान केंद्रे (मो. ९५६११०९०१८) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक अभय अटकळ यांनी केले आहे.

## इयत्ता दहावी, बारावी परीक्षा केंद्रांवर प्रतिबंधात्मक आदेश लागू

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ६ फेब्रुवारी :** उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (इयत्ता बारावी) १० फेब्रुवारी, २०२६ ते ११ मार्च, २०२६ या कालावधीत १५२ परीक्षा केंद्रावर व माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता दहावी) २० फेब्रुवारी, २०२६ ते दि. १८ मार्च, २०२६ या कालावधीत २५२ परीक्षा केंद्रावर पार पाडली जाणार आहे. या सर्व परीक्षा केंद्रांच्या परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत.

परीक्षा कालावधीत परीक्षा केंद्रावर व परिसरात गर्दीमुळे कोणताही अनुचित प्रकार घडून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न्न निर्माण होवू नये, यासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये या परीक्षा केंद्राच्या १०० मीटरच्या परिसरात प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आले आहेत. त्यामुळे परीक्षा केंद्राच्या परिसरात प्रवेश करतेवेळी परिक्षार्थी एकत्रितरित्या प्रवेश करणार नाहीत. कोणत्याही प्रकारच्या घोषणा देण्यात येणार नाहीत. परीक्षा केंद्राच्या परिसरात परीक्षार्थी अथवा अन्य व्यक्तीकडून शांततेस बाधा निर्माण होईल, असे कृत्य करण्यात येणार नाही. १०० मीटरच्या परिसरातील झेरॉक्स सेंटर्स, पानटपरी, टायपींग सेंटर, एसटीडी बुथ, ध्वनिक्षेपक इत्यादी माध्यमे आदेशाची मुदत संपेपर्यत बंद राहतील.

परीक्षा केंद्राच्या परिसरात मोबाईल फोन, सेल्युलर फोन, ई-मेल व इतर प्रसार माध्यमे घेवून प्रवेश करण्यास मनाई असेल. कोणत्याही व्यक्तीकडून परीक्षा सुरळीतपणे शांततेच्या वातावरणामध्ये पार पाडण्यासाठी कोणतीही बाधा उत्पन्न करण्यात येणार नाही. परीक्षा केंद्रावर कोणत्याही व्यक्तीस अथवा वाहनास प्रवेश मनाई राहील. हे आदेश परीक्षा केंद्रावर काम करणारे अधिकारी, कर्मचारी परीक्षार्थी केंद्रावर निगराणी करणारे अधिकारी व पोलीस अधिकारी,कर्मचारी यांच्याबाबत त्यांच्या परीक्षासंबंधी कर्तव्ये पार पाडण्याच्या अनुषंगाने लागू राहणार नाहीत. १० फेब्रुवारी,२०२६ ते १८ मार्च,२०२६ या कालावधीमध्ये सकाळी ९ ते दुपारी ६ वाजेपर्यंत हे आदेश लागू राहतील.

## उपशिक्षणाधिकारी पदी सुशील फुलारी यांची निवड

**तभा वृत्तसेवा**

**रेणापूर, दि. ०६ फेब्रुवारी :** महाराष्ट्र राज्य शिक्षण सेवा गट ब मर्यादित विभागीय परीक्षा २०१७ या परीक्षेच्या दि. २९ जानेवारी रोजी जाहीर झालेल्या शिफारस यादीत पानगाव येथील रहिवासी असलेले व सध्या शिक्षण विस्तार अधिकारी जिल्हा परिषद धाराशिव अंतर्गत कळंब पंचायत समिती येथे कार्यरत असलेले सुशील अरविंदराव फुलारी यांची उपशिक्षणाधिकारी म्हणून महाराष्ट्र लोकसेवा आयोग मार्फत शिफारस करण्यात आली आहे



महाराष्ट्र शासन शिक्षण सेवा गट ब मर्यादित विभागीय परीक्षा २०१७ रोजी पार पडली सदर परीक्षेचा निकाल अनेक न्यायालयीन प्रकरणे यामुळे विलंब होत होता त्यातील अंशतः निकाल टप्प्याटप्प्याने लागत असल्याने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या आता जाहीर झालेल्या एकूण तेरा जणांच्या निवड यादी मध्ये श्री सुशील फुलारी यांची निवड करून राज्य शासनाला शिफारस करण्यात आली आहे

पानगाव येथील रहिवासी असलेले सुशील फुलारी हे महाराष्ट्र लोकसेवा आयोगासोबत कायम संघर्ष करत आले आहेत यापूर्वी २००८ च्या उपशिक्षणाधिकारी पदाच्या मुलाखतीपर्यंत त्यांनी मजल मारली होती दरम्यानच्या काळात त्यांची शिक्षण विस्तार अधिकारी श्रेणी दोन या पदावर जिल्हा परिषद धाराशिव अंतर्गत पंचायतसमीती परंडा येथे निवड झाली होती तेथील सात वर्षाच्या प्रभावी कामकाजानंतर सध्या ते कळंब पंचायत समिती अंतर्गत येथे कार्यरत आहेत त्यांचे अनेक उपक्रम राज्यभर गाजलेले आहेत नवोदय शिष्यवृत्तीसाठी तालुकास्तरीय कार्यशाळा घेणे शंभर टक्के पट नोंदणीसाठी गुढीपाडवा प्रवेश वाढवा, मिशन शिष्यवृत्ती नवोदय सराव चाचणी उपक्रम ऑनलाईन साठी, परीक्षा एक मार्गदर्शक अनेक असे अनेक विविध उपक्रम त्यांचे तालुका जिल्हा व राज्य पातळीवर गौरवले आहेत त्यांच्या गुढी पाडवा प्रवेश वाढवा हा उपक्रमाची मा. शिक्षणमंत्र्यानी दखल घेतली आहे त्यांच्या विविध उपक्रमाने तालुकास्तरीय शैक्षणिक गुणवत्ता वाढीच्या उपक्रमाचे धाराशिव जिल्ह्यात कळंबचे नाव अग्रेसर ठेवण्यात ते सतत यशस्वी ठरत आहेत. त्यांच्या या यशामुळे कळंब तालुका धाराशिव जिल्हा व तसेच लातूर जिल्ह्यातील त्यांचा मित्रपरिवार यांच्याकडून त्यांच्यावर अभिनंदन वर्षाव होत आहे येत्या काही दिवसात त्यांची पदस्थापना होऊन त्यांच्या शैक्षणिक कामकाजाला व्यापकता येईल अशी अपेक्षा होत आहे.

## प्रत्येक मतदान केंद्रावर एक कंट्रोल युनिट

**तभा वृत्तसेवा**

**जळकोट, दि. ०६ फेब्रुवारी :** जळकोट तालुक्यातील ३ जिल्हा परिषद गट तसेच ६ पंचायत समिती गणांसाठी दि ७ फेब्रुवारी रोजी मतदान होणार आहे. यासाठी आता प्रशासनाकडून तयारी पूर्ण झालेली आहे. जळकोट तालुक्यात ८४ मतदान केंद्र आहेत या ८४ मतदान केंद्रांवर ८४ मतदान युनिट लागणार आहेत. यासोबत प्रत्येक मतदान केंद्रावर एक कंट्रोल युनिटही असणार आहे.

जळकोट तालुक्यात होणाऱ्या निवडणुकीसाठी ईव्हीएम मशीनची प्रशासनाच्या वतीने तपासणी करण्यात आली. यानंतर प्रत्येक मतदान केंद्रासाठी लागणारे ईव्हीएम मशीन शील करून ते सुरक्षेमध्ये जळकोट येथील प्रशासकीय इमारतीमध्ये ठेवण्यात आले आहे मतदानाच्या आदल्या दिवशी या ईव्हीएम मशीन संबंधित गावातील मतदान केंद्रावर पोहोचवण्यात येणार आहेत.

जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी मतदान करत असताना मतदान केंद्रावर एक बॅलेट युनिट म्हणजेच मतदान युनिट असणार आहे. यासोबतच एक कंट्रोल युनिटही असणार आहे. उमेदवारांची संख्या अधिक झाल्यास कधी कधी दोन मतदान युनिट लागत असतात परंतु जळकोट तालुक्यामध्ये गट आणि गणामध्ये उमेदवारांची संख्या मतदान युनिटवर बसेल एवढी झाल्यामुळे प्रत्येक मतदान केंद्रावर एकच मतदान युनिट लागत आहे. एका मतदान युनिटवर १५ उमेदवारांची नावे बसू शकतात.

या मतदान युनिटवर उमेदवाराचे नाव, उमेदवाराचे पक्ष चिन्ह, उमेदवाराचा फोटो या प्रमुख बाबी असतात. ८४ जळकोट तालुक्यात मतदान केंद्र आहेत या ८४ मतदान केंद्रावर ३६० कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे यासोबतच ६० कर्मचारी हे राखीव ठेवण्यात आलेले आहेत. तसेच तहसील कार्यालयामध्ये निवडणूक कामकाजासाठी १५० तैनात आहेत. जळकोट तालुक्यातील निवडणूक कामासाठी ५४६ कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत.

## आरआयटीची मॅथेमॅटिक्स ट्रेनिंग यशस्वी केल्याबद्दल विद्यार्थिनींचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर, दि. ०६ फेब्रुवारी :** मॅथेमॅटिक्स टॅलेंट ट्रेनिंग सर्च (MTTS) हैदराबाद, तेलंगणा व कर्नाटक राज्यातील धारवाड येथील आय.आय. टी. आयोजित धारवाड येथे नुकत्याच पार पडलेल्या INITI-TION INTO M-THEM-TICS ही मॅथेमॅटिक्स ट्रेनिंग या ट्रेनिंगसाठी येथील महात्मा गांधी महाविद्यालयातील बी. एस्सी. द्वितीय वर्षामध्ये शिकत असलेल्या कुमारी श्रद्धा शिवाजी कदम व कुमारी नम्रता सचिन भांडे या विद्यार्थिनींची निवड झालेली होती. या दोन्ही विद्यार्थिनींनी सदरील ट्रेनिंगमध्ये सक्रिय सहभाग नोंदवून यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल महाविद्यालयात त्यांचा सत्कार करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष अँड किशनराव बेंडकुळे, सचिव अँड पी. डी. कदम आणि विचार विकास मंडळाचे सर्व पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. पी. पवार, गणित विभाग प्रमुख प्रा. बी. यु. मंगरूळकर, प्रा. कदम आकांक्षा, स्टाफ सेक्रेटरी डॉ. ए. पी कांबळे, डॉ. यादव सूर्यवंशी इतर शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व महाविद्यालय परिवाराने विद्यार्थिनींचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या.



# २७०० रुपयांचा पहिला हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा

## नीळकंठेश्वर सहकारी साखर कारखान्याकडून ऊसउत्पादक शेतकऱ्यांना दिलासा

**तभा वृत्तसेवा**


**औसा, दि. ०६ फेब्रुवारी :** किल्लारी येथील निळकंठेश्वर सहकारी साखर कारखान्याने दि. २२ नोव्हेंबर २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत गाळप करण्यात आलेल्या ऊसाचे प्रति टन २७०० रुपयांचा पहिला हप्ता ऊस उत्पादकांच्या खात्यावर जमा करण्यात आला आहे. या पहिल्या टप्प्यात एकूण २४ कोटी ३५ लाख रुपये थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर सोमवारी वर्ग करण्यात आले आहेत. अंतिम दर जिल्ह्यातील इतर कारखान्याइतकाच देणार असल्याचेही यावेळी आमदार अभिमन्यू पवार यांनी स्पष्ट केले आहे.



गेल्या अनेक वर्षांपासून बंद असलेला निळकंठेश्वर सहकारी साखर कारखाना सुरू करण्यासाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागला. आर्थिक अडथळे, यांत्रिक अडचणी तसेच प्रशासकीय अडचणींवर मात करीत अखेर हा कारखाना कार्यान्वित करण्यात यश आले आहे.

हा कारखाना सुरू झाल्याने परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना हक्काचा सहकारी साखर कारखाना उपलब्ध झाला असून, ऊस गाळप व बिल देयकाबाबत निर्माण होणाऱ्या अडचणी दूर झाल्या आहेत. आतापर्यंत या कारखान्यातून सुमारे दोन लाख मॅट्रिक टन उसाचे गाळप पूर्ण झाले आहे. निळकंठेश्वर सहकारी साखर कारखान्याचे पूर्ण नूतनीकरण करण्यात आले असून क्षमतावाढही करण्यात आली आहे.

अद्ययावत यंत्रसामग्री, सुधारित तांत्रिक व्यवस्था आणि कार्यक्षम व्यवस्थापनामुळे कारखाना यशस्वीपणे सुरू आहे. या पुनरुज्जीवनामुळे किल्लारी व परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. हा साखर कारखाना सुरू करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारने मोठे सहकार्य केले. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच दिवंगत माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आमदार अभिमन्यू पवार यांना मोलाचे सहकार्य केले. केंद्र व राज्य सरकारच्या आर्थिक सहाय्यातून किल्लारी कारखान्याचे पुनर्जीवन शक्य झाले आहे.



नॅचरल शुगरचे बी. बी. ठोंबरे यांचे कारखान्याच्या तांत्रिक व व्यवस्थापकीय कामकाजासाठी वेळोवेळी मार्गदर्शन लाभले आहे. त्यांच्या मार्गदर्शनामुळे कारखान्याचे नियोजन व गाळप प्रक्रिया अधिक प्रभावीपणे राबवली जात आहे. एकंदरीत निळकंठेश्वर सहकारी साखर कारखाना पुन्हा सुरू झाल्याने किल्लारी व परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य मिळाले असून, आगामी काळात कारखान्याच्या कार्यक्षमतेत आणखी वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# गो-तस्करीचा पर्दाफाश; रामतीर्थ पोलीसांची कारवाई

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. ६ फेब्रूवारी-**

रामतीर्थ पोलीस ठाणे हद्दीत गो-तस्करीचा गंभीर प्रकार उघडकीस आला असून, पोलिसांनी तत्पर आणि धाडसी कारवाई करत तिघा गो-तस्करांना अटक केली आहे. या कारवाईमुळे परिसरात समाधान व्यक्त होत असून रामतीर्थ पोलिसांच्या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

दिनांक २५ जानेवारी २०२६ रोजी पहाटे सुमारे ५.२२ वाजता नरसी ते बिलोली मार्गावर मध्यवर्ती बँकेसमोर असलेल्या राज्य महामार्गाच्या दुभाजकावर एक गाय रवंथ करत उभी असल्याचे आढळून आले. मात्र तिचे वासरू जवळ नसल्याने संशय बळावला. चौकशीत अज्ञात चोरट्यांनी वासराला जबरदस्तीने कारमध्ये कोंबून



पळवून नेल्याचे निष्पन्न झाले. वासरापासून दूर झाल्याने गाईची अवस्था अत्यंत हळहळजनक होती.

याबाबत माहिती मिळताच रामतीर्थ पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विक्रम हराळे यांनी तात्काळ तपासाची चक्रे फिरवली. मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे रामतीर्थ पोलीस व स्थानिक गुन्हे शाखेच्या संयुक्त पथकाने जलद हालचाली करत आरोपींचा शोध घेतला.

या प्रकरणी रामतीर्थ पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक १०/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२), ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गो-तस्करी व चोरी करणारे आरोपी मोहम्मद अजीम मोहम्मद सिराज (रा. नांदेड), शेख आश्रम पिता शकील (रा. मनोर, ता. मनोर, जि. पालघर) आणि आयुब खान (रा. मुंब्रा, जि. ठाणे) यांना अटक करण्यात आली आहे. तसेच गुन्ह्यात वापरण्यात आलेली दणत कार पोलिसांनी जप्त केली आहे.

पोलीस अधीक्षक अबीनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेल्या या यशस्वी कारवाईमुळे गो-तस्करी विरोधात पोलिसांचा कडक इशारा मिळाला असून सध्या सर्व आरोपी पोलीस कोठडीत आहेत. पुढील तपास सुरू आहे.

# एफएमजीई पात्रता परीक्षेत वैष्णवीचे घवघवीत यश

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. ६ फेब्रूवारी-**

एनबीईएमएसद्वारे घेण्यात आलेल्या फॉरेन मेडिकल ग्रॅज्युएट एक्झामिनेशन-एफएमजीई डिसेंबर २०२५ परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, किर्गिजस्तान येथे एमबीबीएसचे वैद्यकीय शिक्षण पूर्ण केलेल्या माहूर तालुक्यातील आष्टा येथील कु. वैष्णवी गजाननराव सोनटक्के हिने ह्या परीक्षेत ३०० पैकी १९८ गुण मिळवत घवघवीत यश संपादन केले आहे.या यशामुळे तिचे डॉक्टर होण्याचे स्वप्न पूर्ण झाले असून माहूर तालुक्याच्या वैद्यकीय क्षेत्राच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. वैष्णवी ही पत्रकार संजय सोनटक्के यांची पुतणी आहे.

एफएमजीई (फॉरेन मेडिकल ग्रॅज्युएट एक्झामिनेशन) ही भारत सरकारच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या अंतर्गत एक स्वायत्त संस्था असलेल्या व भारतात पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण आणि परीक्षांचे उच्च व एकसमान मानकीकरण करण्याचे काम करणाऱ्या नॅशनल बोर्ड ऑफ एक्झामिनेशन्स इन मेडिकल सायन्सेस अर्थात 'राष्ट्रीय वैद्यकीय विज्ञान परीक्षा मंडळ' (एनबीईएमएस) द्वारे परदेशातून एमबीबीएस पूर्ण करणाऱ्या भारतीय नागरिक किंवा ओसीआय कार्डधारकांसाठी आयोजित केली जाणारी अनिवार्य पात्रता परीक्षा आहे. ही पात्रता परीक्षा वर्षातून (जून आणि डिसेंबर) संगणक पद्धतीने घेतली जाते.

किर्गिजस्तानमधून एमबीबीएस पूर्ण करणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांसाठी एफएमजीई उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे. ३०० पैकी १५० गुण (५०%) मिळवून ही पात्रता परीक्षा उत्तीर्ण करणे, भारतात वैद्यकीय व्यवसाय करण्यासाठी आवश्यक आहे. भारतीय नागरिक किंवा ओसीआय कार्डधारक ज्यांनी किर्गिजस्तान किंवा परदेशातून एमबीबीएस पदवी पूर्ण केली आहे हे या पात्रता परीक्षेसाठी पात्र ठरतात.

ही परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतरच भारतात डॉक्टर म्हणून प्रॅक्टिस करण्यासाठी परदेशी पदवीधरांना तात्पुरती किंवा कायमस्वरूपी नोंदणी (रजिस्ट्रेशन) मिळते. अशा या महत्त्वाच्या एफएमजीई पात्रता परीक्षेत माहूरच्या आष्टा या खेडेगावातील वैष्णवी हिने यशस्वी होत आष्टा सारख्या ग्रामीण भागातून प्रथम महिला डॉक्टर होण्याचा बहुमान मिळवत वैद्यकीय क्षेत्रात इतिहास घडविला आहे.

वैष्णवी हिचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तोळा तांडा आष्टा, त्यानंतर दहावीपर्यंत विद्यालयीन शिक्षण हे साखळे विद्यालय, उमरखेड व कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षण हे श्री शंकरराव चव्हाण विद्यालय आष्टा येथे झाले झाले असून,एमबीबीएसचे वैद्यकीय शिक्षण हे विदेशामध्ये किर्गिजस्तान येथे सप्टेंबर २०२० ते मे २०२५ मध्ये यशस्वीपणे पूर्ण झाले आहे. अर्थात परदेशात राहून शिक्षण घेत असताना आर्थिक,

शैक्षणिक व वैयक्तिक अशा अनंत अडचणींचा सामना तीला करावा लागला. अशाही विपरीत परिस्थितीवर मात करून हार न मानता आपले डॉक्टर होण्याचे ध्येय कायम ठेवत एफएमजीई सारख्या कठीण व स्पर्धात्मक परीक्षेमध्ये उत्तीर्ण होण्यासाठी तिने दिवस रात्र अभ्यास करून अथक परिश्रम घेऊन पहिल्याच प्रयत्नात ३०० पैकी १९८ गुण घेऊन नेत्रदीपक यश प्राप्त करत आपली व आपल्या आईबाबांसह संपूर्ण सोनटक्के परीवाराची स्वप्नपूर्ती केली आहे.

डॉ.कु.वैष्णवी हिने प्रचंड संघर्ष, जिद्द आणि चिकाटी आणि कठोर परिश्रमातून मिळविलेल्या या यशाबद्दल आष्टासह तालुक्याचे ज्येष्ठ राजकीय नेते नामदेवराव केशवे,बाबाराव केशवे,अनंत केशवे, प्राचार्य राजेंद्र केशवे, डॉ.निरंजन केशवे, वसंतराव पिंगळे,उमाजी कराळे,गोपीनाथ सुरोशे,नगरसेवक प्रा.विलास भंडारे,प्रा.सुजित केशवे, अशोक सोळंके, चेतन कराळे, किरण वंजारे,कोथळकर सर, पावडे सर,प्रा.अजय राठोड, प्रा.प्रशांत कदम,प्रा.तुषार तास्के,प्रा. कोषटवार मॅडम यासह अनेकांनी तीचे अभिनंदन करत पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. कितीही कठीण असले तरी वैष्णवी हिने केलेल्या मेहनतीच्या जोरावर यश खेचून आणता येते हे सिद्ध करून दाखविले आहे.हे उच्च शिक्षण घेणाऱ्या तमाम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे. माहूर सारख्या जेमतेम वैद्यकीय सेवा सुविधा उपलब्ध असलेल्या आदिवासी बहुल मागासलेल्या भागात एमबीबीएस डॉक्टरची नितांत गरज असून, डॉ. वैष्णवी सोनटक्के यांनी आता माहूर येथेच हॉस्पिटल उभारुन येथील गोरगरिब रुग्णांना आरोग्य सेवा सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

## दहावी-बारावी परिक्षा केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश

**नांदेड** - नांदेड जिल्ह्यातील सर्व बारावीच्या ११० तर दहावीच्या १७७ परीक्षा केंद्रापासून १०० मिटरच्या परिसरात १० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ रोजीपर्यंत सकाळी ९ ते रात्री ७ वाजेपर्यंतच्या कालावधीत परीक्षार्थी व परीक्षेच्या कामाशी संबंधीत असलेले अधिकारी व कर्मचारी या व्यक्तीरीक्त इतर कोणत्याही व्यक्तीस प्रवेश करता येणार नाही. याबाबतचा आदेश भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी प्राप्त अधिकाराचा वापर करुन निर्गमीत केला आहे. या आदेशानुसार परीक्षेच्या कामाशी संबंधीत असलेले अधिकारी व कर्मचारी याव्यतिरीक्त इतर कोणत्याही व्यक्तीस कॅलक्युलेटर, ट्रॅन्झीस्टर, रेडिओ, लॅपटॉप इत्यादी तत्सम साहित्य परीक्षा केंद्राच्या १०० मिटर पर्यंत परिसरात वापरण्यास व जवळ बाळगण्यास, तसेच परीक्षा केंद्रात नेण्यास, त्याचप्रमाणे वर दर्शविलेल्या कालावधीत परीक्षा केंद्राच्या परिसरातील १०० मिटर पर्यंतची सर्व सार्वजनिक टेलिफोन्स, एस.टी.डी., आय. एस.डी., भ्रमणध्वनी, फॅक्स, झेरॉक्स, पेजर आणि ध्वनीक्षेपक चालू ठेवण्यास याद्वारे प्रतिबंध करण्यात आले आहे. सर्व संबधीतांना नोटीस देवून त्यांचे म्हणणे ऐकुण घेणे सद्य परिस्थितीत शक्य नसल्याने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (२) नुसार एकतर्फी आदेश काढण्यात आला आहे.

## अतिवृष्टी व अवकाळी पावसाचे अनुदानसाठी १० रोजी विशेष कॅम्प: अभिजीत जगताप

**माहूर** -शासनाकडून अतिवृष्टी व अवकाळी पावसामुळे शेतीपिकांचे नुकसानीचे अनुदान ई पंचनामा पोर्टल मार्फत पात्र लाभार्थ्यांना वितरीत केले जाते. परंतु मागील दोन ते तीन वर्षाचे अनुदान काही लाभार्थ्यांना मिळाले नसल्याच्या तक्रारी कार्यालयास येत असल्याने दि.१०/०२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता तहसील कार्यालय, माहूर येथे विशेष कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे. सदर कॅम्पला माहूर तालुक्यातील मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी (पूर्वीचे पदनाम तलाठी) उपस्थित राहणार असुन अनुदानासंबंधीच्या तक्रारीचे निवारण करण्यात येणार असल्याने या कॅम्पला ज्या लाभार्थ्यांना सन २०२२ ते २०२५ पर्यंतचे अतिवृष्टी व अवकाळी पावसाचे अनुदान मिळाले नाही, त्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन अभिजीत जगताप तहसीलदार, माहूर यांनी केले आहे.

## शहराच्या आरोग्यासाठी शुद्ध पाणी हीच नगरपरिषदेची प्राथमिकता :शरद पवार

**लोहा-** मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली व लोकनियुक्त नगराध्यक्ष शरद पाटील पवार यांच्या नेतृत्वात शहरातील नागरिकांना स्वच्छ फिल्टर पाणी पुरवण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आसेल असे नगराध्यक्ष शरद पाटील पवार यांनी पाहाणी करता संकल्प केला. शहरातील नागरिकांना पाणीपुरवठा करणाऱ्या फिल्टर प्लांटची पाहणी करताना नगराध्यक्ष शरद पाटील पवार, उपनगराध्यक्ष करीम शेख, मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे, पाणीपुरवठा विभागाचे देशपांडे , गटनेता भास्कर पाटील पवार, नगरसेवक हरिभाऊ चव्हाण, केतन खिल्लारे, राजू बोडके, सदाशिव तेलंग सह नगरसेवक व अधिकारी यांची उपस्थिती होती.

## शेतजमीन विक्री करणाऱ्या शेतीविक्रेत्यांनी संपर्क करण्याचे आवाहन

**नांदेड** - अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील भूमिहीन, दारिद्ररेषेखालील शेतमजूर कुटूंबाना कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेअंतर्गत ४ एकर कोरडवाहू किंवा २ एकर बागायती शेतजमीन उपलब्ध करुन देण्याची योजना शासनाने सुरु केली आहे. या योजनेअंतर्गत शेतजमीन विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांना कोरडवाहू शेत जमीनीसाठी प्रति एकर ५ लाख रुपये मर्यादेच्या आत तसेच बागायती शेतजमीनीसाठी प्रति एकर ८ लाख रुपये मर्यादेच्या आत जिल्हास्तरीय समितीमार्फत वाटाघाटी करुन मोबदला अदा करण्यात येतो. जिल्ह्यात शेतजमीन विक्री करण्यास इच्छुक असणाऱ्या शेतकरी व व्यक्तीनी आवश्यक कागदपत्रांसह शेतजमीन विक्रीचे प्रस्ताव सादर करावेत. आवश्यक कागदपत्रे विहित नमुन्यातील अर्ज, सातबारा उतारा, नमुना आठ-अ, शंभर रुपयांच्या बाँड पेपरवर नोटरी सह विहित नमुन्यातील शपथपत्र, भूमि अभिलेख कार्यालयाचा पोटहिस्सा मोजणी अहवाल, तलाठी यांचे निर्विवाद प्रमाणपत्र, मुल्यांकन प्रमाणपत्र, बँकेचे बेबाकी प्रमाणपत्र, कुटुंबातील सदस्यांचे नाहरकत प्रमाणपत्र, मागील १३ वर्षाचे फेरफार संबंधी पुरावे (सर्च रिपोर्ट), इतर आवश्यक कागदपत्रासह प्रस्ताव तात्काळ सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, नांदेड येथे सादर करावेत. अर्जाचा नमुना, शपथपत्रांचे नमुने व अधिक माहितीसाठी समाज कल्याण कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगिरे यांनी केले आहे.

## ई-आर १ त्रैमासिक विवरणपत्र ऑनलाईन भरण्याचे आवाहन

**नांदेड** - जिल्ह्यातील सर्व शासकीय / निमशासकीय कार्यालयांनी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र नांदेड यांच्याकडे आपल्या आस्थापनेवरील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या माहितीबाबतचे माहे डिसेंबर २०२५ अखेरचे ई-आर- १ (एठ-१) त्रैमासिक विवरणपत्र जानेवारी/फेब्रुवारी २०२६ च्या मुदतीत या कार्यालयाचे संकेतस्थळ ु. ारहरीुरूरा.सीें.ळप वर भरावयाची मुदत आहे. डिसेंबर- २०२५ अखेरचे ईआर १ (एठ ९) त्रैमासिक विवरणपत्र भरल्याची प्रत माहे जानेवारी २०२६ च्या वेतन देयकसोबत जोडल्याशिवाय वेतन देयके स्विकारली जाणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी. जिल्ह्यातील शासकीय / निमशासकीय कार्यालयांना या कार्यालया मार्फत युजर आयडी व पासवर्ड यापूर्वीच कळविण्यात आलेले आहेत. तसेच सर्व कार्यालयांनी आपले ईमेल आयडी, फोन नंबर, पॅन नंबर, टॅन नंबर नोंदवून आपली प्रोफाईल अद्यावत करावी. या बाबत काही अडचणी आल्यास या कार्यालयाचे दुरध्वनी क्र. ०२४६२-२५१६७४ वर संपर्क करावे, असे आवाहन केले आहे.

# जिल्हास्तरीय तंत्र प्रदर्शनास प्रशिक्षणार्थ्यांचा उत्सफूर्त सहभाग

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ६ फेब्रूवारी-**

औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील प्रशिक्षणार्थ्यांच्या प्रशिक्षणाबरोबरच कौशल्यास वाव मिळावा, नवनवीन संकल्पना, नाविन्यता विकसीत व्हावी या उद्देशाने जिल्हास्तरीय तंत्रप्रदर्शनाचे श्री गुरू गोबिंदसिंघजी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था नांदेड येथे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. प्रदर्शनामध्ये संपूर्ण जिल्हयातील सर्व शासकीय व खाजगी औदयोगिक प्रशिक्षण संस्था मिळून जवळपास २४ संस्थानी सहभाग नोंदवला.

कार्यक्रमासाठी संस्था व्यवस्थापन समितीचे सदस्य हर्षदभाई शहा, संस्थेचे प्राचार्य तथा जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी सुर्यवंशी एस. व्ही., औ.प्र. संस्था अर्धापूरचे प्राचार्य तथा संस्थेचे उपप्राचार्य कंदलवाड व्ही. डी., प्राचार्य सर्वश्री त्रिचूरकर, फारूकी, गायकवाड, पिंडकुलवार, अन्नपुर्णे पी. के. तसेच जिल्हयातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील संस्थेतील शिल्प निदेशक तथा प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

प्रास्ताविकात प्राचार्य सचिन सुर्यवंशी यांनी तंत्रप्रदर्शनासारख्या संकल्पना राबवल्यामुळे प्रशिक्षणार्थ्यांच्या कौशल्यास वाव मिळतो. सध्याचे युग हे उद्योगाला चालना देणारे तसेच नविन उद्योग धोरण राबवणारे असल्यामुळे नवनविन उद्योजक निर्माण होऊ शकतात. संस्था व्यवस्थापन समितीचे सदस्य हर्षदभाई शहा यांनी आपले मनोगत व्यक्त करताना तंत्रप्रदर्शनामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो व आधूनिक बदलांशी जुळवून घेणेसाठी त्यांना उद्युक्त करता येते, असे नमूद केले.

तंत्रप्रदर्शनामध्ये प्रशिक्षणार्थ्यांनी दैनंदिन जीवनातील आवश्यक असणाऱ्या गोष्टींवर अतिशय नाविन्यपुर्ण संकल्पना आणि तांत्रीक कौशल्यावर आधारीत असे उपकरणे तयार केली. प्रदर्शनाचा लाभ नांदेडमधील विविध शाळांनी घेतला.

कार्यक्रमाचे आभार करताना संस्थेचे उपप्राचार्य व्ही. डी. कंदलवाड यांनी सहभागी प्रशिक्षणार्थ्यांना प्रोत्साहीत करून त्यांचे कौतूक केले.

# गटई कामगारांसाठी अनुदानावर पत्र्याचे स्टॉल योजनेची व्याप्ती

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ६ फेब्रूवारी-**

अनुसूचित जातीतील चर्मकार समाजातील (चर्मकार, ढोर, होलार, मोची इत्यादी) यांचे जीवनमान उंचावण्यासाठी आणि त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सन २०२५-२६ करीता सुधारित मागणी नोंदविण्याकरीता गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल देण्याच्या योजनेची व्याप्ती वाढवून निकषांमध्ये सुधारणा करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित केला आहे. ग्रामपंचायत नगरपालिका, महानगरपालिका क्षेत्रात सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरीता अर्ज मागविण्यात येत असून सदरचा ऑफलॉईन अर्ज सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण नांदेड या कार्यालयात उपलब्ध आहे.

अनुसूचित जातीतील चर्मकार समाजातील (चर्मकार, ढोर, होलार, मोची इत्यादी) इच्छुक लाभार्थ्यांनी सदरहू योजनेचा लाभ घेण्यासाठी खालील नियम व अटी शर्तीची पुर्तता करुन अर्जदारांनी विहित नमुन्यात आपला अर्ज परीपुर्ण भरुन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण नांदेड यांचे कार्यालयास सादर करण्यात यावा. राज्यातील गटई कामगारांना १०० टक्के अनुदान या तत्त्वावर पत्र्याचे स्टॉलवर कमाल ५ हजार रुपये इतके डीबीटीद्वारे अनुदान देण्यात येते ही अनुसूचित जातीतील चर्मकार समाजातील सुशिक्षीत बेरोजगारांसाठी सुवर्ण संधी आहे.

अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. अर्जदाराच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न हे ग्रामीण भागातील ८० हजार व शहरी भागातील १ लाखापेक्षा अधिक नसावे, अथवा अर्जदार दारीद्रय रेषेखालील असावा. अर्जदराचे वय १८ वर्षापेक्षा कमी नसावे. अर्जदार ज्या जागेत स्टॉल मागत असेल ती जागा ग्रामपंचायत, नगरपालिका, छावणी बोर्ड किंवा महानगरपालिका, यांनी त्यास भाड्याने, कराराने खरेदीने, अगर मोफत, परंतु अधिकृतरित्या ताब्यात दिलेली असावी. किंवा ती जागा त्यांच्या स्वमालकीची असावी. सदर योजनेची गटईस्टॉलसाठी जागा उपलब्ध करून घेण्याची जबाबदारी गटई कामगाराची राहील. एकदा गटई स्टॉलची वाटप झाल्यानंतर सदर स्टॉलची विक्री करता येणार नाही. तसेच ते भाडे तत्त्वावर देता येणार नाही. तसेच स्टॉलचे हस्तांतरण करता येणार नाही. याबाबत अनियमितता झाल्यास सदर स्टॉल परत घेण्यात येईल. ज्या कारणासाठी गटई स्टॉल देण्यात आलेला आहे. त्या शिवाय इतर कोणत्याही कारणांसाठी वापरता येणार नाही. असे निदर्शनास आल्यास स्टॉल रद्द करुन अनुदान वसुल करण्यात येईल. एकदा लाभार्थ्यांना स्टॉलचा लाभ दिल्यानंतर स्टॉलची देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी संबंधित लाभार्थ्यांची राहील. स्टॉलचा लाभ कुटुंबातील एकाच व्यक्तीस देता येईल.

अनुसूचित जातीतील चर्मकार समाजातील (चर्मकार, ढोर, होलार, मोची इत्यादी) घटकांतील सुशिक्षीत बेरोजगार, इच्छुक लाभार्थ्यांकडुन सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरीता अर्ज मागविण्यात येत असुन सदरचा ऑफलाईन अर्ज, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण नांदेड यांचे कार्यालयात उपलब्ध आहे. सुशिक्षीत बेरोजगार यांनी सुवर्ण संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगिरे यांनी केले आहे.

# पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी१, मुदखेड येथे गंभीर अनागोंदी

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. ६ फेब्रूवारी-**

पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी१, मुदखेड येथे अधिकारी व कर्मचारी असतानाही दवाखान्यात वेळेवर कर्मचारी व अधिकारी उपस्थिती नसल्याने नागरिक व पशुपालकांची मोठी गैरसोय होत आहे. कार्यालयीन वेळेत दवाखाना बंद असल्याचे चित्र असून जनावरांच्या उपचारांसाठी आलेल्या शेतकऱ्यांना ताटकळत वाट पाहत बसावे लागत आहे.

या दवाखान्यात डॉ. जगताप (मायादम सहायक आयुक्त), डॉ. प्राजक्ता पेंडकर (विस्तार अधिकारी), डॉ. खान (विस्तार अधिकारी)नरवाडे (मायादम पशुधन प्रवेशक) व पिराजी हाटकर (परिचर) असे कर्मचारी कार्यरत असतानाही स्वच्छतेचा अभाव आहे. नेहमी गैरहजर राहून मनमाणी कर्तव्य बजावत आहेत. दवाखान्यातील परिसरात अस्वच्छता असून जनावरांना पिण्यासाठी पाण्याची कोणतीही व्यवस्था केलेली नाही.

गंभीर बाब म्हणजे जनावरांच्या गर्भधारणेसाठी आवश्यक सेवा दवाखान्यात उपलब्ध नसून बीए३ कंठर बाहेर खासगी डॉक्टरांकडे ठेवले जाते. त्यामुळे पशुपालकांना आधी त्या डॉक्टरांच्या घरी जाऊन त्यांना बोलावून दवाखान्यात आणावे लागते, असा आरोप नागरिकांनी केला आहे.

या सर्व प्रकाराकडे संबंधित अधिकारी ऊऊ साहेबांनी त्या अधिकाऱ्याकडे दुर्लक्ष करीत आहेत दुर्लक्ष होत असल्याचा आरोप होत असून तातडीने दखल घेऊन दवाखान्यात नियमित सेवा, स्वच्छता, पाणीपुरवठा व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी पशुपालकांनी केली आहे.

# यंदाचे माता रमाई गणगोत पुरस्कार जाहीर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ६ फेब्रूवारी-**

जिल्ह्यातील दक्षिण अंतर्गत माता रमाई विचार मंच, जवळा व माता रमाई जयंती मंडळ, जवळा यांच्या वतीने दिले जाणारे यंदाचे माता रमाई गणगोत पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. यामध्ये पूज्य भंते बौद्धीधम्मो यांची आई आयु. सरस्वतीबाई लक्ष्मणराव पोवळे (वसरणी, नांदेड), ख्यातनाम पत्रकार राजेश्वर कांबळे यांची आई आयु.निर्मलाबाई त्र्यंबक कांबळे (कंधार), आयु.सुनिता नागोराव डोंगरे (उमरी), सुकांता शंकरराव वाघरे, समता सैनिक आयु.दैवशाला गणेश मस्के (माळाकोळी), आयु.लक्ष्मीबाई किशन जमराज (पिंपरण), आयु. जिजाबाई विठ्ठल गोडबोले (बळीरामपूर, नांदेड) मातांचा समावेश आहे.

दरवर्षी त्यागमूर्ती माता रमाई यांच्या जयंती निमित्ताने ७ फेब्रुवारी या दिवसाचं औचित्य साधून ७ मातांचा सन्मान गौरव जवळा ता.लोहा येथील माता रमाई विचारमंच व रमाई जयंती मंडळाच्या वतीने करण्यात येत असतो. कारण त्यागमूर्ती माता रमाईने आपल्या संसारामध्ये अतिशय त्यागमय जीवन जगून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना आयुष्यभर साथ दिली. त्याचे प्रतीक म्हणून, त्याग करून मुलं घडविलेल्या मातांना निवड समितीच्या वतीने प्राधान्य देण्यात येत असते. त्यामध्ये भंतेजीची माता, पत्रकारांची माता, सैनिक माता, मुलं घडविलेल्या माता, अशा विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान मातांचा सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, मेडल, शाल, पुष्पहार देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात येत असतो.

अतिशय आगळावेगळा हा सन्मान सोहळा जवळा (दे) ता.लोहा येथील त्यागमूर्ती माता रमाई जयंती निमित्त दि.७ फेब्रुवारी २०२६ रोजी विश्वशांती बुद्ध विहार, जवळा या ठिकाणी अतिशय थाटामध्ये पार पडणार आहे. अशी माहिती रमाई विचार मंचाचे आयु.आनंद पुरभाजी गोडबोले (भारतीय बौद्ध महासभा जिल्हा संरक्षण सचिव, नांदेड तथा आकाशवाणी प्रासंगिक निवेदक नांदेड व जयंती मंडळाच्या अध्यक्षा आयु. भारतबाई विठ्ठल निखाते यांनी दिली.

# गोदावरी कॉलेज ऑफ बँकिंगमध्ये जेनियाकच्या सोबतीने उद्योजकता कार्यक्रम उत्साहात

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ६ फेब्रूवारी-**

विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता, नवकल्पना व आर्थिक साक्षरता विकसित करण्याच्या उद्देशाने गोदावरी कॉलेज ऑफ कॉमर्स, सायन्स अँड टेक्नॉलॉजी, नांदेड यांच्या वतीने ऋएछखउ गोदावरी एंटरप्रेनर्स इन्क्युबेशन अ‍ॅण्ड अ‍ॅक्सेलरेटर कौन्सिल अंतर्गत 'ऋएछ-छएद (ऋळपरपलश, ेाशीलश, खर्पींशपींळेपी)' हा प्रेरणादायी कार्यक्रम सोमवारी सहकारसूर्य मुख्यालय, गोदावरी अर्बन, तरोडा नाका येथे उत्साहात संपन्न झाला. यावेळी कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून नामदार हेमंत पाटील यांनी मार्गदर्शन केले. मराठवाडा अर्थकारणात मागे असून विद्यार्थ्यांना जागतिक पातळीवरील वित्तीय संधी, आर्थिक व्यवहारांची माहिती मिळावी, या हेतूने अशा उपक्रमांची नितांत गरज असून विद्यार्थ्यांनी या ज्ञानाचा भविष्यात निश्चित उपयोग करावा, असे आवाहन त्यांनी केले.

गोदावरी कॉलेज ऑफ बँकिंगच्या संस्थापक राजश्री पाटील यांनी नोकरी मागणारे हात नव्हे, तर नोकरी देणारे हात घडवायचे आहेत. विद्यार्थ्यांमध्ये उद्योजक वृत्ती विकसित झाली पाहिजे, असे स्पष्ट मत व्यक्त केले. कमी वयातच NSE, BSE, NSDL Am{U RBI यांसारख्या नामवंत वित्तीय संस्थांना भेट देण्याची संधी विद्यार्थ्यांना या महाविद्यालयामुळे मिळाल्याचेही त्यांनी नमूद केले. प्रतिष्ठित व्यापारी राजेंद्र हुरणे यांनी ग्राहकांना गुणवत्ता, नाविन्य, उत्तम सेवा व योग्य दर दिल्यास यश हमखास मिळते. पुढील पिढीने नोकरीऐवजी व्यवसायाकडे वळावे, प्रगतीला मर्यादा नाही, असे सांगितले.

शेतकरी नेते गुणवंत पाटील हंगरगेकर यांनी अनुभव हाच खरा गुरु आहे. गुणवत्ता वाढवली तर प्रगती आपोआप होते. आपल्या भागातील गरज ओळखून व्यवसाय केल्यास यशस्वी उद्योजक होता येते, असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी एकूण १० नाविन्यपूर्ण व्यवसाय मॉडेल्स सादर केले. यामध्ये प्युअरपाथ वेलनेस, ब्रू क्रू स्मार्ट कॅफे, गोदावरी फार्मिंग (व्हर्टिकल फार्मिंग), मेल्ट इन मिल्क डेअरी, झिरोकोल बायोफ्युएल प्लांट, रॉयल ३ऊ कस्टमाइझ्ड मेमरीज, वॉटरवेज, ग्रीन हायड्रोजन प्रोजेक्ट, ग्रीन इंडिया ट्रॅव्हल, शॉपईज ई-कॉमर्स या प्रकल्पांचा समावेश होता. मान्यवर परीक्षकांनी उत्कृष्ट सादरीकरणाच्या आधारे ग्रीन हायड्रोजन प्रोजेक्टला प्रथम, ग्रीन इंडिया ट्रॅव्हलला द्वितीय, तृतीय क्रमांक विभागून व्हर्टिकल फार्मिंगला आणि प्युअरपाथ वेलनेसला जाहीर केला.

या कार्यक्रमास नामदार हेमंत पाटील, राजश्री पाटील, गुणवंत पाटील हंगरगेकर, राजेंद्र हुरणे, गोदावरी अर्बनचे सचिव अ‍ॅड. रविंद्र रगटे, सीडस अँड पेस्टिसाईडस जिल्हा संघटनेचे अध्यक्ष सदाशिव पुंड, जिन्याकचे मुख्य कार्यकारी अधिकारी मयूर कोकाटे, गोदावरी कॉलेज ऑफ बँकिंगचे प्रा.नेहा कुर्तडीकर, प्रा.उदयपालसिंह लिखारी, प्रा.प्रताप पाटील, प्रशासकीय अधिकारी वैष्णवी प्रसाद पाटील यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. विद्यार्थ्यांची शंभर टक्के उपस्थिती लाभलेला हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी उद्योजकतेची नवी दिशा देणारा ठरला.

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## तेरणा कनिष्ठ महाविद्यालयात बारावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ फेब्रुवारी -**
तेरणा कनिष्ठ महाविद्यालयात बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभ उत्साहपूर्ण व भावनिक वातावरणात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व प्रतिमापूजनाने झाली. प्रमुख पाहुणे प्रा.व्ही. आर. साळुंके यांनी विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, सातत्य व कष्टाच्या जोरावर जीवनातील आव्हानांना सामोरे जाण्याचा सल्ला दिला. अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ. डी. बी. मोरे यांनी भूषविले.

त्यांनी विद्यार्थ्यांनी ध्येयाशी प्रामाणिक राहून समाजोपयोगी नागरिक व्हावे, असे मार्गदर्शन केले.

विद्यार्थी मनोगतातून विद्यार्थ्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा. शिंदे छाया यांनी केले, सूत्रसंचलन प्रा. कापसे तेजस्विनी यांनी केले, तर आभार प्रा. कोकाटे सर यांनी मानले.

कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.



## क्राईम न्युज...

### सारोळा येथे घरफोडी; अडीच लाखांचा मुद्देमाल लंपास

**धाराशिव, दि.६ फेब्रुवारी -**
धाराशिव ग्रामीण पोलिस ठाणे हद्दीत घरफोडीची घटना घडली आहे. याप्रकरणी सुजीत हाणुमंत गाटे (वय ३२, रा. सारोळा बु., जि. धाराशिव) यांनी फिर्याद दिली आहे. अज्ञात व्यक्तीने दि.४ फेब्रुवारी रोजी रात्री १ ते ३.३० वाजण्याच्या सुमारास फिर्यादी व साक्षीदार यांच्या राहत्या घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला. घरातून ४८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, चांदीचे दागिने, मोबाईल फोन व रोख रक्कम असा एकूण २ लाख ४४ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल चोरून नेण्यात आला आहे. या प्रकरणी फिर्यादी सुजीत गाटे यांनी दिलेल्या प्रथम खबर अहवालावरून धाराशिव ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून, पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे.



### कळंब पोलीस ठाणे हद्दीत लोखंडी पोल चोरी ५८ हजारांचे साहित्य लंपास

**धाराशिव, दि.६ फेब्रुवारी -**
कळंब पोलीस ठाणे हद्दीत चोरीची घटना घडली आहे. याप्रकरणी संतोष अनंतराव चौधरी (वय ४५, रा. आथर्डी, ता. कळंब) यांनी फिर्याद दिली आहे. दि.३१ जानेवारी रोजी सायंकाळी ६ ते १ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजण्याच्या दरम्यान, डिकसळ शिवारातील सुजीत भारत बोरोडे यांच्या हॉटेलसमोर मोकळ्या जागेत ठेवलेले ९ मीटर लांबीचे ५ लोखंडी पोल अज्ञात व्यक्तीने चोरून नेले. या चोरीत अंदाजे ५८ हजार रुपये किमतीचे साहित्य लंपास करण्यात आले आहे. याप्रकरणी फिर्यादी संतोष चौधरी यांनी ४ फेब्रुवारी रोजी दिलेल्या तक्रारीवरून कळंब पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.



### परंड्यात दुचाकीची लंपास

**धाराशिव, दि.६ फेब्रुवारी -**
परंडा पोलीस ठाणे हद्दीत दुचाकी चोरीची घटना घडली आहे. याप्रकरणी सुभाष तुकाराम भालके (वय ५५, रा. गाडेगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. दि.३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७.३० ते ८ वाजण्याच्या सुमारास आसु येथील महालिंगराया मंदिरासमोरून त्यांची एच.एफ. डिलक्स मोटारसायकल (क्र. एमएच १३ सीएच ९९२०) अज्ञात व्यक्तीने चोरून नेली. या दुचाकीची किंमत अंदाजे १० हजार रुपये असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी फिर्यादीने दिलेल्या प्रथम खबर अहवालावरून परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.



### धाकटेवाडी शिवारात हाणामारी; चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

**धाराशिव, दि.६ फेब्रुवारी -**
उमरगा पोलीस ठाणे हद्दीत जुन्या वादातून एका व्यक्तीस मारहाण करून जखमी केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी अंगद नरसप्पा सास्तुरे (वय ३५, रा. धाकटेवाडी, ता. उमरगा, जि. धाराशिव) यांनी फिर्याद दिली आहे. दि.३० जानेवारी रोजी सायंकाळी ४.३० वाजण्याच्या सुमारास धाकटेवाडी शिवारातील आर.टी.ओ. चेकपोस्टजवळ प्रविण चव्हाण यांच्या चहाच्या हॉटेलवर पांडुरंग मकाजी बोकले (वय ४०), गोविंद व्यंकट बोकले (वय ३५), शामराव व्यंकट बोकले (वय ४२) व प्रमोद हणमंत बोकले (वय २४, सर्व रा. धाकटेवाडी) यांनी मागील भांडणाच्या कारणावरून फिर्यादीस शिवीगाळ केली. त्यानंतर आरोपींनी लाथाबुक्क्यांनी तसेच लोखंडी रॉड, लोखंडी पाईप व लाकडी काठ्यांनी मारहाण करून गंभीर जखमी केले व जीवे ठार मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी उमरगा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.



### शिष्यवृत्ती अर्ज १४ फेब्रुवारीपर्यंत निकाली काढण्याचे आदेश

**धाराशिव, दि.६ फेब्रुवारी -**
इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत VJNT, OBC व SBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी विविध शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत असून, सन २०२५-२६ साठी विद्यार्थ्यांनी महा डीबीटी पोर्टलवर १४ फेब्रुवारी २०२६ पर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

# प्रशासन सज्ज : आज मतदान; मतदारांचा कौल कुणाला?




**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ फेब्रुवारी -**
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांनी जाहीर केलेल्या सुधारित निवडणूक कार्यक्रमानुसार आज शनिवारी (दि. ७) धाराशिव जिल्हा परिषद तसेच त्याअंतर्गत असलेल्या आठ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदान होत आहे. या निवडणुकीसाठी जिल्हा प्रशासन, निवडणूक यंत्रणा तसेच पोलीस प्रशासन पूर्णतः सज्ज झाले असून, मतदान प्रक्रिया शांततापूर्ण, निर्भय व पारदर्शक वातावरणात पार पडावी यासाठी सर्व आवश्यक तयारी पूर्ण करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभारासाठी ही निवडणूक अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या माध्यमातून विकासकामांचे नियोजन, अंमलबजावणी तसेच ग्रामीण भागातील प्रशासनाचा कणा ठरतो. त्यामुळे या निवडणुकीकडे सर्वसामान्य नागरिकांसह राजकीय पक्षांचे लक्ष लागून आहे.

जिल्ह्यात एकूण १,३०८ मतदान केंद्रांवर आज प्रत्यक्ष मतदान होत असून, सकाळपासूनच मतदारांमध्ये मतदानाबाबत उत्साह दिसून येत आहे. मतदान केंद्रांवर आवश्यक त्या सुविधा, सुरक्षा व्यवस्था तसेच निवडणूक कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मतदान प्रक्रियेत कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी संवेदनशील व अतिसंवेदनशील मतदान केंद्रांवर विशेष पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.




निवडणूक प्रक्रियेत शिस्त व गोपनीयता राखण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. मतदानाच्या दिवशी उमेदवार, उमेदवारांचे प्रतिनिधी तसेच मतदारांना मोबाईल फोन घेऊन मतदान केंद्रात प्रवेश करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. मतदान प्रक्रियेवर कोणताही अनुचित प्रभाव पडू नये तसेच मतदारांच्या मतदानाचा गोपनीय हक्क अबाधित राहावा, या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे.

प्रशासनाकडून नागरिकांना स्पष्ट आवाहन करण्यात आले आहे की, मतदानासाठी येताना मोबाईल फोन सोबत आणू नयेत. मतदान केंद्रात प्रवेश करताना मोबाईल फोन आढळून आल्यास संबंधित व्यक्तीस मतदान केंद्रात प्रवेश नाकारला जाईल. त्यामुळे मतदारांनी नियमांचे पालन करूनच मतदानासाठी उपस्थित राहावे, असे सांगण्यात आले आहे.

जिल्हा प्रशासन व निवडणूक यंत्रणेमार्फत सर्व मतदारांनी निर्भयपणे, शांततेत आणि लोकशाही मूल्यांचा सन्मान राखत मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन करण्यात आले आहे. जिल्हा परिषद व पंचायत समितीची निवडणूक हा लोकशाही प्रक्रियेतील अत्यंत महत्त्वाचा टप्पा असून, जास्तीत जास्त नागरिकांनी मतदानात सक्रिय सहभाग नोंदवावा, असेही प्रशासनाने नमूद केले आहे.

आजच्या मतदानानंतर मतपेटीत बंद झालेला हा कौल आगामी काळात जिल्ह्यातील ग्रामीण विकासाची दिशा ठरवणार असल्याने, सर्वांचे लक्ष निकालाकडे लागून राहिले आहे.

## उमरगा तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी आज मतदान

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.६ फेब्रुवारी -**
उमरगा तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी आज ९ जिल्हा परिषद गट व १८ पंचायत समिती गणांमध्ये मतदान प्रक्रिया पार पडत आहे. ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासाशी थेट निगडित असलेल्या या निवडणुकीत सर्व प्रमुख राजकीय पक्षांचे अधिकृत उमेदवार तसेच अपक्ष उमेदवार रिंगणात असून, आज उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद होणार आहे.




तालुक्यातील अनेक गट व गणांमध्ये थेट लढतींसह त्रिकोणी व चतुष्कोणी सामने पाहायला मिळत असल्याने निवडणूक चुरशीची ठरण्याची चिन्हे आहेत. जिल्हा परिषद व पंचायत समिती या ग्रामीण भागातील रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण, रोजगार व विविध विकासकामांची दिशा ठरवणाऱ्या महत्त्वाच्या संस्था असल्याने या निवडणुकीकडे नागरिकांचे विशेष लक्ष लागले आहे.

या निवडणुकीत कोणत्याही एका आघाडीला स्पष्ट वर्चस्व मिळणार की निकाल तंग राहणार, याबाबत विविध अंदाज व्यक्त केले जात आहेत. स्थानिक पातळीवर प्रभाव असलेले अपक्ष उमेदवार निकालात निर्णायक भूमिका बजावू शकतात, असेही चित्र आहे.

आज पार पडणाऱ्या मतदानानंतर दि.९ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होणार असून, त्याच दिवशी जिल्हा परिषद व पंचायत समितीतील सत्तेचे गणित स्पष्ट होणार आहे. कोण बाजी मारणार आणि कोणत्या गटात उलटफेर होणार, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष केंद्रित झाले आहे.

निवडणूक प्रक्रिया शांततेत व पारदर्शकपणे पार पडावी यासाठी प्रशासनाने कडेकोट बंदोबस्त ठेवला असून, संवेदनशील मतदान केंद्रांवर विशेष सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे. मतदारांनी निर्भयपणे मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

एकूणच, उमरगा तालुक्यातील आजचे मतदान हे ग्रामीण विकासाची पुढील दिशा ठरवणारे ठरणार असून, ९ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या मतमोजणीनंतरच या निवडणुकीचा खरा कौल स्पष्ट होणार आहे.

## गडदेवदरी येथे तेरणा महाविद्यालयाच्या एनएसएसचे विशेष युवक शिबीर उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ फेब्रुवारी -**
येथील तेरणा महाविद्यालय, धाराशिव यांच्या राष्ट्रीय सेवा योजना (छडड) विभागाच्या वतीने पाणलोट व्यवस्थापन व पडीक जमिनीच्या शाश्वत विकासासाठी विशेष युवक शिबीर मौजे गडदेवदरी, तालुका व जिल्हा धाराशिव येथे दि.३१ जानेवारी ते ६ फेब्रुवारी या कालावधीत उत्साहपूर्ण वातावरणात आयोजित करण्यात आले आहे.

या विशेष युवक शिबिराचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.डी.बी. मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. शिबिरादरम्यान राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांकडून विविध सामाजिक, पर्यावरणीय तसेच जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येत असून ग्रामविकासासाठी मोलाचे योगदान दिले जात आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. सुशीलकुमार सरवदे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. तुळशीराम उकिरडे यांनी केले. मनीषा जांगीड यांनी सूत्रसंचालन केले तर गायत्री जांगीड यांनी आभार प्रदर्शन केले. या कार्यक्रमास राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांसह ग्रामस्थ उपस्थित होते.

## राज्यस्तरीय युनिफाईट स्पर्धेत उमरगा जि.प. हायस्कूलचे घवघवीत यश



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ फेब्रुवारी -**
क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय शालेय युनिफाईट स्पर्धा नुकतीच पनवेल (मुंबई) येथे पार पडली. या स्पर्धेत उमरगा जिल्हा परिषद हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करत लातूर विभागाचे नाव उज्वल केले.

या स्पर्धेत शाळेतील इस्माईल नदाफ याने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत सुवर्णपदक पटकावले. तसेच अफसाना नदाफ व ईश्वरी माने या विद्यार्थिनींनी रौप्यपदकाची कमाई केली. तर अस्मिता भोसले, गीता गायकवाड, सृष्टी सूर्यवंशी, अश्विनी जाधव, श्रेयशी शिंदे, शिवदर्शन शिंदे व स्नेहल कांबळे या विद्यार्थ्यांनी कांस्यपदक मिळवून शाळेच्या यशात भर घातली.

लातूर विभागाचे प्रतिनिधित्व करत असताना विद्यार्थ्यांनी हे उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या यशासाठी विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक महंमद रफी शेख यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच धनराज तेलंग व फजल शेख यांचे सहकार्य लाभले.

## प्रियदर्शनी शाळेत 'खरी कमाई महोत्सव' व आनंद बाजार संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ फेब्रुवारी -**
प्रियदर्शनी मराठी प्राथमिक शाळा, धाराशिव व सत्यभामा शिंदे विद्यालय, धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने खरी कमाई महोत्सव व आनंद बाजार मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी शाळेच्या प्रांगणात खाद्यपदार्थांचे एकूण ५० स्टॉल उभारले होते.

शाळेतील विद्यार्थी, पालक व परिसरातील नागरिकांनी विद्यार्थ्यांनी तयार केलेले विविध खाद्यपदार्थ मोठ्या प्रमाणात खरेदी करून त्यांना प्रोत्साहन दिले. विद्यार्थ्यांच्या उपक्रमशीलतेचे कौतुक करत अनेकांनी बक्षीसे व शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाला प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका इनामदार बी.एफ., माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक टी.जे. पटेल, अध्यक्ष डॉ. अबरार सगरे, तसेच प्रमुख पाहुणे गोरे प्रदीपकुमार अरुण (मुख्याध्यापक, नूतन प्राथमिक शाळा, धाराशिव) व देशमाने सुलभा (मुख्याध्यापिका, आर्य चाणक्य प्राथमिक शाळा, धाराशिव) उपस्थित होते. सर्व



मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे स्टॉल भेट देऊन खरेदी करत त्यांचे मनोबल वाढविले.

हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेची जाणीव निर्माण करणारा ठरला आणि कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

## आपसिंग्यात कब-बुलबुल स्काऊट गाईड जिल्हा मेळावा




**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ फेब्रुवारी -**
धाराशिव भारत स्काऊट गाईड जिल्हा कार्यालय, शिक्षण विभाग धाराशिव व नरेंद्र आर्य विद्यालय, आपसिंगा यांच्या संयुक्त विद्यमाने आपसिंगा (ता. तुळजापूर) येथे कब-बुलबुल स्काऊट गाईड जिल्हा मेळावा दि.९ ते ११ फेब्रुवारी या कालावधीत आयोजित करण्यात आला असून मेळाव्याची जय्यत तयारी करण्यात आली आहे.

या मेळाव्यात धाराशिव जिल्ह्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयांतील शेकडो विद्यार्थी सहभागी होणार असून तीन दिवस तंबूत निवास करून विविध खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम व कलागुण सादर करणार आहेत. विविध शाळांतील विद्यार्थ्यांना एकत्र येऊन एकात्मतेचा अनुभव घेण्याची संधी या मेळाव्यात मिळणार आहे.

मेळाव्यात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून स्पर्धांमधून विद्यार्थ्यांना आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी मिळणार आहे. स्पर्धांमध्ये यश मिळवून विद्यार्थी व शाळा गौरवले जाणार आहेत.

मेळाव्याची पूर्वतयारी जिल्ह्यातील स्काऊट गाईड शिक्षक-शिक्षिकांकडून ४ फेब्रुवारीपासून सुरू असून, त्याच अनुषंगाने ५ फेब्रुवारी रोजी डव्हान्स पार्टीतील शिक्षक-शिक्षिकांनी नरेंद्र आर्य विद्यालय, आपसिंगा येथे उपस्थित राहून विद्यार्थ्यांसाठी आवश्यक सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. यामध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, सांडपाणी व शौचालय व्यवस्था, निवास व्यवस्था तसेच आवश्यक गॅजेट्सची व्यवस्था करण्यात आली आहे.

डव्हान्स पार्टीने धाराशिव भारत स्काऊट गाईड जिल्हा कार्यालयाचे विक्रांति देशपांडे व मेळावा प्रमुख आदर्श शिक्षक दिलीप चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोतदार, कसबे, शेरखाने, मुंडे, वाघमोडे, सविता पांढरे, शुभांगी पाटील, गोरे तसेच जिल्हा कार्यालयाचे सेवक मामा माने यांच्या सहकार्याने ही तयारी पूर्ण केली असल्याची माहिती प्रसिद्धीप्रमुख तथा मराठवाडा शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष जयपाल शेरखाने यांनी दिली.

## कळंब कृषी उत्पन्न बाजार समितीत चोरी-धमक्यांचा सुळसुळाट

**व्यापाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर...**

**कारवाई न झाल्यास आंदोलनाचा इशारा...**




### बंदोबस्त करण्याची मागणी...

चोरी करणाऱ्या आरोपींचा तात्काळ बंदोबस्त करण्याची जोरदार मागणी करण्यात आली आहे. व्यापाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी तातडीने कठोर पावले उचलली नाहीत, तर परिस्थिती चिघळण्याची शक्यता नाकारता येत नाही, असा इशारा देण्यात आला आहे.

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.६ फेब्रुवारी -**
धाराशिव जिल्ह्यासह लातूर व बीड जिल्ह्यात नावाजलेली आणि 'नंबर एक' मानली जाणारी कळंब येथील कृषी उत्पन्न बाजार समिती सध्या गंभीर सुरक्षेच्या प्रश्नांना सामोरी जात आहे. बाजार समितीच्या आवारात व्यापाऱ्यांना धमकावणे, दुकाने फोडून चोरी करणे आणि लूटमार करण्याच्या घटना वाढल्याने व्यापारी वर्गात भीतीचे वातावरण पसरले आहे.

विशेषतः रात्रीच्या वेळी दुकाने फोडून चोरी होण्याचे प्रकार वारंवार घडत असून, त्यामुळे अनेक व्यापारी रात्री बाजार आवारात थांबणे टाळत आहेत. काही व्यापाऱ्यांना तर आपला व्यवसाय बाहेर हलवावा लागला आहे.

बाजार समितीच्या परिसरात मोठ्या प्रमाणात झालेल्या अतिक्रमणामुळे बाजाराची शिस्त पूर्णपणे ढासळली आहे. अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तींमुळे नियमित व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अतिक्रमणाला विरोध केल्यास संबंधित व्यापाऱ्यांना तुझे दुकान संध्याकाळी लुटलेच म्हणून समज अशा धमक्या दिल्या जात असल्याचेही व्यापाऱ्यांनी निवेदनात नमूद केले आहे.

चोरी व धमकीच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असल्याने व्यापारी वर्ग कमालीचा भयभीत झाला असून, अतिक्रमण व चोरी करणाऱ्यांवर तात्काळ कठोर कारवाई करून व्यापाऱ्यांना संरक्षण देण्याची मागणी करण्यात आली आहे.

या संदर्भात बाजार समिती प्रशासनाला निवेदन देण्यात आले असून, जर चोरीच्या घटनांवर नियंत्रण ठेवण्यात आले नाही तर व्यापारी परवाने नुतनीकरण न करण्याची भूमिका व्यापाऱ्यांनी स्पष्ट केली आहे.

दरम्यान, सदरील चोरीच्या घटनांप्रकरणी योग्य ती कार्यवाही न झाल्यास बाजार समिती आवारातील सर्व व्यापारी पोलीस स्टेशनसमोर उपोषणास बसतील, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.